ISSN 2320 – 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची

तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४४

(जुलै-डिसेंबर २०२२ / खंड १४, अंक 2)


- कोरोना महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था
- Women's Empowerment in Maharashtra: Evidence from NFHS-5
- Analyzing The 2008 Subprime Crisis through the Lens of Schumpeter's Innovation Theory
- करार सिद्धांतांचे प्रायोगिक तत्त्वावरील विश्लेषण
- राजर्षी शाहू महाराजांचे औद्योगिक व व्यापार विकास धोरण

- भारतीय अर्थव्यवस्थेची ७५ वर्षातील वाटचाल -

- Role of Industrial Development in Indian Economy
- भारताचे सेवा क्षेत्र : प्रवेशद्वार आर्थिक वृद्धीचे
- जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप
- भारतीय अर्थव्यवस्था : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील नवी आव्हाने आणि नव्या संधी

- ग्रंथ परिचय
- ४५व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

**भारतीय सौर शके १९४४**
(जुलै-डिसेंबर २०२२ / खंड १४, अंक २)

□ मुख्य संपादक □
**धीरज सु. कदम**

----------------------------

□ संपादक मंडळ □
**श्रीनिवास खांदेवाले**
**दि. व्यं. जहागिरदार**
**प्रतिभा काळमेघ**
**सुनील शिंदे**
**आशिष महातळे**

----------------------------

□ संपादकीय पत्रव्यवहार □
**धीरज सु. कदम**
फ्लॅट नं - २०१, श्रीकृपा हाईट्स,
बजरंग किराणा जवळ, मानवसेवा नगर,
सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६

**विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी (२०२२-२३)**

## अनुक्रमणिका

♦ कोरोना महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था
- विनोद गावंडे ................................१

♦ Women's Empowerment in Maharashtra: Evidence from NFHS-5
- Aparna Samudra .....................२३

♦ Analyzing The 2008 Subprime Crisis through the Lens of Schumpeter's Innovation Theory
- Rugved Gadge ........................... ३१

♦ करार सिद्धांतांचे प्रायोगिक तत्त्वावरील विश्लेषण
- वनिता चोरे ........................... ४५

♦ राजर्षी शाहू महाराजांचे औद्योगिक व व्यापार विकास धोरण
- राहुल शं. म्होपरे ........................ ५१

**भारतीय अर्थव्यवस्थेची ७५ वर्षातील वाटचाल-**

♦ Role of Industrial Development in Indian Economy
- Samit Mahore ............५८

♦ भारताचे सेवा क्षेत्र : प्रवेशद्वार आर्थिक वृद्धीचे
- प्रशांत हरमकर ............................ ६६

♦ जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप
- राजश्री रायभोग ....................... ७९

♦ भारतीय अर्थव्यवस्था : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील नवी आव्हाने आणि नव्या संधी
- राजू श्रीरामे ................................ ८४

**ग्रंथ परिचय**

♦ अर्थशास्त्राचे नोबेल विजेते (२०११- २०२१)
- कुमुदिनी जोगी ............................... ९५

♦ ४५व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ९८

********************************** ISSN 2320-0197 **

☐ **कार्याध्यक्ष**
डॉ. निवृत्ती पिस्तुलकर

☐ **अध्यक्ष**
डॉ. श्रीराम कावळे

☐ **उपाध्यक्ष**
डॉ. संतोष कुटे

☐ **सचिव**
डॉ. संजय कोठारी (अमरावती विभाग परिक्षेत्र)
डॉ. विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)

☐ **प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'**
डॉ. धीरज सु. कदम

☐ **जिल्हानिहाय प्रतिनिधी:**
डॉ. माधुरी लेने (नागपूर शहर)
डॉ. सुनील शिंदे (नागपूर ग्रामीण)
डॉ. विठ्ठल ठावरी (चंद्रपूर)
डॉ. श्रीकृष्ण भुरे (भंडारा)
डॉ. श्रीकृष्ण बोढे (वर्धा)
डॉ. मंगला धोरण (अमरावती)
डॉ. पंकज तायडे (अकोला)
डॉ. हनुमंत भोसले (बुलढाणा)
डॉ. संजय राचलवार (यवतमाळ)
डॉ. गजानन कुबडे (वाशीम)
डॉ. संजय महाजन (गडचिरोली)
डॉ. वर्ष गंगणे (गोंदिया)

**आजीव सदस्यता शुल्क :** रू. १५०० /- आहे, ही रक्कम सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने, सहयोगी प्राध्यापक, लोक प्रबोधन कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा यांचेकडे "विदर्भ अर्थशास्त्र परिषद" या नावाने डिमांड ड्राफ्टने पाठवावी. किंवा डॉ. विठ्ठल घिनमिने यांच्याशी ९६८९६४२४४९ या नंबरवर संपर्क

☐ **अक्षर जुळवणी व मुद्रक**
आयडियल कॉम्पुटर (महादेव कामतकर)
नागपूर, मो. नं. ९०२१६७४८९१
इमेल : kamatkarmahadeo@gmail.com

**स्वागत मूल्य:**
१) परिषद सभासद - १५० रू.
२) शैक्षणिक संस्था – २०० रू.

# संपादकीय .....

अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेचा खंड १४, अंक २ (जुलै- डिसेंबर २०२२) हा संपादक म्हणून पहिला अंक सादर करतांना मनस्वी अत्यंत हर्ष होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने माझ्यावर विश्वास दाखवून अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेच्या संपादकपदी जी माझी निवड केली, त्याबद्दल मी परिषदेचा शतशः ऋणी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्य व मार्गदर्शनाने हे शिवधनुष्य पेलण्याचा व या कार्याला योग्य तो न्याय देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असे आश्वासन देतो.

१९७०-७१ मध्ये नागपूर येथे स्थापना झालेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद ही मध्य भारतातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांची प्रादेशिक स्तरावरील सर्वात जुनी संघटना आहे. परिषदेने नुकतेच (२०२०-२१ मध्ये ) आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले, ही आपणा सर्वांकरिता अतिशय आनंददायी आणि अभिमानाची बाब आहे. अगदी पूर्वीपासूनच परिषदेचे वैचारिक मुखपत्र असणारी एक संशोधन पत्रिका असावी अशी सभासदांची इच्छा होती. २००७-०८ मध्ये विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने "अर्थमीमांसा" नावाची संशोधन पत्रिका प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला आणि २००८ मध्ये अंजनगाव सुर्जी (जिल्हा- अमरावती) येथील परिषदेच्या वार्षिक अधिवेशनामध्ये डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांच्या संपादनांतर्गत अर्थमीमांसाचा पहिला खंड प्रकाशित झाला. तेव्हापासून तर आजतागायत डॉ. जहागिरदारांनी अतिशय कल्पक आणि अभ्यासू पद्धतीने या संशोधन पत्रिकेला संपादित करत अर्थशास्त्रातील एक दर्जेदार संशोधन पत्रिका म्हणून लौकिक प्राप्त करून दिला आहे. अर्थात, याचे श्रेय अर्थमीमांसेतून सातत्याने अभ्यासपूर्ण, शास्त्रीय व दर्जेदार लिखाण करणाऱ्या परिषदेच्या जेष्ठ तसेच तरुण अभ्यासू सभासद लेखकांना सुद्धा दिले पाहिजे.

अर्थमीमांसाची उपलब्धी ही द्विमार्गी आहे. ज्याप्रमाणे डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. रा. य. माहोरे, डॉ. मुक्ता जहागिरदार, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. मृणालिनी फडणवीस यासारख्या जेष्ठ व ख्यातनाम प्राध्यापकांनी अर्थमीमांसातील आपल्या अभ्यासपूर्ण व शास्त्रीय लिखाणाद्वारे या संशोधन पत्रिकेला एक वेगळीच उंची प्राप्त करून दिली; त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला 'अर्थमीमांसा' ने विदर्भातील अर्थशास्त्राच्या तरुण अभ्यासकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन आर्थिक विषयांवर संशोधनात्मक लिखाण करणारी एक नवीन पिढी निर्माण करण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या उद्दिष्टाला अनुसरून सुयोग्य दिशेने ही संशोधन पत्रिका वाटचाल करत आहे, असे म्हणावेसे वाटते. आतापर्यंत अर्थमीमांसाचे वर्षातून दोन अंक छापील स्वरुपात प्रकाशित होत होते; परंतु मुद्रण व छपाईचा खर्च आणि परिषदेला पत्रिका शुल्क स्वरुपात मिळणारे उत्पन्न विचारात घेता ही तूट सातत्याने वाढत होती. परिषदेच्या सभासदांनी अर्थमीमांसेच्या शुल्का व्यतिरिक्त काही वेळा देणगी देऊन ही तूट भरून काढली, स्वतः जहागिरदार दांपत्यांनी अर्थमीमांसेला रु. ५०००० ची देणगी

देऊन हा उपक्रम अतिशय सचोटीने चालवला, नव्हे वृद्धिंगत केला; याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. परंतु प्रत्येकवेळी ही तूट भरून काढणे शक्य नसल्याने परिषदेने वर्षातून दोनपैकी एक अंक सॉफ्ट कॉपीच्या स्वरुपात ऑनलाईन प्रकाशित करावा असा निर्णय घेतला आणि सुदैवाने अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेची वेबसाईट देखील विकसित झालेली असल्याने त्यावर ती अपलोड करून सहजतेने सर्वांना उपलब्ध करून देणे शक्य आहे. त्यामुळे हा अंक प्रथमतःच सॉफ्ट कॉपीच्या रुपात प्रकाशित होत आहे.

या अंकातदेखील प्रकाशनाचा पूर्वीचाच आकृतिबंध कायम ठेवला असून प्रथमतः ४५व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाचा सारांश दिला आहे. अलीकडे नुकताच "राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणी अहवाल- ५" (NFHS-5) प्रकाशित झालेला आहे. या अहवालातील आकडेवारीचा आधार घेऊन अपर्णा समुद्र यांनी, 'Women's Empowement in Maharashtra: Evidence from NFHS-5' या शीर्षकांतर्गत आपल्या शोध निबंधात महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरणाच्या वस्तुस्थितीचा शास्त्रीय पद्धतीने आढावा घेतला आहे. ऋग्वेद गाडगे यांनी आपल्या लेखात शुम्पिटर यांच्या नवप्रवर्तन सिद्धांताच्या परिप्रेक्ष्यातून २००८च्या जागतिक वित्तीय अरिष्टाचे सैद्धांतिक विश्लेषण प्रस्तुत केले आहे. वनिता चोरे यांनी आपल्या लेखात अर्थशास्त्रातील २०१६चे नोबेल पारितोषिक विजेते ऑलिव्हर हार्ट आणि बेनगेट होल्मस्ट्रोम यांनी विकसित केलेल्या अर्थशास्त्रातील करार सिद्धांतांचे प्रायोगिक तत्त्वावरील विश्लेषण सोप्या व शास्त्रीय पद्धतीने समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ६ मे २०२२ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०० वी पुण्यतिथी होती. राजर्षी शाहू महाराज स्मृती-शताब्दी पर्व निमित्ताने हे वर्ष संपूर्ण राज्यात 'कृतज्ञता पर्व' म्हणून साजरे करण्यात आले. त्यानिमित्ताने शाहू महाराजांच्या विचारांचे अभ्यासक राहुल म्होपरे यांचे कडून विशेष लेख मागवण्यात आला. आपल्या लेखात त्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या औद्योगिक व व्यापार विकास विषयक धोरणाचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे.

२०२१-२२ हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने मागील अंकात भारतीय अर्थव्यवस्थेच्या ७५ वर्षातील वाटचालीचा आढावा घेणारे भिन्न महत्त्वाच्या पैलूंवरील ७ लेख प्रकाशित करण्यात आले होते. या अंकात वेगवेगळ्या विषयांवरील ४ लेख प्रकाशित केले आहेत. त्यात समित माहोरे यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा विश्लेषणात्मक पद्धतीने आढावा घेतला आहे तर प्रशांत हरमकर यांनी सेवा क्षेत्राच्या प्रगतीचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे. राजश्री रायभोग यांनी आपल्या लेखात जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेच्या बदलत्या स्वरुपाची चिकित्सा केली आहे. राजू श्रीरामे यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील भारतीय अर्थव्यवस्थेपुढील नवी आव्हाने आणि नव्या संधींचा मागोवा घेतला आहे. यासोबतच प्रशांत हरमकर यांच्या 'अर्थशास्त्राचे नोबेल विजेते (२०११-२०२१)' या पुस्तकाचे परीक्षण कुमुदिनी जोगी यांनी केले आहे. अंतिमतः विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४५व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल प्रकाशित केला आहे.

हा अंक सिद्ध करण्यासाठी आपले अभ्यासपूर्ण लेख वेळेत पाठवून सर्व लेखकांनी जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वाचे मनःपूर्वक आभार! विशेषतः अर्थमीमांसाचे पूर्व संपादक गुरुवर्य डॉ. जहागिरदार सरांनी हा अंक सिद्ध करत असतांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि यापुढेही ते लागणार असल्याने मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो. अर्थमीमांसेला आपले दर्जेदार लेख मराठी / हिंदी /इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत पाठवू शकता. अर्थमीमांसेला अधिक बळ देण्यासाठी जाहिरातींची आवश्यकता आहे त्यादृष्टीने सर्व सभासदांनी प्रयत्न करावेत असे आवाहन करतो. आयडियल कॉम्पुटरचे महादेव कामतकर यांनी मुद्रणाचे कार्य सुबकपणे व वेळेत करून दिल्याबद्दल त्यांचे आभार. हा पहिलाच अंक असल्याने यातील सर्व त्रुटींची जबाबदारी माझी आहे. अर्थमीमांसेला अधिक उत्कृष्ट आणि दर्जेदार बनवण्यासाठी आपल्या काही सूचना असल्यास त्याचे स्वागत आहे.

दिनांक : २१ डिसेंबर २०२२

स्थळ : नागपूर

**(डॉ. धीरज सु. कदम)**

प्रमुख संपादक – ‘अर्थमीमांसा’

********************************** ISSN 2320-0197 **

# कोरोना महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था

**डॉ. विनोद म. गावंडे**

विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

**(दिनांक २५ व २६ मार्च २०२२ मध्ये नवरगाव जि. चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या ४५व्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचा सारांश)**

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक अधिवेशन भारतीय शिक्षण संस्था द्वारा संचालित श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव जि. चंद्रपूर येथे दिनांक २५ आणि २६ मार्च २०२२ रोजी होत आहे याचा मला मनस्वी खूप आनंद होत आहे. या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळयाचे सन्माननीय अध्यक्ष श्री सदानंदजी बोरकर, सचिव भारतीय शिक्षण संस्था नवरगाव, उद्घाटक मा. डॉ. मृणालिनी फडणवीस कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, प्रमुख अतिथी मा. डॉ. विनायक देशपांडे कुलगुरू जी. एच. रायसोनी अभिमत विद्यापीठ अमरावती, विशेष अतिथी मा. डॉ. श्रीराम कावळे प्र. कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष मा. डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, उपाध्यक्ष मा. डॉ. प्राची देशपांडे, परिषद सचिव नागपूर विभाग डॉ. विठ्ठल घिनमीने, परिषद सचिव अमरावती विभाग डॉ. राजेश चव्हाण, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सर्व माजी सन्माननीय अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य, परिषदेचे सर्व आजीवन सदस्य, आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे, स्थानिक कार्यवाह डॉ. आस्तिक मुंगमोडे, सर्व उपस्थित मान्यवर निमंत्रित पाहुणे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी, स्वयंसेवक, पत्रकार, इलेक्ट्रोनिक मिडिया प्रतिनिधी आणि सर्व बंधू भगिनींना माझा सप्रेम नमस्कार. समृद्ध अशी वैचारिक परंपरा लाभलेल्या आणि सुसंघटीत अश्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी सर्वानुमते अविरोध निवड केल्याबद्दल मी परिषदेच्या सर्वसन्माननीय आजीव सदस्यांचा आभारी आहे.

परिषदेच्या इतिहासामध्ये दोन वर्षानंतर अधिवेशन आयोजनाची कदाचित ही पहिलीच वेळ असेल. आपण सर्व या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने याठिकाणी

उपस्थित आहे. ही एक भाग्याची बाब आहे. आपण सर्वांनी मानवी समुदायावर आलेल्या कोरोना रुपी प्रचंड मोठ्या संकटावर मात केलेली आहे.

कोरोना महामारीच्या काळात टाळेबंदीने म्हणजे या दुरीने किंवा वेगवेगळ्या राहण्याच्या व बाहेर न निघण्याच्या उपायातूनच अर्थव्यवस्था मात्र घसरत गेली. कोरोना महामारीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी गेली दोन वर्षे अत्यंत कठीण गेली आहेत. कोरोना पुनरावृत्तीच्या लाटा, पुरवठा-साखळीतील व्यत्यय आणि अलीकडेच चलनवाढीने धोरणनिर्मितीसाठी विशेषतः आव्हानात्मक काळ निर्माण केला आहे. आज आपण या ठिकाणी कोरोना महामारीचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला आहे यावर चिंतन करत असताना अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टांमध्ये झालेले परिणाम तसेच सरकारच्या भूमिकेत झालेले बदल व नियोजन कार्यातील बदल, खर्चातील बदल, एकंदरीत अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात, संरचनेत झालेल्या परिणामा पासून तर विविध क्षेत्रातील परिणामावर प्रकाश टाकू. अर्थशास्त्राच्या जवळपास सर्वच अभ्यासकांना 1929 ची जागतिक महामंदी पुस्तकी स्वरूपातून जुन्या साहित्यामधून वाचन करून परिचित आहे. पण 2020-21 मध्ये कोरोना च्या माध्यमातून आलेली वेगळ्या प्रकारची मंदी जिने २०० पेक्षा जास्त देशांना बंधिस्त करून टाकले. अश्या प्रकारची घटनाआ मानवाच्या आतापर्यंतच्या इतिहासामध्ये दिसून आली नाही. ही एक अर्थव्यवस्थेमध्ये अचानक उद्भवलेली समस्या आणि मोठे संकट आहे, कारण या संकटात लोकांचे प्राण आणि अर्थव्यवस्था या दुहेरी भूमिकेतून विचार करावा लागेल.

अर्थव्यवस्थेमधील जुन्या प्रकारचे नियोजन व योजना काही काळासाठी आपल्याला बाजूला ठेवून कोरोनाच्या विळख्यातून जनतेला व अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी काही नवीन काही पावले उचलायची आवश्यकता आहे. म्हणजेच अर्थव्यवस्थेचे जूनी उद्दिष्टे बदलत गेली. त्यातला पहिला आणि महत्त्वाचा बदल असा की सरकारची भूमिका बदलायला लागली. कल्याणकारी राज्य संकल्पना विकसित होत असतांनाच सरकारने कमीत कमी सरकार आणि जास्तीत जास्त शासन अशा पद्धतीची अमलबजावणी करायला सुरुवात केली. जनतेला जास्तीत जास्त कसे स्वातंत्र्य देता येईल, सार्वजनिक सहभाग कसा वाढेल यावर लक्ष असायचे परंतु कोरोनाची परिस्थिती आली आणि सरकारचे उद्दिष्ट बदलून गेले. संपूर्ण टाळेबंदीमध्ये सरकारी हस्तक्षेप वाढायला लागला, कारण सरकारी हस्तक्षेप केल्याशिवाय कोरोनावर उपाय करणे कठीण होते ही तेवढीच बाब खरी आहे. वैयक्तिक स्वातंत्र्यावर मोठ्याप्रमाणावर बंधने घालण्याचे सरकारने कार्य केले आहे. सरकार

व्यक्तींच्या फिरण्यावर, गर्दी जमवून यावर लक्ष ठेवायला लागले म्हणजे अर्थात या लोकांच्या वागणुकीवर बंधने घालायला लागले, टाळेबंदीमुळे सर्व आर्थिक प्रक्रिया ठप्प झाल्या. सर्व जागतिक अर्थव्यवस्था प्रभावीत झाल्या यात शंका नाही. निश्चितच भारतीय अर्थव्यवस्था त्याला अपवाद नाही. कोरोनाच्या काळात रुग्णांची संख्या वाढायला लागली असतांना, रुग्ण संख्येचा ग्राफ उंच वाढत चालला असतांना, जास्तीत जास्त देशांनी नियंत्रण करण्यासाठी त्यावर उपाय म्हणून टाळेबंदीचा वापर केला. म्हणजेच रुग्णांच्या संख्येत घट करणे हा सरकारचा मुख्य उद्देश होता. आता तर टाळेबंदी ही संकल्पना आपल्या सर्वांच्या व्यवहारातील संकल्पना होऊन बसलेली आहे. प्रत्यक्षात हा कोरोना वरचा उपाय नव्हता फक्त मोठ्या समस्या निर्माण होण्यापासून अर्थव्यवस्थेला आणि जनतेला वाचवणे यासाठी केलेला हा एक उपाय होता. टाळेबंदी केल्यामुळे वरील काही समस्यांमध्ये घट झाली असेल, रुग्णांच्या संख्येमध्ये घट झाली असेल, काही लोकांना वाचवण्यात यश मिळाले असेल परंतु त्याचा नकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर पडल्याचे प्रामुख्याने दिसून येते. तद्नंतर सरकारच्या लक्षात आले की, केवळ टाळेबंदी करून अर्थव्यवस्था सुरळीत होऊ शकत नाही. त्याऐवजी कोरोना सोबत समायोजन करून आर्थिक क्रियाकलाप सुरू ठेवणे आवश्यक आहे.

कोरोनाचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला आहे हे वैश्विक संदर्भामध्ये आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF) च्या मते, 2008 पेक्षा जास्त घातक हे आर्थिक संकट आहे. जगातील बहुतांश देशाच्या अर्थव्यवस्थांचा विकास कोरोना काळामध्ये ऋणात्मक राहाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा त्याला अपवाद नाही. 2021 मध्ये आलेली ही मंदी म्हणजे भारतातील पहिली तांत्रिक मंदी (Technical Recession) आहे. एखादी अर्थव्यवस्था सलग दोन तिमाही पर्यंत ऋणात्मक विकास दरामध्ये राहत असेल तर त्याला तांत्रिक मंदी असे म्हणतात. भारताची अर्थव्यवस्था स्वातंत्र्यापासून कधीही सलग दोन तिमाही पर्यंत ऋणात्मक राहीली नाही. आपण आतापर्यंत तांत्रिक मंदी मध्ये गेलो नव्हतो परंतु 2020-21 च्या पहिल्या तिमाहीचा विचार केला तर 24 टक्के उणे आपली अर्थव्यवस्था गेली होती. तिसऱ्या सेटमध्ये मात्र 0.4 धनात्मक राहिला. परंतु अर्थशास्त्रातील हा सैद्धांतिक खेळ महत्त्वाचा नसून त्या दरम्यान ज्या लोकांवर त्याचा विपरीत परिणाम झाला असेल अशा लोकांचा विचार करणे गरजेचे असते. तो विचार करत असताना आपल्याला वर्ल्ड बँकेच्या रिपोर्ट मध्ये सांगितल्या प्रमाणे, 1929 नंतर 2020 मध्ये सर्वात भयानक परिस्थिती निर्माण झाली. एखाद्या अर्थव्यवस्थेचा जीडीपी कमी राहणे हा जास्त प्रभावी भाग आपल्याला वाटणार

नाही. परंतु त्यामुळे त्या देशातील लोकांवर किती वाईट परिणाम झाला हा मात्र विचार करण्यासारखा विषय आहे. त्या संदर्भामध्ये काही असे क्षेत्र आहेत त्या वरील परिणामाचा विचार आपल्याला करावा लागेल.

एकही व्यक्ती असा नसेल की ज्याने त्याच्या ओळखीचा व्यक्ती या महामारीमध्ये गमावला नसेल. खरंतर आपण जिवंत असणारे यातून सावरून स्थिरते कडे चाललेलो आहे. परंतु ज्यांच्या घरचा प्रमुख व्यक्ती या महामारीमध्ये मृत्युमुखी पडला आहे. त्या कुटुंबाची अवस्था काय असेल? हा आपल्याला विचार करायला भाग पाडणारा प्रश्न आहे. जे व्यक्ती कोरोना काळामध्ये आपला प्राण गमावून बसले ते आपल्याला आपल्या आरोग्य क्षेत्राच्या कमकुवतपणाचे प्रमाणपत्र देऊन गेले. भारतामध्ये कोणत्या क्षेत्रावर कशा पद्धतीचा परिणाम कोरोना महामारी मुळे झालेला आहे ते पुढील प्रमाणे-

**मानवी भांडवल (Human Capital)**

मानवी भांडवल हे ज्ञान, कौशल्ये आणि क्षमतांचा एक संच आहे ज्याचा उपयोग व्यक्ती आणि संपूर्ण समाजाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी केला जातो. "मानवी भांडवल" या संकल्पनेचा वापर आपल्याला सामाजिक संस्थांची भूमिका समजून घेण्यास, केवळ सामाजिक मापदंड शोधण्यासाठीच नव्हे तर बाजाराच्या अर्थव्यवस्थेवर सामाजिक घटकाच्या प्रभावाचे आर्थिक विश्लेषण देखील करण्यास अनुमती देते. विसाव्या शतकात "मानवी भांडवल" वरील सिद्धांत विकसित केले गेले. या सिद्धांतानुसार शिक्षण आणि आरोग्य सेवेच्या क्षेत्रातील एखाद्या व्यक्तीच्या गुणात्मक वैशिष्ट्यांमध्ये सुधारणा केल्याने टिकाऊ आर्थिक संसाधनांची निर्मिती सुनिश्चित होते. शिक्षण श्रमशक्तीमध्ये परिवर्तन घडवून आणते, तिला अत्यंत कुशल काम करण्याची क्षमता देते आणि आरोग्य सेवा व्यक्तीच्या कार्य करण्याच्या संचित क्षमतेचा वापर कालावधी आणि तीव्रता वाढवते. या गृहितकांच्या आधारे कर्मचाऱ्यांचे उत्पादक गुण आणि वैशिष्ट्ये भांडवलाचा एक विशेष प्रकार म्हणून ओळखली गेली आहे. कारण ते इतर प्रकारच्या भांडवली संसाधनांप्रमाणेच त्यांच्या मालकाला काही काळासाठी विशिष्ट उत्पन्न देतात. या मानवी भांडवल निर्मिती निकषा पैकी कोरोना काळामध्ये सर्वात मोठा परिणाम जर कुठल्या क्षेत्रावर झाला असेल तर तो म्हणजे शिक्षण होय.

या महामारीचा शिक्षणावर काय परिणाम झाला हे सांगण्या आधी मला छोटसं उदाहरण द्यावेसे वाटते की, आपण शिकत असताना एखाद्या वेळेस काही कारणाने जर एखादा तास सुटून गेला तर त्या दिवशी जो भाग शिकवला गेला तो

आपल्याला वर्षभर कठीण जाते. त्या दिवशी शिकवला गेलेला भाग समजण्यासाठी कठीण जातो. त्यावरून आपण एक निष्कर्ष काढू शकतो की, जर सतत दोन वर्ष वर्ग बंद झाले असतांना त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर काय झाला असेल. आता जेव्हा शाळा सुरू होतील तेव्हा जी लहान मुल आहेत त्यांना तो शाळेच्या पूर्वीच्या प्रवाहामध्ये येण्यासाठी बराच काळ जाणार. पारंपारिक पद्धती समोर असून सुद्धा ग्रामीण भागात काही मुलं शाळेत जात नव्हती, आता तर शिक्षणाकडे अजूनच दुर्लक्ष झाले आहे. ज्यांचे आई-वडील सुशिक्षित आहेत किंवा थोडे शिक्षित आहेत त्यांची एवढी अडचण होणार नाही परंतु अशिक्षीत आईवडील असलेल्यांची संख्या भरपूर आहे. त्याच्या कडून आजच्या आभासी शिक्षणाचा खर्च व पद्धती झेपणार नाही. चांगल्या परिस्थितीमध्ये सुद्धा ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांना जबरदस्तीने शाळेमध्ये अथवा महाविद्यालयामध्ये मध्ये पाठवावे लागते. कोरोनाच्या परिस्थिती मध्ये शाळेत जाणे बंद आणि मोबाईल वरील आभासी शिक्षण ही चिंतनीय बाब आहे.

या काळामध्ये भारताचा जीडीपी 6.3 टक्क्यांनी आणि जागतिक बँकेनुसार 5.2 टक्के उणे किंवा ऋणात्मक राहिलेला आहे. या ठिकाणी आपण केवळ आकडे लक्षात घेणार नाही. कारण ते केवळ अर्थव्यवस्थेसाठी असतील पण त्या आकड्यात घट झाल्यामुळे जे परिणाम पाहायला मिळाले ते अतिशय गंभीर स्वरूपाचे आहेत. ज्यामध्ये असंख्य लोकांचा रोजगार गेला, बेकारी निर्माण झाली असेल, त्यामुळे ही GDP मध्ये झालेली घट हे कुठल्या वर्तमानपत्राची हेडलाईन नसून हजारो-लाखो कुटूंबाच्या जगण्याचा प्रश्न यामधून निर्माण झाला. जिथे रोजगार नाही, तर पैसा नाही, तिथे स्वास्थ्य समस्या, शिक्षण समस्या व आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. या काळात काही क्षेत्राचा निश्चितच यामध्ये फायदा झाला असेल, तीव्र गतीने विकास झाला असेल, जसे औषध निर्माण क्षेत्र असेल E-learning असेल परंतु बहुतांश क्षेत्रावर मात्र याचा विपरीत परिणाम झाला आहे. आणि हे नुकसान कधीही भरून निघणार नाही असे आहे. ज्या ठिकाणी प्रत्यक्ष संपर्क जास्त गरजेचा आहे त्या क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम झाला, जसे की विमानसेवा, प्रवासी वाहतूक, पर्यटन हॉस्पिटॅलिटी यावर मात्र सर्वात जास्त विपरीत प्रभाव आपल्याला त्यांचा पडलेला दिसून येतो. जे कमी संपर्काचे क्षेत्र असतील जसे कृषी, संरचना, माहिती तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रामध्ये प्रभावाची तीव्रता थोडी कमी दिसून येते. हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीज चा तोटा 90000 कोटी, टूरिझमचा तोटा 47000 करोड आहे. हा आकडा काही एखाद्या कंपनीला तोटा आहे एवढ्या पुरता मर्यादित नाही तर यातून जे

चलन रोजगाराच्या स्वरूपात त्यातील कर्मचाऱ्यांना मिळणार होते त्यातून त्यांच्या दैनंदिन उपयोगाचा खर्च भागविल्या जात होता, शिक्षणावर आरोग्यावर खर्च केला जात होता तो होऊ शकला नाही त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या. सर्वात जास्त व दूरगामी परिणाम झाला तो म्हणजे ह्यूमन रिसोर्सेस एज्युकेशन ज्याला अर्थव्यवस्थेत सर्वात जास्त महत्त्व आहे.

उत्पादन क्षेत्रात उत्पादनाच्या दोन घटकामध्ये मानव येतात तसेच भांडवल निर्मितीत मानवाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. यामध्ये बौद्धिक सामर्थ्य महत्त्वाचे असते व ते मिळविण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. या महामारीमध्ये शिक्षणावर सर्वात जास्त मात्रात्मक व गुणात्मक असा जास्त कालावधी पर्यंतचा वाईट परिणाम झाल्याचे आपल्याला दिसून येते. E-learning किंवा E-Education मध्ये विकास झाला ही गोष्ट आपल्याला दुरून दिसत असेल पण जेव्हा आपण त्याचा गहण विचार करू तेव्हा निश्चितच आपल्याला त्याचा परिणाम लक्षात येईल. यामध्ये सरकार आणि जनता दोन्ही जबाबदार आहेत, शाळा बंद कडे सरकारने याच्या परिणामाचा विचार केला नाही किंवा जनतेने सुद्धा त्याच्या परिणामांचा विचार केला नाही. शिक्षण बंद, शाळा बंद याचा अर्थ असा आहे की, नवीन येणाऱ्या पिढीची निर्मिती आपण थांबवली आहे. वर वर पाहता असे आपल्याला दिसून येईल की, ऑनलाइन एज्युकेशन मध्ये विकास झाला पण ते पूर्ण सत्य नाही हे लक्षात येऊन जाईल, शिक्षणाच्या बाबतीमध्ये दोन बाबी आहेत. एक तर जे विद्यार्थी 2019 ते 22 मधील काळात शिक्षण घेणार त्यांना शिक्षणाच्या उणिवा कमी करण्यासाठी यांना वेळ तर लागणार आहे, हे क्षेत्र काही असं स्वीच ऑन केलं की सुरू आणि स्विच बंद केले की बंद अशा पद्धतीच नाही. तर या ठिकाणी मानसिकतेचा परिणाम असतो मानसिकतेचा विचार असतो, त्यामुळे याची तीव्रता हे कमी होण्यासाठी थोडा इतर क्षेत्रांच्या तुलनेमध्ये जास्त वेळ लागेल, पण हे कोणाच्या बाबतीमध्ये ज्यांनी ऑनलाइन एज्युकेशन घेतलं त्यांना त्यांची विस्कटलेली घडी दुरुस्त करण्यासाठी वेळ लागेल. आणि दुसरी बाजू आहे ती त्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत की ज्यांना या काळात शिक्षणाची संधी सुद्धा मिळाली नाही. अशा विद्यार्थ्यांचा आपल्याला विचार करावा लागेल. ज्यांच्याकडे अशा प्रकारची साधने आहेत की जे आभासी शिक्षण घेऊ शकतात ते भाग्यवान समजू शकतो. पण हे सगळ्यांना शक्य नाही. मार्च 2020 पासून सर्व शाळा महाविद्यालय बंद करण्यात आले. Actual Classes च्या जागी Virtual Classes निर्माण झाले, पूर्ण शैक्षणिक कॅलेंडर बदलून गेलं, पूर्वी शाळा सुरू असताना आई वडील गरीब असले तरीही ते आपल्या मुलाला शाळेत

पाठवीत. कमी फी च्या शाळेमध्ये प्रवेश घेऊन शिक्षण देत होते. पण त्याजागी ऑनलाइन एज्युकेशन त्यांना परवडणारे आहे का? एकीकडे कोरोनामुळे त्यांचा रोजगार गेला. ज्यांचा रोजगार बंद झाला अशा परिस्थितीत त्यांनी त्यांच्या मुलाला ऑनलाइन शिक्षण देणे कस शक्य होईल? आपल्याला माहित आहे ऑनलाइन शिक्षण म्हटलं तर पाच दहा हजार रुपयाचा एखादा मोबाईल घ्यावा लागतो. त्यानंतर पाचशे रुपये महिन्याचा तुम्हाला त्याच्यामध्ये रिचार्ज टाकावा लागतो. त्यातही जर घरी दोन मुलं असतील तर आणि दोघांचा क्लास एकाच वेळेवर असतील तर मग त्यांच्यामध्ये अजून एक समस्या निर्माण होते ती मोबाईल द्यायचा कोणाला? पहिले तर ते मोबाइल घेऊ शकणार नाही आणि घेतला तरी मग तो वापरायचा कोणी? हा प्रश्न निर्माण होतो. रोजगार नसेल पैसा नसताना आपल्याला शिक्षणासाठी दहा पंधरा हजार रुपये खर्च करण्याची क्षमता त्या व्यक्तीमध्ये नसते आणि हे समजण्यासाठी आपल्याला स्वतःला त्या जागी ठेवून पहावा लागेल. सरकार डिजिटल इंडियाच्या माध्यमातून किंवा काही कुठलेही कारण यातून एक आकडेवारी दाखवून कशा पद्धतीने शैक्षणिक विकास झाला वगैरे गोष्टी ते सांगू शकत. पण याठिकाणी वास्तविकता वेगळी असणार आहे फक्त आकडेवारी मध्ये बदल करणे म्हणजे देशाचा विकास नाही.

देशामध्ये गरिबांची संख्या भरपूर आहे त्यामध्ये कामगार, फळविक्रेते, फेरीवाले किंवा ग्रामीण भागामध्ये मजूर असतील यांना मात्र हे शिक्षण देणे अवघड आहे. ज्यांच्या मध्ये शिक्षणाची आवड असेल त्यांना शिक्षण द्यायचे असेल परंतु ते देऊ शकतात का हा मुद्दा त्या ठिकाणी निर्माण होतो? टाळेबंदी लागली आणि काही दिवसातच ज्या मोठ्या शैक्षणिक संस्था आहेत त्यांनी लवकरच आभासी शिक्षण सुरू केले त्या पाठोपाठ इतर संस्थांनीही सुरू केले. त्यातूनच दोन वर्ग स्पष्ट दिसायला लागले, शिक्षणाची असमानता वाढत गेली. एक असा वर्ग ज्यांच्याकडे आभासी शिक्षणाची पुरेशी साधने आहेत त्यांचा शैक्षणिक निश्चितच उंचावला कारण की त्यांना पूर्ण जगातून अथवा भारतातून शिक्षणाचे चांगले आभासी प्लॅटफॉर्मवर मिळत गेले. परंतु भारतात आजही 70 टक्के लोक इंटरनेटची पुरेसी सुविधा नसणारी आहेत. त्यांची परिस्थिती मात्र खूप गंभीर आहे. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग म्हणजे NCERT, अझीम प्रेमजी फौन्डेषण, ASER, Oxfard यांच्या रिपोर्टनुसार 27 ते 60 टक्के विद्यार्थी ऑनलाईन पार्टिसिपेशन साठी लायक नाहीत. सगळ्यांची कारणे वेगवेगळी आहेत, ज्यामध्ये साधनांचा अभाव, इंटरनेट

सुविधा, खरेदी शक्तीचा अभाव किंवा त्यांचा हाताळण्याच्या समस्या ह्या वेगवेगळया समस्या त्यांच्या ठिकाणी या तिन्ही रिपोर्टमध्ये सांगितल्या आहेत. तेव्हा ऑनलाईन क्लास सुरू झाले त्यातून 27 ते 60 टक्के विद्यार्थी ही पद्धती स्वीकारू नाही शकले. राहिलेले 40 ते 50 टक्के विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी समर्थ होते पण त्यांनीही काही विशेष प्रगती केलीली दिसत नाही. त्यांचाही यामध्ये भरपूर फायदा झाला असे म्हणता येणार नाही.

दुसरी बाजू अशी की सरकारी शाळांची दैनावस्था आणि पूर्ण शिक्षण आभासी पद्धतीने जर केले तेव्हा त्या शिक्षणावर काय परिणाम होईल. विद्यार्थी महामारीच्या काळात शाळेत येऊ शकत नाहीत हा भाग वेगळा पण त्या बरोबर त्यांच्या आई-वडिलांचा गेलेला रोजगार, आलेली बेकारी आपल्याला माहित आहे. भारतात 90 कोटी लोक ग्रामीण भागात राहतात त्यातून आपल्याला शिक्षणाची परिस्थिती लक्षात येईल. भारतामध्ये 25 टक्के अशी कुटुंबे आहेत की ती एका रूमच्या घरांमध्ये राहतात अश्या स्थितीत जर एका रूम मध्ये पूर्ण कुटुंब राहत असेल तर तो ऑनलाइन एज्युकेशन घेतांना त्याच्या घरांमध्ये असताना तो व्यवस्थित घेऊ शकेल का? यातून निर्माण होणारे इंजिनिअर्स, डॉक्टर्स, अधिकारी, ज्या ठिकाणी शैक्षणिक पात्रता लागते ते अशा आभासी परिस्थितीमध्ये शैक्षणिक पात्रता पास होऊन गेलेले असतील या कोरोनाच्या काळामध्ये होणाऱ्या ऑनलाईन परीक्षा कशा पद्धतीच्या होतात हे आता आपल्याला वेगळे सांगण्याची गरज नाही, यामधून भारताचे ह्युमन कॅपिटल फॉर्मेशन कसे होईल? अर्थातच होणार नाही त्यामुळे कोरोना मुळे या ह्युमन कॅपिटल फॉर्मेशन वर अतिशय वाईट परिणाम झालेला आहे. आणि हा परिणाम असा असणार आहे की त्याला अर्थव्यवस्था सुरळीत सुरू झाल्यानंतरही त्या बाबी आपल्याला भरून काढण्यासाठी पाच ते दहा वर्षे लागतील.

**कृषी क्षेत्र : (Agriculture Sector)**

भारतीय जनतेच्या उदरनिर्वाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी होय. कृषी क्षेत्र भारतातील सर्वात मोठे मुक्त खाजगी क्षेत्र आहे. तसेच सर्वात मोठे असंघटित क्षेत्र आहे.या कोरोना काळामध्ये उत्पादनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये घट होत आलेला होता. भारतही त्याला अपवाद नाही. 2021 GDP मध्ये 6.2 % ऋणात्मक वाढ झाली पण कृषी क्षेत्रामध्ये मात्र 3.6 % धनात्मक वाढ झाली, जीडीपीमध्ये ऋणात्मक वाढ होणे काही नवीन नाही कारण 1957-58 मध्ये जीडीपी ऋणात्मक होता.1965 मध्ये सुद्धा ऋणात्मक होता, त्याचे कारण युद्ध परिस्थिती व दुष्काळ त्याचप्रमाणे 1972 ला सुद्धा GDP मध्ये ऋणात्मक वाढ झाली होती. 1980-

82 च्या दुष्काळामुळे, सोबतच इरानियन रिव्होल्यूशन सुद्धा त्या काळामध्ये आल्यामुळे तेलाच्या किमती वाढल्यामुळे, यावेळी आपल्या जीडीपीमध्ये ऋणात्मक वाढ झाली होती. 2021 मध्ये सुद्धा आपल्या जीडीपीमध्ये ऋणात्मक वाढ झालेली आपल्याला दिसून येते.

या ठिकाणी एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे जेव्हा जेव्हा भारताचा GDP ऋणात्मक किंवा नकारात्मक वाढला तेव्हा तेव्हा शेती क्षेत्रामध्ये सुद्धा ऋणात्मक वाढ झालेली आहे. परंतु 2021 मध्ये विशेष किंवा वेगळी बाब आपल्याला म्हणता येईल ती म्हणजे की GDP मध्ये ऋणात्मक वाढ झाली असेल तरीही शेती क्षेत्रात मात्र धनात्मक वाढ झाली. भलेही मागच्या काही वर्षाच्या तुलनेमध्ये जरी कमी वाढ झाली असेल परंतु शेती क्षेत्राने मात्र 3.63% असा धनात्मक विकासाचा दर गाठला. जरी तो मागच्या वर्षाच्या तुलनेमध्ये कमी होता. पण याचा अर्थ असा नाही की शेती क्षेत्रावर वाईट परिणाम झाला नाही. वाईट परिणाम प्रत्येक क्षेत्रावर झालेला आहे. शेती क्षेत्राचा पुरवठा आणि मागणी अशा दोन बाबींचा विचार ज्या वेळेला केला जातो. त्या वेळी पुरवठा बाजूने एक शेतीक्षेत्राला व्यवस्थित पणे साथ दिली. पुरवठा बाजूला म्हणजे त्यांना उत्पादन करण्यासाठी लागणारा पाणीपुरवठा, बी बियाणे, खत, वित्त या सगळ्या बाबी शेती क्षेत्राला मिळत गेल्या. या महामारीच्या काळामध्ये शेतीक्षेत्राला ह्या आदानांचा पुरवठा झाला. परंतु मागणी बाजूला मात्र थोडा फटका बसलेला दिसून येतो. कारण कृषी क्षेत्रातील किंवा कृषी वस्तूच्या मागणी मध्ये थोड्याफार प्रमाणामध्ये घट झालेली आपल्याला दिसून येते. घरगुती वापरासाठी कृषी मालाची मागणी तर कायम राहिली त्यामध्ये कुठल्याही प्रकारची आपल्याला कमतरता दिसून येत नाही, परंतु कृषी मालाची मागणी फक्त घरगुती वापरासाठी होत नसून, हॉटेल, रेस्टॉरेंट, धाबे, स्ट्रीट शॉप, लग्न समारंभ, रिसेप्शन पार्टी किंवा सार्वजनिक कार्यक्रम किंवा असे अनेक कार्यक्रम घेतले जातात त्यावेळी सुद्धा अशा कृषी व कृषी उत्पादनाला मागणी असते. परंतु कोरोना काळात या कार्यक्रमाला बंद ठेवून किंवा खूप कमी लोकांना परवाणा देऊन मर्यादा घालण्यात आल्या. हॉटेल बंद, रेस्टॉरेंट बंद, धाबे बंद किंवा लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम बंद, त्यामध्ये लोकांचे प्रमाण कमी करण्यात आले अर्थातच त्या ठिकाणी लागणारी कृषी क्षेत्रातील (वस्तूची) अन्नधान्याची मागणी असायची ती निश्चितच घटली. म्हणून शेती क्षेत्राला फटका बसला. फक्त एवढंच म्हणता येईल की इतर क्षेत्राच्या तुलनेत शेती क्षेत्राला कमी फटका बसला. थोड्याफार प्रमाणात सरकारकडूनही मदत या क्षेत्राला देण्यात आली. जसे की न्यूनतम आधारभूत किंमत (MSP) मध्ये थोड्याफार

प्रमाणात वाढ करून व प्रधानमंत्री किसान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खात्यात काही रक्कम टाकण्यात आली. त्यातून थोड्याफार प्रमाणामध्ये शेती क्षेत्राचे नुकसानीचे प्रमाण कमी झाले असे म्हणता येईल. पण एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे की, आताची कोरोनाच्या तिसऱ्या लाटेनंतर 2022 मध्ये कृषी क्षेत्रासाठी सरकार कशाप्रकारचे पावले उचलणार हे महत्त्वाची बाब आहे. कारण सरकारने शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केले तर कदाचित मागणी आणि पुरवठा यामध्ये निर्माण झालेले असंतुलन असेच राहणार आणि शेती क्षेत्राच्या विकासाचा दर कमीच राहणार.

आता एकदम पूर्ववत मागणी निर्माण होण्यासाठी लोकांना पूर्ववत रोजगार आवश्यक आहे. जे लोक या काळात आपले प्राण गमावून बसले त्यांच्यासाठी तर ही हानी भरून न निघणारी आहे. मागणीची कमतरता खूप दिवस आपल्याला भेडसावत राहील म्हणून या क्षेत्रामध्ये आता काही खासगी गुंतवणुकीला चालना मिळायला पाहिजे. त्यातून हळूहळू जीडीपी वाढेल पर्यायाने शेतीक्षेत्राला काही सुविधा मिळायला लागतील. हळू हळू या क्षेत्रामध्ये विकास व्हायला लागेल. विकास होत असताना शेती क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण झाला तर त्या क्षणी त्यांची मागणी निर्माण होईल आणि या कोरोनाचे वाईट परिणाम जे या शेती क्षेत्रावर पडले आहेत त्याची तीव्रता कमी होण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या ठरतील.

### पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्र (Tourism & Hospitality)

आदरातिथ्य म्हणजे प्रवाशांचे स्वागत करणे किंवा घरापासून दूर घर देणे. हा शब्द लॅटिन शब्द "होस्पेस" वरून आला आहे ज्याचा अर्थ पाहुणे किंवा अनोळखी व्यक्ती असा होतो. आदरातिथ्य आणि पर्यटन उद्योग हे एक विशाल क्षेत्र आहे ज्यामध्ये प्रवास आणि पर्यटनासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे योगदान देणाऱ्या किंवा त्यावर अवलंबून असलेल्या सर्व आर्थिक क्रियाकलापांचा समावेश आहे. पर्यटन आणि आदरातिथ्य हे असे क्षेत्र आहे की, लोक एकत्र आल्याशिवाय त्या क्षेत्राचा विकास होत नाही. कोरोना काळात पूर्ण देशात टाळेबंदी केली गेली. याचा या क्षेत्रावर सर्वांत घातक परिणाम झाला. संपूर्णतः हे क्षेत्र नेस्तनाबूत झाले. काही काळानंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यात आली आणि लॉकडाउन संपले व हळूहळू पूर्व स्थिती पूर्वपदावर येत असली तरीही या महामारीच्या दोन वर्षातील पहिल्या वर्षात व नंतरच्या पुढच्या वर्षात वेगवेगळे परिणाम या क्षेत्रावर झालेले आपल्याला दिसून येतात.

जवळपास जानेवारी 2020 पासूनच या क्षेत्राकडे पाठ फिरवायला सुरुवात झाली असे

म्हटले तरी वावगे ठरणार नाही. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ते निश्चितच बरोबर म्हणणे धाडसाचे ठरेल. आपला उदरनिर्वाह करण्यासाठी आपल्याला बाहेर पडून काम करावे लागते आणि हेच या महामारीच्या काळात आपल्याला करता आले नाही. सर्वांना काम करण्यापासून, बाहेर जाण्यापासून रोखले गेले. त्यामुळे निश्चितच पुढील सर्व नियोजन विस्कळीत होऊन गेले यामध्ये मात्र शंका नाही. त्याला काही अत्यावश्यक सेवा हे अपवादही होत्या. परंतु काही बाबी सोडल्या तर पूर्ण अर्थव्यवस्था थांबली म्हणजे अर्थातच विकासाला बांधण्यात आले. ही विकासावर विपरीत परिणाम करणारी बाब ठरली. यावेळी गेलेला रोजगार हा त्या काळातील चार सहा महिने किंवा टाळेबंदी किंवा महामारीच्या काळापुरत्या मर्यादित नाही. तर हा रोजगार या व्यवसायातील लोकांना कायमचाच गमवावा लागला. बाहेर जाऊन काम करण्याच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे हॉटेल, रेस्टॉरंट, रिसोर्ट हे अशाप्रकारची क्षेत्र आहे. पण कोरोनामुळे या टाळेबंदीच्या काळात तर या क्षेत्रावर एक प्रकारे रोड रोलर चढवून त्यांचे अस्तित्वच नष्ट करण्यात आले. 2021 या वित्तीय वर्षात या क्षेत्राची 65 टक्के घट झाल्याचे आढळून आले. म्हणजे या क्षेत्रातील 65 टक्के (रोजगार, उत्पन्न, लाभ, नफा इ.) इंडियन इकॉनॉमी मधून निघून गेला. त्याचे अप्रत्यक्ष, प्रत्यक्ष असे खूप वाईट परिणाम या क्षेत्रावर झाले. हॉस्पिटॅलिटी मधील व्यस्तता संधी लेवळ 18% वर आली. एखाद्या हॉटेल मध्ये 100 खोल्या असतील त्यापैकी १८ खोल्या भाड्याने दिल्या गेल्या आणि उरलेल्या 82 खोल्या मात्र पडून राहिल्या.

'National Restaurant Association of India' यानुसार 40% रेस्टॉरंट या दोन वर्षाच्या काळात बंद पडले. एखाद्या क्षेत्राचा 40 टक्के भाग बंद पडत असेल तर ही किती गांभीर्यपूर्ण गोष्ट आहे हे लक्षात येईल. कारण जगाच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर घट एखाद्या क्षेत्रामध्ये झालेली आढळत नाही. 40 टक्के क्षेत्र नष्ट होणे म्हणजे फक्त त्या क्षेत्राची सेवा नष्ट झाली एवढेच ते मर्यादित त्याची वाईट परिणाम नसतात तर त्या ठिकाणी त्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लाखो करोडो लोकांचे रोजगार बुडाले. त्यांचे कुटुंब जे त्या रोजगाराच्या माध्यमातून चालत होते त्यावर विपरीत परिणाम झाला हे लक्षात घेतले पाहिजे. नंतरच्या काळामध्ये काही रेस्टॉरंट उघडले जात आहेत पण त्यांच्यासाठी असलेल्या अटी नियम ह्या बाबी मुळे ते पूर्ववत होऊ शकले नाही. उदा. लसीकरण, सोशल डिस्टंसिंग किंवा इतर काही नियम असतील ते त्यांना नियमांचे काटेकोर पालन करूनच त्या ठिकाणी प्रवेश दिला जातो. आता कुठल्याही हॉटेलवर कोरोना येण्या आधी सारखी परिस्थिती राहिली नाही. 2022 मध्ये ही क्षेत्र पूर्णपणे खुले

केले आहे तरी आजही बरेच लोक त्या क्षेत्रांमध्ये सेवा घेण्यासाठी  पहिल्या सारखी जात नाहीत. परंतु तरीही काही रेस्टॉरेंट व हॉटेल यांनी हळूहळू का होईना आपला पूर्वीचा जम बसवायला सुरुवात केली. सुरुवात करत असताना काही रेस्टॉरेंट सुरू झाले आणि आपल्या पायावर पुन्हा उभे राहण्यासाठी तयार झाले. आणि कोरोनाची दुसरी लाट आली मात्र यावेळी या क्षेत्राची पूर्ण कंबर मोडून गेली. दुसऱ्या लाटेच्या माध्यमातून तर या क्षेत्राला सावरणे खूप कठीण गेले कारण पहिल्या लाटे मध्येच 40% हॉस्पिटॅलिटी आधी  नष्ट झाले होतं. उरलेले 60% त्यातल्या काही हॉटेल्स रेस्टॉरेंट ने पुन्हा प्रयत्न करून आपली आर्थिक बाजू सक्षम करण्याच्या मार्गावर सुरू होतात तोच दुसरी लाट आली त्यानंतर पुन्हा अजून कोरोनाची तिसरी लाट आली आणि या क्षेत्राला पूर्ण धुळीस मिळवले.

या क्षेत्रातील एक बाजू सांगितली जाते की झोमॅटो आणि स्विगी सारखी जे काही होम डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्या आहेत त्यातून त्यांना मात्र थोडाफार प्रमाणामध्ये फायदा झालेला दिसून येतो. Mid covid 19 च्या रिपोर्ट नुसार त्यांचा व्यावासात सकारात्मक झाला. कारण की आउटडोर डायनिंग पूर्ण बंद होते जे काही ऑर्डर व्हायची ती पूर्णता याच  चॅनेलच्या माध्यमातून व्हायची. हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल रेस्टॉरेंट यांचा व्यवसाय हा डायनिंग वर चालणारा, म्हणजे तिथे येऊन खाणाऱ्यांच्या भरवशावर चालणारा असतो. एवढे असूनही मात्र सरकारने कुठलीही मदत या क्षेत्राला न देता त्यांच्या समस्येत वाढ केली. रेस्टॉरेंट इंडस्ट्रीची अपेक्षा होती की बजेटमध्ये तरी त्यांना काही ठोस मदत करण्यात येईल. पण आतापर्यंत कुठलाही निर्णय सरकारकडून या क्षेत्राच्या द्रुष्टीने सकारात्मक  पाहायला मिळाला नाही.  रोजगार व त्यातून त्यांचे लाखोंचे होणारे नुकसान या सगळया बाबीला कोरोना मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरला असे आपल्याला म्हणता येईल.

पर्यटन क्षेत्राला बाहेर गेल्याशिवाय फायदा मिळू शकत नाही. पर्यटन म्हटल्यानंतर आपल्याला बाहेर जावं लागेल आणि बाहेर जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हरकती घेण्यात आल्या होत्या. पर्यटन तर सोडाच एखाद्या जिल्ह्याच्या बॉर्डर मधून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जाणे सुद्धा त्या वेळी कठीण होऊन बसलं होत. काही लोक जे बाहेर गेले ते बाहेरच राहिले आणि त्यामुळे पर्यटन व्यवसाय  पूर्णपणे डबघाईला आल्याचे आपणास दिसून येते.  पर्यटन क्षेत्रामध्ये जो रोजगार होता त्यातील  60-65 टक्के रोजगार या कोरोनाच्या काळामध्ये नष्ट  झाल्याचे आपल्याला अनेक अहवालांच्या माध्यमातून दिसून येते.  इतिहासात आजपर्यंत एखाद्या पर्यटन स्थळ सुरु झाल्यानंतर ते इतक्या कालावधीसाठी बंद पडलेलं आपण कधी अभ्यासलेलं  नसेल किंवा ऐकलं नसेल. म्हणजे अनपेक्षित असा वाईट

परिणाम या पर्यटनाच्या क्षेत्रावर हॉटेल रेस्टॉरेंट वर पडलेला आपल्याला दिसून येतो

**दारिद्र्य आणि बेरोजगारी : (Poverty & Unemployment)**

कोरोना महामारीचा ज्या विविध क्षेत्रांवर परिणाम झाला त्यातील एक क्षेत्र म्हणजे दारिद्र्य आणि बेरोजगारी होय. कारण आर्थिक क्रियाकलाप मधील घट आणि व्यवसायामधील टाळेबंदीमुळे 23 ते 24 टक्के रोजगार कमी झाले. कोरोनाची दुसरी व तिसरी लाट असताना आपल्याला समजून आले आहे की, आता आपल्याला यापासून वेगळे राहून अर्थव्यवस्था चालवता येणार नाही. म्हणून कोरोना सोबत समायोजन करून कार्य करावे लागेल असे गृहीत धरल्या गेले. त्यातूनच आर्थिक क्रिया वाढवल्या जात आहेत. पण तरीही मात्र अजीम प्रेमजी युनिव्हर्सिटी सेंटर फॉर सस्टेनेबल एम्प्लॉयमेंट नी अधोरेखित केले की, कशा प्रकारे उत्पन्न आणि रोजगार हे महामारी पूर्वीच्या स्थिती पर्यंत पोचू शकला नाही. महामारी मुळे घसरलेला विकासदर अजून सुद्धा पूर्वस्थितीत आला नाही. त्याच प्रकारे दुसरा रिपोर्ट 5 मे 2021 ला स्टेट ऑफ वर्किंग इंडिया 2021 चा One Year of Covid-19 आला त्यामध्ये त्यांनी असे स्पष्ट केले की, या आजच्या पूर्ण वर्षांमध्ये महिलांनी पुरुषांच्या तुलनेत जास्त रोजगार गमावला आहे. 47 ते 50 टक्के स्त्रियांना रोजगार गमवावा लागला आहे. तसेच जवळपास अर्धे औपचारिक रोजगार करणाऱ्या लोकांना अनौपचारिक रोजगाराकडे वळावे लागले, म्हणजे औपचारिक रोजगारात 50 टक्के घट झाली. यावरून असे स्पष्ट होते की, कोरोना महामारी आणि टाळेबंदीची सर्वात जास्त मार कोणाला बसली असेल तर ते म्हणजे गरीब वर्गाला होय. आधीच त्यांना उत्पन्नाचे साधन मर्यादित आणि त्यातून तेही त्यांच्या हातून गेल्यामुळे त्याची बचतच नसताना त्यांना या संकटाचा सामना करावा लागला. प्रस्तुत रिपोर्ट हे सांगतो की, देशातील दोनशे तीस दशलक्ष म्हणजे 23 करोड भारतीय या महामारीच्या प्रभावामुळे राष्ट्रीय किमान मजुरी गरिबी रेषेच्या खाली गेले आहेत.

कोरोना महामारी मध्ये टाळेबंदी सुरू झाल्यामुळे सर्वांना घरात थांबावे लागले. बहुतांश लोकांचा रोजगार आणि धंदे बुडाले. गाड्यावर माल विकणारा, सलून वाला, प्रेस वाला तसेच काही दैनंदिन काम करणारे छोटे मोठे दुकानदार त्यांना त्यांचे व्यवसाय धंदे बंद करावे लागले. हे व्यावसायिक जर पन्नास ते साठ दिवस काम नाही करणार तर त्याचे कुटुंब कसे चालवायचे? तसेच जे काही अनौपचारिक रोजगारा वाले जसे की पाणीपुरीवाले वेगवेगळ्या ठिकाणी काही काळापुरते दुकान लावणारे बाहेर एखाद्या बाजारात जाऊन विकणारे असे सर्व व्यवसाय करणारे कोरोना काळात मोठ्या आर्थिक संकटात सापडले. त्याच

बरोबर टाळेबंदी काळामध्ये श्रम संकट निर्माण झाले. मजुरांना आपल्या कामाच्या ठिकाणावरून पाचशे ते हजार किलोमीटर पायी आपल्या गावी जावे लागले. हे सर्व लोक राष्ट्रीय किमान मजुरी सीमारेषेच्या जी 375 रुपये प्रतिदिन अनुप सत्यप्रती समितीच्या शिफारशी नुसार, एका महिन्याचे 9750 एवढे पैसे तरी मिळेल अशा लोकांना राष्ट्रीय किमान मजुरी सीमारेषा असे म्हटले जाते. हे 9750 रुपये एका महिन्याचे चार व्यक्तीच्या कुटुंबासाठी त्यांनी ठरवून दिले होते. म्हणजे ते एका व्यक्तीचे उत्पन्न नसून चार व्यक्तींसाठी कुटुंबाला तेवढे म्हणजे जवळपास दहा हजार रुपये प्रति महिना मिळायला पाहिजे अशी अपेक्षा होती. एका व्यक्तीचा जर विचार केला तर एका दिवसाला शंभर रुपये पेक्षाही कमी ही रक्कम येते. या रिपोर्ट नुसार 23 करोड लोक यापेक्षा खालच्या पातळीवर आले आहेत. आधीच तर आपण अंत्योदय योजना, BPL यांच्या माध्यमातून गरिबांचा आकडा किती मोठा आहे हे समजू शकतो. त्यामध्ये 23 कोटी लोकांची भर पडली. म्हणजे पहिलेच 25 ते 26 कोटी आणि त्यात 23 कोटीची भर पडली आणि सर्वात जास्त परिणाम या 23 कोटी लोकांवर झाला. कारण बीपीएल व अंत्योदय योजना असणाऱ्या लोकांना काही प्रमाणात अन्नधान्य पुरवठा पुरवले गेले. पण या 23 कोटी लोकांना जे कोरोनाच्या काळात या रेषा खाली आले. त्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीचा लाभ तर मिळाला नाहीच व त्यांच्याजवळील व्यवसाय आणि रोजगार पण गेला. तसेच त्यांनी आपल्या पूर्वीचा रोजगार किंवा मजुरीच्या भरवशावर काही घर खर्चासाठी कर्ज घेतली, परंतु नंतर ज्या वेळेला टाळेबंदी कमी झाली किंवा जी बंधने होती ती कमी करण्यात आली तेव्हा हे लोक जेव्हा परत आपल्या कामाच्या ठिकाणी गेले त्या वेळेला त्यांना तिथे रोजगार मिळाला नाही. रोजगार मिळाला नसल्यामुळे ते पूर्वीचे कर्ज परत करू शकले नाही. कर्जातून कर्ज वाढत गेलं हे लोक कर्जाच्या सापड्यात अडकत गेले. 2022 मध्ये साऊथ आफ्रिकेमध्ये चौथी लाट आल्याचे सांगितल्या जात आहे. महामारीच्या शेवटच्या स्थितीमध्ये किंवा उतरत्या स्थितीत असलो, तरीही खूप महत्त्वाच आहे की मागच्या दोन वर्षात कोण प्रभावित झाले. कसे प्रभावित झाले आपण कुठले कार्य केले, ते कितपत कार्यात्मक ठरले किंवा योग्य ठरले. तसेच सरकारने गरिबांसाठी ज्या काही उपाययोजना केल्या त्या प्रत्यक्षात त्या गरिबा पर्यंत पोहोचल्या का? वास्तविक पाहता सरकारने दुसऱ्या लाटेच्या वेळी आपण कोरोनाच्या लास्ट स्टेजमध्ये आहोत असं सांगितले, पण ते साफ खोटं ठरलं.

**कोरोना पूर्व स्थिती (Pre-Pandemic Stage)**

2016 ची नोट नोटबंदी, 2017 च्या जीएसटीची अयोग्य अंमलबजावणी अशा

संकटातून आधीच भारतीय अर्थव्यवस्था मंदी कडे झुकलेली होती, रोजगार निर्मिती मध्ये प्रचंड घट झालेली होती. विषम आर्थिक विकास अशा समस्या आधीपासून होत्या आणि त्यातच कोरोनाची भर पडली. कोरोना प्रभाव त्यातून संपूर्ण मानव जातीवर खूप मोठा विपरीत परिणाम झाला. विशेषता छोटे व्यापारी, बांधकाम आणि वाहतूक या क्षेत्रावर मोठा परिणाम दिसून येतो. छोटे व्यावसायिक जे वेगवेगळया वस्तू घेऊन रस्त्यावर बसणारे, खाली छोट दुकान लावून बसणारे, खोका लावून बसणारे, अस्थिर व्यवसाय करणारे जे लोक आहेत ते पूर्ण संकटात गेले. तर बांधकाम कामगार पण त्याच स्थितीत गेले. बांधकाम क्षेत्रातील काम धंदे बंद पडून शहरातील हजारो-लाखो स्थलांतरित कामगार होते ज्यांना गावाकडे परत यावे लागले. वाहतूक व्यवसायामध्ये काम करणार्यांची स्थिती काही वेगळी नाही. कारण वाहतूक व्यवसायामध्ये काम करणारे लोक जे ट्रक्स , ट्रॅव्हल्स चालवणारे ड्रायव्हर, मेकॅनिक त्यांच्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊन त्यांच्या नोकऱ्या गेल्या. यामुळे 23 कोटी लोक किमान मजुरी दरापेक्षा खाली गेले. त्यांना कुठलेही संरक्षण नव्हते ना कुठलेही आरोग्य लाभ, नाही निवृत्ती वेतन होते. तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली चे फायदे खालच्या वर्गाला मिळतील परंतु तेथील रहिवासी असावे पण जर युपी बिहारचे लोक महाराष्ट्रात येऊन काम करत असतील तर त्यांना ह्या सोयी सुविधा मिळत नाहीत. म्हणजे यामधून जे गरीब होते ते अजूनच गरीब झाले. कोरोना महामारीला एक-दीड वर्ष उलटून गेले पण अजून पर्यंत कोरोना पूर्वस्थिती निर्माण होऊ शकली नाही. थोड्या प्रमाणात शिथिलता करण्यात येते न येते तोच दुसरी लाट तिसरी लाट येऊन अशा रोजगारावर प्रभाव पाडत गेली. महिलांसाठी तर अजूनच बिकट परिस्थिती या रिपोर्टमध्ये निदर्शनास येते. 46.6 टक्के महिलांचे रोजगार कायमचे गेले म्हणजे त्या महिला परत त्यांच्या नोकरीवर जाऊ शकल्या नाहीत. अर्थात पन्नास टक्के महिला बेकार झाल्या. पुरूष तरी काही तडजोड करून छोट्या-मोठ्या ठिकाणी नोकरी करायला लागले.

सदर अहवालामध्ये या परिस्थितीवर उपाय म्हणून काही सूचना केलेल्या आहेत.

1) या 23 कोटी लोकांना मोफत राशन देण्यात यावे.

2) राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमधील 100 दिवसांची हमी 150 दिवसाची करण्यात यावी.

3) महिलांसाठी काही विशेष योजना करण्यात याव्यात.

4) मौद्रिक आणि राजकोषीय नीतीच्या माध्यमातून काही उपायोजना कराव्या.

**बालकामगार आणि श्रम शक्ती (Child Labour & Labour Force)**

बालमजुरी म्हणजे कोणत्याही प्रकारच्या कामाद्वारे मुलांचे शोषण जे मुलांना त्यांचे बालपण हिरावून घेते, त्यांच्या नियमित शाळेत जाण्याच्या क्षमतेत अडथळा आणते आणि मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या हानिकारक असते. कोरोना महामारीचा बालकामगार आणि श्रम शक्ती वर नकारात्मक परीणाम झाल्याचं दिसते. भारतात बाल मजूर एक करोड पेक्षा जास्त आहेत. कोरोना महामारी च्या काळात यामध्ये आणखी भर पडली आहे. आरोग्यास हानिकारक उद्योगामध्ये मुलांना जाऊ दिले जात नाही. परंतु या काळात अशा ठिकाणीपण हे मजूर ढकलल्या गेले. 2021 च्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) आणि युनिसेफच्या (UNICEF) रिपोर्ट नुसार 2022 च्या शेवटपर्यंत जगातील चाईल्ड लेबर मध्ये नऊ दशलक्ष बाल मजूर जास्तीचे वाढतील. भारतात कोरोना काळात जवळपास दोन वर्षे शाळा बंद होत्या. आर्थिक संकट आल्यामुळे शहरात राहणारे लोक स्थलांतर करून गावात गेले. त्या ठिकाणी त्यांच्या योग्यतेचे काम त्यांना मिळाले नाही. त्यातून त्यांना कोणतेही काम करण्याची गरज भासली. कारण हे पूर्ण असुरक्षित स्थलांतर म्हणाव लागेल.असुरक्षित स्थलांतरतून बाल मजुरांच्या संख्येमध्ये वाढ झाली.

बालकामगार च्या बाबतीत भारतामध्ये दोन तरतुदी आहेत

1) राज्यघटनेतील कलम 24

2) बालकामगार प्रतिबंधक व नियमन कायदा 1986

**कलम 24**

कलम 24 नुसार 14 वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणतेही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही. अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्याला लावले जाणार नाही. यावरून हे कलम धोका नसलेल्या कामावर बालकास कामावर जाण्यास प्रतिबंध करत नाही.

**बालकामगार प्रतिबंधक व नियमन कायदा 1986**

बालकामगार प्रतिबंधक व नियमन कायदा 1986 हा त्याविषयीचा सर्वात महत्त्वाचा कायदा आहे, इतरही कायद्याअंतर्गत बालकामगारांचे संरक्षण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. संविधानात चौदा वर्षापर्यंत उल्लेख होता. या कायद्यामध्ये बालक कोणाला म्हणायचं? याची व्याख्या त्याबद्दलचं कायद्यात तरतुदी केलेल्या आहेत. 2016 मध्ये या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन

14 ते 18 पण बालक असणार आहे अशा पद्धतीची व्याख्या केलेली आहे. ILO नुसार 2017 ते 2021 पर्यंत दरवर्षी पन्नास हजार चाईल्ड लेबर कमी होत आहेत. मागील शतकात बालकामगार 38 टक्क्यांनी घटले. दरवर्षी जवळपास पन्नास हजार बालकामगार बाहेर काढले जात होते. हे बालकामगारांचे प्रमाण कमी होत त्यात सुधारणा होत होती. जागतिक पातळीवर मागच्या दशकात यामध्ये 38 टक्के घट झाली. वेगवेगळे NGOs त्यासाठी प्रयत्न करत आहेत. थोडक्यात बालकामगारांचे प्रमाण कमी करण्यात आपण यशस्वी होत असतांनाच परिस्थिती अशी झाली की, कोरोना काळात 27 कोटी विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अशक्य झाले. ILO च्या रिपोर्टनुसार, 2022 मध्ये 90 लाख मुलं बालकामगार मध्ये वळतील जे या महामारीच्या आधी शाळेत होते. कोरोनाच्या काळात त्याचं शिक्षण बंद पडलं व त्यातून हे बालकामगार वाढले, विरुद्ध स्थलांतरणामुळे (reverse migration) जे शहरातून गावात आले ते गावात रोजगार नाही म्हणून मिळेल ते काम करायला लागले त्यांच्या सोबत त्यांची मुलं मदत म्हणून कामाला लागले. त्याच बरोबर शहरातीलही काही अशा वस्त्या असतील की, ज्या ठिकाणी लहान मुलं आहेत त्यांना शिक्षण उपलब्ध होऊ शकले नाही. आई वडिलांची नोकरी गेली, कमावण्याचे साधन गेले ते एखाद्या छोट्या मोठ्या कामातून काही तरी कमावतात घर चालवतात त्यांना त्याची ही लहान मुलं हातभार लावण्यातून बाल कामगार वाढत गेल्याचे दिसून येते. कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे आभासी शिक्षण घेता येऊ शकत नसल्याकारणाने रिकामे झालेले आणि आई-वडिलांचा रोजगार गमावलेले सगळी मुलं पर्यायाने त्यांच्यासोबत कुठल्या ना कुठल्या कामांमध्ये गुंतून गेल्याचे चित्र दिसून येते . यामुळे श्रम शक्तीचे प्रमाण वाढेल हा खूप मोठा परिणाम होईल. असे रिपोर्ट मध्ये वर्तविले आहे. त्याचबरोबर त्यांच्या आरोग्यावर तर हानीकारक प्रभाव होईलच परंतु देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होईल यात शंका नाही.

**पर्यावरणावरील परिणाम (Environment Effect)**

पर्यावरणावर कोरोना विशेषता टाळेबंदीचा सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते. टाळेबंदी च्या काळात हवेतील प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले. पंजाबच्या जालंदर पासून हिमालयाच टोक दिसायला लागले होते. जे 140 किलोमीटर दूर आहे म्हणजे वीस तीस वर्षात पहिल्यांदा हवा एवढी स्वच्छ झाल्याचे दिसून आले. फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरातील हवेतील प्रदूषणाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले. नायट्रोजन डायॉक्साईड

(NO2) हे अशी एक टॉक्सिक वायू आहे जी गाडीच्या इंजिन, फॅक्टरी मधून निघते. WHO च्या नुसार ही गॅस 200 मायक्रो ग्रॅम पर क्युबिक सेंटर कॉन्सन्ट्रेशन मध्ये असेल तर आपल्या श्वासोच्छवासावर त्याचा वाईट परिणाम होतो. त्यातून प्राणघातक रोग निर्माण होऊ शकतात, जसे अस्थमा, दमा, फुफ्फुसाचे रोग, परंतु कोरोना टाळेबंदीच्या काळात रोडवरील गाड्या तसेच कंपन्या सर्व बंद झाल्यामुळे जगभराच्या शहरांमध्ये NO2 चे कॉन्सन्ट्रेशन खूप कमी पातळीवर आले. यामध्ये चीन , स्पेन, इंग्लंड, इटली आणि हीच स्थिती भारतीय शहरांमध्ये पण दिसून आली. दिल्ली, मुंबई, चेन्नई, हैदराबाद, बंगलोर हळुहळु या ठिकाणी या टॉक्सिक गॅसचे प्रमाण कमी कमी होत गेले.

दिल्ली जल बोर्डचे व्हाईस चेअरमन श्री राघव चड्डा यांनी आपल्या वक्तव्यामध्ये औद्योगिक वेस्टेज कमी झाल्यामुळे यमुना नदीच्या शुद्धतेत भर पडली असे सांगितले. आणि त्यातून आपल्याला एक बाब लक्षात घ्यायला पाहिजे की, सरकारने जर व्यवस्थित औद्योगिक वेस्ट ची विल्हेवाट लावली तर भविष्यात पाण्याच्या प्रदूषणाची समस्या खूप कमी करता येवु शकते. एकच नाही तर सर्व नद्या, तलाव, तळी, धरणे प्रदूषित झाले होते. त्याच्या प्रदुषणातही कमी आलेली आपल्याला या काळामध्ये दिसून येते. त्याचबरोबर पर्यावरणामधील कार्बन-डाय-ऑक्साइडचे (CO2) प्रमाणही कमी झालेले आपल्याला त्या काळात दिसून आले. एकंदरीत पर्यावरणावर कोरोना कालावधीचा सकारात्मक परिणाम आपल्याला दिसून येते. परंतु ते परिणाम मात्र आपल्याला दीर्घकालीन बनवता येते का? त्याला दीर्घकालीन स्वरूप कसे देता येईल? याकडे आपले लक्ष असायला पाहिजे कारण जशी टाळेबंदी शीथिल झाली. पुन्हा कारखाने आणि वाहतुकीचे साधने सुरू झाली. आणि CO2 चे प्रमाण वाढायला लागले आहे. परंतु मधल्या काळात झालेला चांगला परिणाम जर आपण लक्षात ठेवून समोरचे पावले उचलली तर आपल्याला प्रदूषण कमी करता येवु शकते. तसेच या काळामध्ये ज्या वस्तू वापरल्या गेल्या जसे वेगवेगळ्या किट्स, मास्क, सानिटायझर बॉटल , प्लास्टिक अशा वस्तूची विल्हेवाट आपण कशा पद्धतीने लावली ही मोठी नजरेत न येणारी बाब आहे. तो एक पर्यावरणाचा नकारात्मक परिणाम झाला असे आपल्याला म्हणता येईल.

**कोरोना महामारीचे इतर सर्वसाधारण परिणाम**

**ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्व कळले**

या महामारी च्या काळामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेची ताकद जगाला दिसली महामारी चा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये तुलनात्मकदृष्ट्या

कमी पाहायला मिळतो आणि त्याचबरोबर त्या ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जुळलेले क्षेत्र ती सुद्धा कमी प्रमाणात आपल्याला प्रभावित झालेले दिसतात. वित्तीय वर्ष 2021 च्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये कृषीचा विकास दर 3.4 टक्के आणि या काळा मधले एकमेव एकमेव क्षेत्र आहे जे सकारात्मक दृष्टीने वाढत गेलेले आहे.

**उपभोक्त्या खर्चाच्या स्वरूपामध्ये बदल झाला**

एचडीएफसी बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ अभिक बरुवा यांच्यामते महामारीच्या काळामध्ये उपभोक्त्याच्या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाल्याचे दिसून येतात. घरांमध्ये राहण्याचे निर्देश असतील, सामाजिक अंतर असेल, Work from Home असेल यांच्या माध्यमातून उपभोक्त्यांच्या व्यवहाराची पद्धत बदलत गेली. म्हणजे सोशल डिस्टंसिंग मुळे स्वतःचं वाहन खरेदी करण्यावर उपभोकत्याचा भर दिसतो. त्यामुळे ऑटो सेक्टरला बळ मिळालं, त्याच बरोबर Online Shopping, ऑनलाइन सेवा, E-education, कन्सल्टान्सी या संदर्भामध्ये सुद्धा मागणी वाढली. त्याच बरोबर काही अशी क्षेत्रे आहेत की त्यांची गरज आपल्याला या काळात पडली त्यामध्ये लॅपटॉप, कॉम्प्युटर, स्मार्टफोन आणि इतर इलेक्ट्रोनिक साहित्य इ. यांच्या मागणीमध्ये मोठी वाढ झालेली आपल्याला दिसून येते.

**बचतीची सवय लागली**

Gross capital formation consists of outlays on additions to the fixed assets of the economy plus net changes in the level of inventories. Fixed assets include land improvements; plant, machinery, and equipment purchases; and the construction of roads, railways and alike, including schools, offices, hospitals, private residential dwellings, and commercial and industrial buildings. Inventories are stocks of goods held by firms to meet temporary or unexpected fluctuations in production or sales, or "work in progress." The growth rate of gross capital formation from budgetary resources of the central government is presented in figure no. 2. This data include the gross capital formation by the central government (in fixed assets and work stores) and gross financial assistance for capital formation (to state governments, non-departmental commercial undertakings, and others) during the last decades, it showed huge fluctuation. It showed a growth of 64 per cent in 2007-08 before 2008 crisis and touched a low of – 24 per cent due to the covid-19 pandemic. (See Figure No.2)

**Figure No. 2**
**Growth in Gross Capital Formation in India**




**Source-** (RBI, Handbook of Statistics on Indian Economy 2020-21, 2021)

**Composition of Industrial Sector in GDP and Employment**

Composition of the industrial sector in GDP and employment shares of manufacturing, electricity, gas, water supply, and other utility services, as well as construction, are considered secondary or industrial sectors. The industrial sector contributes 26 percent to GVA for the year 2021. It was merely 15 percent in 1951. Similarly, the share of the industrial sector in employment was 10.7 percent in 1951 and reached up to 23.7 percent in 2021. After the new economic policy was implemented, the rate of growth in employment generation in the industrial sector increased compared to previous years. (See Figure No. 3)

According to the economic survey, the industrial sector is to witness a sharp rebound from a contraction of 7% in 2020–21 due to the pandemic to an expansion of 11.8% in 2021–22. The manufacturing, construction, and mining sub-sectors went through the same swing, although the utilities segment experienced a more muted cycle as basic services such as electricity and water supply were maintained even at the height of the national lockdown. The share of industry in GVA is now estimated at 28.2 percent. (GOI, 2022)

There are two common themes in India's supply-side strategy: first, reforms that improve flexibility and innovation in order to deal with the long-term unpredictability of the post-Covid world. This includes factor market reforms such as deregulation of sectors like space, drones, geospatial mapping, and trade finance factoring; process reforms like those in government procurement and in the telecommunications sector; the removal of legacy issues like retrospective tax; privatisation and monetization; the creation of physical infrastructure; and so on. A second reform is aimed at improving the resilience of the Indian economy. These range from climate-related policies; to social infrastructure such as the public provision of tap water, toilets, basic housing, insurance for the poor, and also support for key industries under Atmanirbhar Bharat and start-up India.

**Figure No. 3**

**Composition of Industrial Sector in GDP and Employment in India**




Source- (GOI, 2022)

**Index of Industrial Production (IIP)**

The Index of Industrial Production (IIP) is a composite indicator used to measure the short-term changes in the volume of production of a basket of industrial products over a period of time. The Central Statistical Organization, now known as the National Statistics Office

(NSO), was established in 1951 and is responsible for the compilation and publication of IIP in India every month. IIP indicates the performance of various industrial sectors of the Indian economy. The industry groups are classified under broad sectors (manufacturing, mining, electricity, etc.) and use-based sectors (capital goods, basic goods, intermediate goods, infrastructure goods, consumer durables, and consumer non-durables). The eight core industries, including electricity, steel, refinery products, crude oil, coal, cement, natural gas, and fertilizers, represent about 40 percent of the weight of items in IIP. As per the latest published data, India's factory output based on the IIP grew by an annual 7.1 percent for the month of November 2022. The Quick Estimates of the Index of Industrial Production (IIP) are usually released on the 12th of every month with a six-week lag and compiled with data received from the producing factories and establishments.

The rise in factory output measured by the IIP comes after a contraction of 4.2 percent in October 2022. The previous high was recorded in June 2022 at 12.6 percent. As per the IIP data released by the NSO, the manufacturing sector's output grew by 6.1 percent in November 2022. The growth in power generation increased by 12.7 percent in November 2022. (Business Standard, 2023)

**Figure No. 4**
**Annual Growth Rate of IIP in India**




Source - (GOI, IIP data, 2022)

As per the use-based classification, the capital goods segment recorded an impressive annual growth of 16.9 percent in 2021–22 against a decline of 18.6 percent in the previous year. Consumer durables and consumer non-durables

recorded growth rates of 12.5 percent and 3.2 percent, respectively. Both these segments reported contraction in the previous year 2021-22. Infrastructure/construction goods too posted healthy growth of 18.8 percent as against – 8.7 percent compared to the previous year. The data also showed that the output of primary goods and intermediate goods improved by 9.7 percent and 15.4 percent, respectively, in 2021–22. (See figure no. 4)

The IIP also provides data for 23 subgroups of the manufacturing sector. The major industrial groups like textiles, wearable apparel, electrical equipments, and motor vehicles staged a strong recovery. Improvements in the performance of textiles and apparel, which is a labour-intensive industry, have significant implications for employment creation.

**Balance or Unbalance of Regional Development**

The industrial sector also played an important role in developing the regional areas. Industries established in rural areas and backward areas are responsible for the development of the area and employment generation activities. Ultimately, this helps in the overall development of the regions. Contrary to this, it is observed that the establishment of such industries limits development activities to certain regions only. Instead of spreading development among the regions, it increased the disparities among the regions.

**Industrialization leads to urbanization.**

Mass production replaces manual and specialised laborers. This led to urbanisation by generating employment opportunities and creating economic growth. Generally, urbanisation begins when one or more factories are established within a region and create employment opportunities for the nearby factory labourers. Supply chains of factory products create more jobs and demands from households, and the technological hub industry established in urban areas. Manufacturing, production, processing of textiles, food, and natural resources, employment, commercialization, development of infrastructure, and population growth are leading factors for urbanisation.

**Conclusion**

Industrial development has been an important segment of economic growth. Increased industrial output has been associated with technology, the productivity of labour, export promotion, increased trade opening, economic liberalization and an improved business climate in the countries. Many policies have been adopted, such as export promotion, financial assistance for any

industry, and selective government intervention. Indian economy experienced many changes in the process of growth over a period of 75 years. We have achieved tremendous growth in agricultural productivity, but agribusiness has made us unhappy. The industrialization of the market eliminates this difference. Whatever we achieved in the primary sector, we did with the support of the industrial sector only. The first and most important argument for industrialization is that it can create employment opportunities on the basis of rapid wage growth. This is a direct result of the fact that profitability is higher in the industry than in agribusiness. It is also observed that developed countries have higher per-person wages compared to other countries. The rapid development of capital-producing enterprises drives the development of the agricultural sector, transportation, communications, etc. The industrial sector also allows countries to create a selection of buyer items at high volumes at low cost and eliminates dependency on the primary sector.

**References:**

Business Standard. (2023, January 12). *Industrial Production expands by 7.1 percent in Nov 2022 vs -4 percent in Oct* . Retrieved from Business Standard epaper: https://www.business-standard.com/article/economy-policy/industrial-production-expands-by-7-1-in-november-vs-1-yoy-govt-data-123011200980_1.html

GOI. (2022). *Economic Survey 2021-22.* New Delhi: Government of India, MInistry of Finance, Department of Economic Division.

GOI. (2022, January 27). *IIP data*. Retrieved from Ministry of Statistics and Programme Implementation: http://164.100.161.63/iip

RBI. (2021, June 21). *Handbook of Statistics on Indian Economy 2020-21*. Mumabai: Reserve Bank of India. Retrieved from Ministry of Statistics and Programme Implementation: https://www.mospi.gov.in/download-tables-data

RBI. (2022). *Handbook of Statistics on Indian Economy 2021-22.* Mumbai: Reserve Bank of India. Retrieved from Ministry of Statistics and Programme Implementation.

# भारताचे सेवा क्षेत्र: प्रवेशद्वार आर्थिक वृद्धीचे

**प्रशांत हरमकर**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती

**प्रस्तावना:-**

अविकसित देशात ज्यावेळी विकासाची प्रक्रिया सुरू होते. त्यावेळी त्या देशांच्या अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारचे बदल घडून येतात. या बदलांमध्ये संरचनात्मक बदल फार महत्वाचे असतात. भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाची प्रक्रिया 1951 पासून सुरू झाली. 1991 पासून नविन आर्थिक सुधारणा अंमलात आणण्यात आल्या. यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडून आले. विविध क्षेत्रातील मिश्र अंतर्गत उत्पादातील वाट्यामध्ये बदल घडून आला. यांच्या साह्याने संरचनात्मक बदलांना स्पष्ट करता येते. तसेच विविध क्षेत्रामध्ये बदल घडून आले त्यामुळे रोजगारात बदल घडून आले आहे. या अनुषंगाने सेवा क्षेत्रातील बदलाचे विवेचन करता येते.

अर्थव्यवस्थेमध्ये समग्र देशीय उत्पाद (Gross Domestic Product – GDP) विविध उद्योग व व्यवसायातून निर्माण होते. या सर्व उद्योग व व्यवसायचे वर्गीकरण तीन गटामध्ये करता येते. प्राथमिक क्षेत्र-शेती, खाणी, मत्सव्यवसाय इत्यादी, द्वितीय क्षेत्र-मोठे उद्योग, लघु उद्योग, वीज निर्मिती इत्यादी तर तृतीय क्षेत्र-व्यापार, वाहतुक, दळणवळण वित्तीय सेवा, वैयक्तिक सेवा, सामाजिक सेवा इत्यादीचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू होते त्यावेळी समग्र देशीय उत्पादामध्ये या तिनही क्षेत्राचा वाटा बदलत जातो. तसेच क्षेत्रनिहाय रोजगाराचे प्रमाण बदलत जाते. विशेषतः नवीन आर्थिक धोरणानंतर सेवा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहे. या बदलाचा आढावा प्रस्तुत लेखामध्ये घेतला आहे.

**भारताच्या सेवा क्षेत्राचे स्वरूप व प्रवृत्ती:-**

प्राथमिक व द्वितीय क्षेत्राच्या विकासाला पूरक असणारे क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्र होय. आर्थिक विकासाबरोबर समग्र देशीय उत्पादाचा वाटा वाढत गेलेला आहे. 1950 च्या दशकामध्ये समग्र देशीय उत्पादामध्ये (जी.डी.पी.) सेवा क्षेत्राचा वाटा 29 प्रतिशत होता. 2011 मध्ये हा वाटा 45 प्रतिशत झाला तर 2021-2022 मध्ये हा वाटा वाढून 53 प्रतिशत झाला. सेवा क्षेत्रावर नवीन आर्थिक धोरणाचा पूर्णतः अनुकूल परिणाम दिसून आला. नवीन आर्थिक धोरण पूर्व काळात सेवा क्षेत्राचा आर्थिक वृद्धीचा दर 6.63 प्रतिशत होता. नवीन आर्थिक धोरणानंतर (1991-2000) मध्ये सेवा क्षेत्राचा वृद्धी दर 7.71 प्रतिशत झाला. तर 2021-

2022 मध्ये सेवा क्षेत्राचा वृद्धी दर 10.8 प्रतिशत असल्याचे दिसून येते.

नवीन आर्थिक धोरणाच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचे संरचनात्मक बदल लक्षात घेऊन पूर्व राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि राजन यांनी संयुक्तपणे लिहलेल्या "India 2020: AVision for the Millennium" या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, अर्थव्यवस्थेतील तीन क्षेत्रामधील परस्पर पूरकता अधिक दृढ होत जाईल. नवीन तंत्रज्ञानाचा प्राथमिक व द्वितीय क्षेत्रात वापर होऊन सेवा क्षेत्राची वाढ वेगाने होईल.

सेवा क्षेत्रामध्ये दुरूस्ती करणारे, जोड्यांना पॉलिश करणारे, फेरीवाले, माल वाहूण नेणारे इत्यादी अल्प उत्पादकता असणारे श्रमिक आहेत. तसेच वैद्यकीय सेवा, कायदेशीर सेवा, माहिती व तंत्रज्ञान सेवा देणाऱ्या कुशल श्रमिकाचा समावेश सेवा क्षेत्रामध्ये होतो. सेवा क्षेत्रामध्ये रोजगार वाढण्याच्या संधी जास्त आहे. सेवा क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेमधील महत्व वाढत आहे. सेवा क्षेत्रामध्ये प्लंबर, वायरमन पासून माहिती तंत्रज्ञान सारख्या अत्यंत विकसित व तांत्रिक दृष्ट्या उच्च सेवांचा अंतर्भाव आहे. हॉटेल व रेस्टॉरेन्ट, वाहतूक, साठवणूक, दळणवळण, वित्त, विमा, रिअल ईस्टेट व व्यावसायिक सेवांचा अंतर्भाव हा सेवा क्षेत्रामध्ये होतो.

ज्यावेळी एखाद्या देशाचा विकास सुरू होतो त्यावेळी एकूण उत्पादन व समग्र देशीय उत्पादामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असतो. पण जसजसा अर्थव्यवस्थेत विकास घडून येतो तसतसा कृषी क्षेत्राचा वाटा घटत जातो व उद्योगांचा वाटा वाढायला लागतो. मात्र त्यानंतर सेवा क्षेत्राचा विकास वेगाने होऊन उद्योग क्षेत्र मागे पडते. समग्र देशीय उत्पादामध्ये सेवा क्षेत्र सर्वात पुढे राहते. भारतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उद्योग क्षेत्राचा विकास घडून न येता सेवा क्षेत्राचा विकास घडून आला व सेवा क्षेत्र वेगाने पुढे गेले. म्हणजे सैद्धांतिक दृष्ट्याा विकासाच्या प्रक्रियेत प्रथम शेती नंतर उद्योग व अंतिमतः सेवा क्षेत्राचा विकास घडून येतो असे विकसित देशाच्या अनुभवावरून दिसून येते. मात्र भारताच्या बाबतीत तसे दिसून आले नाही. भारतामध्ये कृषी क्षेत्रानंतर उद्योगाला वगळून सेवा क्षेत्राचा विकास घडून आला. सेवा क्षेत्राचा वृद्धी दर जास्त राहिला आणि वेगाने विस्तार घडून आला.

2001 ते 2011 या कालखंडामध्ये जी.डी.पी. चा वृद्धी दर आणि सेवा क्षेत्राचा वृद्धी दर याकडे पाहिले तर असे दिसून येते की, सेवा क्षेत्राचा वृद्धी दर जी.डी.पी. च्या वृद्धी दरापेक्षा जास्त राहिला आहे. जी.डी.पी. चा वृद्धी दर 8 प्रतिशत असतांना सेवा क्षेत्राचा वृद्धी दर 10.3 प्रतिशत राहिलेला आहे. सेवा क्षेत्राच्या वृद्धी दराचा परिणाम अर्थव्यवस्थेवर पर्यायाने जी.डी.पी. च्या वृद्धी दरावर होत आहे. पश्चिम बंगाल, नागालँड, महाराष्ट्र तामिळनाडू, क¢रळ, दिल्ली इत्यादी राज्यामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा वाढत गेलेला आहे. दिल्ली मध्ये देशांतर्गत उत्पादामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा 81.8 प्रतिशत तर महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ मध्ये 60 प्रतिशत, हिमाचल मध्ये 40 प्रतिशत, झारखंड मध्ये 43 प्रतिशत, राजस्थान मध्ये 46 प्रतिशत, आंध्रप्रदेश मध्ये 50 प्रतिशत, तर कर्नाटक मध्ये 52 प्रतिशत

वाटा सेवा क्षेत्राचा 2010 च्या दशकामध्ये या राज्यात राहिला आहे.

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि सेवा क्षेत्राचा निकटचा संबंध आहे प्रत्यक्ष विदेशी (FDI) गुंतवणूक प्रामुख्याने वित्तीय क्षेत्र दूरसंचार, सॉफ्टवेअर, घर निर्मिती इत्यादी क्षेत्रांमध्ये सर्वाधिक आहे 2001-2011 या कालखंडामध्ये थ्क् चा प्रवाह या क्षेत्रामध्ये 42 प्रतिसाद होता. यामध्ये वित्तीय क्षेत्रात 20 प्रतिशत, दूरसंचार 08 प्रतिशत बांधकाम व घर उभारणी 06 प्रतिसाद थ्क् चा वाटा होता. विशेषतः FDIचा हा प्रवाह मॉरिशियस, सिंगापूर, ब्रिटन, अमेरिका आणि जपानकडून होता. अर्थातच जीडीपी मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा वाढलेला आहे. शेतीनंतर दुसऱ्या क्रमांकाचे रोजगार देणारे क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्र आहे. एकूण रोजगारापैकी 24 प्रतिशत रोजगार सेवा क्षेत्रामधून प्राप्त होतो. सेवा क्षेत्रामधील श्रमिकांचे उत्पन्न कृषी क्षेत्रातील श्रमिकाच्या तुलनेत दुप्पट आहे.

**बदलते सेवा क्षेत्र:-**

अलीकडे भारतीय अर्थव्यवस्थेच्या जी.डी.पी. मध्ये सेवा क्षेत्राचे योगदान 50 प्रतिशत पेक्षा जास्त राहिले आहे. सेवा क्षेत्राच्या वाट्याने उंच झेप घेऊन विकसित देशांच्या जी.डी.पी. प्रमाणे 2009-2010 मध्ये वाटा 57.3 प्रतिशत तर 2021-2022 मध्ये 53 प्रतिसात वाटा राहिला आहे. एकूणच संरचनात्मक बदल जी.डी.पी. मध्ये घडून आलेले आहे. विकासाच्या अनुभवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा वाटा वाढला आहे. सामान्यपणे सेवाचा अनुपात जी.डी.पी. मध्ये वाढला आहे. विकासाच्या उच्च प्रमाणाचे ते निर्देशक आहे. अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचे वाढणे म्हणजे विकास आणि जीवनमानाचा स्तर वाढण्याचे लक्षण आहे. विकास घडून येण्याच्या प्रक्रियेचे तीन टप्पे आहेत. यामध्ये प्राथमिक, द्वितीय व अंतिमतः तृतीय क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्राचा विकास घडून येतो. येणाऱ्या काळात सेवा क्षेत्र प्रबळ होऊन यशस्वी ठरत आहे. भारतामधील लोकांचा आणि भारताच्या विकासाचा मार्ग सेवा क्षेत्र होऊ शकतो का? या क्षेत्राच्या वृद्धीचा लाभ मिळाला आहे का ? मोठ्या जनसमूहाला एकूण जी.डी.पी. मधील वृद्धीचा लाभ प्राप्त झाला का?

भारत ही दुसऱ्या क्रमांकाची अशी अर्थव्यवस्था आहे जी जलद गतीने वृद्धिंगत होत आहे. या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व सेवा क्षेत्र करीत आहे. भारतातील अर्थव्यवस्थेने दखल घेण्यायोग्य आर्थिक वृद्धी 2003-2004 पासून दिसून आलेली आहे. तसेच शाश्वत आर्थिक वृद्धीचा दर 2003-2004 पासून पाहायला मिळाला आहे. भारताने नवीन आर्थिक वृद्धीद्वारे मार्गक्रमण केले आहे. सेवा क्षेत्रातील वेगवान वृद्धीसह देशांमध्ये असमानता वाढलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा आकृतीबंध आणि सेवा क्षेत्र मोठ्या जनसमुहाच्या विकासापासून मात्र दूर राहिले आहे. प्रत्यक्षात आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतून अपवर्जन घडवूण आलेले आहे. अधिक्याने आर्थिक वृद्धीचा व्यय वाहून आणण्याचा दबाव सेवा क्षेत्रावर निर्माण झालेला आहे.

भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार म्हणून सेवा क्षेत्राकडे पाहत असतांना यामध्ये अनेक प्रकारच्या

समस्या आहे. प्रथमतः सेवाच्या अनुकूलतेमध्ये जी.डी.पी. च्या क्षेत्रात परिवर्तनाचा सुमेळ बसत नाही. याला जोडून असणारा बदल म्हणजे रोजगाराच्या आकृतीबंधामध्येही सुमेळ घडून येत नाही. व्दितीय, सेवा क्षेत्र येथे द्वयात्मक स्थिती प्रस्तुत करतो. जलद वृद्धिंगत होणाऱ्या सेवा क्षेत्रांची उच्च उत्पादकता आणि न्यून रोजगार निर्मिती सेवा क्षेत्रामध्ये आहे. अतिमतः महत्त्वाचे असे की, सेवा क्षेत्रामधील वृद्धी ही आवश्यकतेनुसार संसाधनाचे संक्रमण खाजगी निगम क्षेत्राकडे करीत आहे आणि लोकांच्या जीविकेमध्ये विरुपणे घडून येत आहे. जसे की लोक या संसाधनावर अवलंबून आहे.

**भारताच्या आर्थिक वृद्धीची रचना:**

सेवा क्षेत्राचा वाटा जी.डी.पी. मध्ये 1950 ला 30 प्रतिशत होता. सेवा क्षेत्र वृद्धींगत होवून हा वाटा 50 प्रतिशत पेक्षा जास्त झाला आहे. The national account statics च्या 2011 च्या अहवालानुसार जी.डी.पी. मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा 57.3 प्रतिशत, कृषी क्षेत्राचा वाटा 14.6 प्रतिशत तर उद्योग क्षेत्राचा वाटा 28 प्रतिशत होता. समग्र देशाय उत्पाद ;जी.डी.पी.द्ध मध्ये सर्व क्षेत्राचे प्रतिशत प्रमाण बदलले आहे. विविध क्षेत्रांमध्ये वास्तव अटी अंतर्गत न्यून वृद्धी दिसून येते. यामध्ये कृषी क्षेत्राचा वृद्धी दर 1.4 प्रतिशत, वन उत्पादने 2.2 प्रतिशत 2009-2010 मध्ये होता; तेव्हा जीडीपी चा वृद्धीदर 8.6 प्रतिशत होता. त्याचवेळी सेवा क्षेत्रामध्ये दळणवळण व दूरसंचार 26.6 प्रतिशत, बँकिंग आणि विमा 15.4 प्रतिशत, सार्वजनिक प्रशासन आणि संरक्षण 7.3 प्रतिशत, साठवणूक 7.3 प्रतिशत, रेल्वे 9 प्रतिशत, इतर सेवा 7 प्रतिशत तर निर्माणी क्षेत्राचा 9 प्रतिशत आर्थिक वृद्धी दर होता. एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्र वृद्धींगत होताना दिसून येते. हे काही अर्थव्यवस्थेचे नवीन अंग आहे असे नाही. सेवा क्षेत्राचा वाटा 1980 पासून वृद्धींगत होत आहे. मात्र 1990 नंतर सेवा क्षेत्र झपाट्याने वृद्धींगत होत गेले. विशेषतः सेवा क्षेत्रामध्ये आर्थिक वृद्धी 1994 ते 2004 या कालखंडामध्ये उच्च दराने घडून आली. या कालखंडामध्ये सेवा क्षेत्राचा वृद्धीदर 7.9 प्रतिशत, कृषी क्षेत्राचा 3 प्रतिशत तर निर्माणी क्षेत्राचा 5.2 प्रतिशत वृद्धी दर होता. भारताचा सेवा क्षेत्राचा वाटा महत्त्वपूर्ण पातळीवर वाढत असल्याचे इंटरनॅशनल क्रॉस सेक्शन (International Cross Section) द्वारे दर्शविण्यात आले आहे. हे सर्व प्रति व्यक्ती उत्पन्नातून नमुत करण्यात आले. सेवा क्षेत्राचा वाटा वाढत असतांना कृषी क्षेत्राच्या वाट्यामध्ये स्थिरपणे घसरण घडून येत आहे, तर निर्माण क्षेत्राचा वाटा स्थिर असल्याचे दिसून येतो.

**आर्थिक वृद्धीचे केंद्रीकरण:**

सेवा क्षेत्रामध्ये सेवांचे विविध प्रकार आहेत. आपण सेवा क्षेत्राच्या वृद्धीकडे पाहिले तर प्रामुख्याने वृद्धीचे केंद्रीकरण दळणवळण व दूरसंचार, व्यवसायिक सेवा आणि वित्तीय सेवांमध्ये झालेले आहे. सर्वात जास्त वृद्धी दूरसंचार क्षेत्रामध्ये घडून आलेली आहे. ज्याचे एकूण जी.डी.पी. मध्ये फार महत्वपूर्ण योगदान आहे. लक्षात घेतले पाहिजे की, 1990 च्या दशकापासूनच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासह व्यावसायिक सेवा झपाट्याने वृद्धिंगत

झाले आहे. सरासरीने व्यावसायिक सेवांचा वृद्धी दर प्रतिवर्ष 20 प्रतिशत राहिला आहे. दूरसंचार क्षेत्राचा वृद्धी दर 14 प्रतिशत राहीला आहे त्यानंतर बँकिंग सेवा, हॉटेल व उपहारगृह आणि सामूहिक सेवा इत्यादीचा क्रम वृद्धी घडून येण्यामध्ये लागत असल्याचे स्पष्ट होते. सेवा क्षेत्राची कृती आणि जलद वृद्धी ही 2000 च्या शतकापासून दिसून आली आहे.

भारतामध्ये उड्डान घेणारे सेवा क्षेत्र म्हणजे दृश्य आणि प्रसिद्ध असलेले सॉफ्टवेअर आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आहे. यामध्ये कॉल सेंटर, सॉफ्टवेअर डिझाईन आणि अकाउंट सोर्सिंग क्षेत्राचा समावेश आहे. नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कम्युनिटी (National Association of Software and Services Community – NASSCOM) नॅसकॉमच्या नुसार व्यावसायिक सेवा बाह्य स्रोत (Business Process Outsourcig – BOP) क्षेत्राचा वाटा 6.4 प्रतिशत आहे. 2011-2012 मध्ये या सेवाची निर्यात 14 प्रतिशत झाली तर इतर सेवांचा वाटा 10 प्रतिशत होता. 2011-2012 मध्ये जलद वृद्धींगत होणारे माहिती तंत्रज्ञान क्षेत्र होते. ज्याचा वृद्धी दर 22.7 प्रतिशत होता, तर सेवा क्षेत्राकडून निर्माण झालेल्या निर्यातीचे मूल्य 53.5 अब्ज डॉलर होते.

**अनुभव असमान वृद्धीचा:-**

भारताची आर्थिक वृद्धी उच्चतम दराची असली तरी त्यामधील दोष म्हणजे असमानता वाढविणारा आहे. उच्च्तम आर्थिक वृद्धी दर हा असमानतेमध्ये कपात घडवूण आणू शकला नाही. प्रत्यक्षात असामान्य तेजी व असमानता चिकटून राहिली. ही असमानता गरीब-श्रीमंत, ग्रामीण-शहरी, मागास-विकसित इत्यादी प्रकारांमध्ये स्पष्टपणे दिसून आली आहे. भारतामध्ये एक मोठा वर्ग कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे, तर दुसरा वर्ग निगम क्षेत्रातील उच्च वेतनावर अवलंबून आहे. फोबर्स ग्लोबलच्या यादीमध्ये चौथ्या क्रमांकावर भारतीय कंपनी आहे तर इतर 57 भारतीय कंपन्यांचे मालक या यादीमध्ये समाविष्ट आहे. फोर्बस ग्लोबल ही प्रतवारी विक्री, नफा, संपत्ती आणि बाजार मूल्यावरून ठरवित असते.

नॅशनल डेलीच्या नुसार 2010 मध्ये भारतातील किमती उच्चतम असताना वैयक्तिक पातळीवर 0.01 प्रतिशत लोकांचे उत्पन्न समग्र राष्ट्रीय उत्पन्नाच्या 1/3 होते, तर 77 प्रतिशत लोकांचे उत्पन्न प्रति दिवशी 20 रुपये पेक्षा कमी खर्च करीत होते. एन.एस.एस.ओ. च्या 66 व्या फेरीनुसार सरासरी प्रति मासिक खर्च 2009-2010 मध्ये ग्रामीण भागात 1053.64 रुपये आणि शहरी भागांमध्ये 1984.46 रुपये होता. शहरी भागातील लोकांची प्रति व्यक्ती खर्च करण्याची पातळी ग्रामीण भागात राहणाऱ्या पेक्षा उच्चतम म्हणजे 88 प्रतिशत होती. याचाच अर्थ आर्थिक वृद्धीतून असमानता वाढली होती.

**उत्पादन आणि रोजगार:-**

विविध क्षेत्राच्या योगदानाचा जी.डी.पी. मध्ये असंगत मेळ आहे. तसाच असंगत मेळ रोजगाराच्या योगदानामध्येही दिसून येतो. विकसित

देशाचा ऐतिहासिक अनुभव भारताला लागू होत नाही. सामान्यपणे विकसित देशांमध्ये विकासाच्या प्रक्रियेत कृषी क्षेत्राचा वाटा घटत जातो. तसाच कृषी क्षेत्रांमधील रोजगाराकरीता श्रमिकाचा वाटा देखील घटक जातो. मात्र हा अनुभव भारताच्या बाबतीत दिसून आला नाही. गेल्या दोन दषकामध्ये कृषी क्षेत्राचा जी.डी.पी. मधील वाटा निम्म्याने कमी झाला. मात्र कृषी क्षेत्रातील श्रमिकांचे रोजगारा करीता अवलंबित्व फार हळुवारपणे घटत गेल्याचे दिसून आले. कृषी क्षेत्राचा 2009-2010 मध्ये जी.डी.पी. मधील वाटा 14.7 प्रतिशत तर रोजगार 51.76 प्रतिशत होता. निमार्णी क्षेत्रामध्ये रोजगार अत्यंत मंद गतीने वाढला होता. समांतरपणे रोजगारांमधील वाटा देखील अत्यंत मंद गतीने वाढला होता. याचा अर्थ व्यावसायिक क्षेत्रातील इतर देशाचा अनुभव भारताला लागू झाला नाही. भारतामध्ये निर्माणी क्षेत्राला वगळून वृद्धी ही सेवा क्षेत्रांमध्ये घडून आली. कृषी क्षेत्राचा वाटा घटून उद्योग क्षेत्राचा वाटा न वाढता सेवा क्षेत्राचा वाटा वाढला. मात्र रोजगारामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा फारसा वाढला नाही.

आजही मोठा वर्ग कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. विशेषतः ग्रामीण भागातील रोजगार हा संपूर्णपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. नागरी भागामध्ये सेवा क्षेत्र विस्तारले असले तरी रोजगाराचे प्रमाण फारसे वाढताना दिसून येत नाही. सेवा क्षेत्रांमध्ये जो रोजगार आहे तो तात्पुरता आणि कमी वेतन दरावर आहे. सेवा क्षेत्रामध्ये श्रमिक संरक्षण नाही. NSSO च्या 66 व्या फेरीनुसार 2004 ते 2009 च्या दरम्यान 2 दशलक्ष रोजगार निर्माण झाले. याच कालावधीमध्ये आर्थिक वृद्धीचा दर 8.43 प्रतिशत होता तर सेवा क्षेत्रामधील रोजगार वृद्धीचा दर 2.7 प्रतिशत होता, तर त्यापूर्वी मागील 5 वर्षांमध्ये केवळ 0.80 प्रतिशत होता. सेवा क्षेत्रामधील किरकोळ व्यापारामध्ये फारच कमी रोजगार निर्माण झाला. सेवा क्षेत्रामध्ये उच्च उत्पन्न आणि न्यून रोजगार निर्मिती असे चित्र दिसून आले. व्यावसायिक सेवा, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर, वित्तीय सेवा या क्षेत्रामध्ये उत्पन्न वृद्धी घडून आली आहे.

उच्च उत्पादकता ही केवळ उच्च कौशल्य लागणाऱ्या सेवा क्षेत्रांमध्येच राहिली. प्रामुख्याने रोजगाराच्या संधी अशाच क्षेत्रांमध्ये निर्माण झाल्या. जॉर्डन आणि गुप्ता यांच्या अध्ययनानुसार सेवा क्षेत्राची सामान्य प्रवृत्ती रोजगार निर्मिती पेक्षा उत्पादन निर्मिती जास्त राहण्याची आहे. यामुळे सेवा क्षेत्राची वाढ घडून आली तर श्रमिक उत्पादकता घसरलेली आढळून आली. हा तीव्र विरोधाभास सेवा क्षेत्रामध्ये दिसून आला. भारतामध्ये सेवा क्षेत्रातील रोजगारामध्ये क्षितीज समांतरता दिसून आली तर उत्पादकताही वाढत गेली. मेनक्सी ग्लोबल इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये भारताची उच्च उत्पादकता राहिली आहे. सॉफ्टवेअर दूरसंचार आणि बँकिंग क्षेत्रामध्ये वाहक वृद्धी (Driving Growth) घडून आलेली आहे. याचे जी.डी.पी.मध्ये महत्वाचे योगदान आहे. मात्र या क्षेत्रामध्ये न्यून रोजगार व कौशल्य निपूर्ण रोजगार निर्मिती झालेली आहे. सेवा क्षेत्रामध्ये असंगत मेळ हा जी.डी.पी. मधील योगदान आणि रोजगारांमध्ये राहिला आहे. कौशल्य व कौशल्य संबंधित व्यापार

19 प्रतिशत प्राथमिक व्यवसाय 17 प्रतिशत दुकानदार आणि बाजार विक्रीमध्ये आहे. रोजगाराचा वाटा 16 प्रतिशत होता.

**सेवा क्षेत्र आणि रोजगाराचे स्वरूप:-**

NSSO च्या 66 व्या फेरीनुसार राष्ट्रीय पातळीवर सेवा क्षेत्रामध्ये एकूण श्रमिक 51 प्रतिशत होते. यापैकी स्वयंरोजगार 33.5 प्रतिसाद नैमित्तीक श्रमिक आणि नियमित वेतनधारित 15.6 प्रतिशत होते. सेवा क्षेत्रामध्ये सर्वात जास्त प्रमाण स्वयंरोजगाराचे आहे. ज्यांना काही प्राप्त करायचे होते पण काही हाती न लागल्यामुळे अतिमतः स्वयंरोजगार स्वीकारल्याचे दिसून येते. रोजगार आणि बेरोजगाराची स्थिती भारतात समांतरच राहिली आहे. यावरून स्पष्ट होते की, अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्र उच्च दराने वृदिंधगत होत गेले. मात्र फारशी रोजगार निर्मिती घडून आली नाही. न्यून उत्पादकता असणाऱ्या कृषी क्षेत्रामध्ये रोजगाराकरीता सर्वात जास्त श्रमिक अवलंबून आहे. त्याला एकमेव पर्याय म्हणून न्यून उत्पादकता असणारे अनौपचारिक कृती करणारे सेवा क्षेत्र आहे. कौशल्य निपूर्णतः असणाऱ्या सेवा क्षेत्रामध्ये उच्चतम वृद्धी आहे हे देखील लक्षात घ्यावे लागते. उदा. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र. या क्षेत्रामध्ये श्रमीक हा इंग्रजी बोलणारा, शिक्षित आणि नागरीक क्षेत्रातील आहे. त्यासाठी उत्पन्न प्राप्तीचा परिणाम हा स्वयंचलित यंत्रे (automobile) वास्तव मालमत्ता, पर्यटन, विमान प्रवास, आयात कर इत्यादीमध्ये तेजी घडवून आणणारा आहे. या क्षेत्राचा मोठेपणा म्हणजे या क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती घडून आली आहे. इतर सेवा क्षेत्राच्या तुलनेत 1.4 पटीने जास्त माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती झालेली आहे. याचा परिणाम रोजगार बाजारावर होऊन त्याचा परिणाम युवा वर्गाच्या शिक्षणावर झालेला आहे.

रोजगाराचे वैशिष्ट्य पाहता सेवा क्षेत्रांमध्ये उत्पन्न निर्माण करणारे घटक दिसून येतात. सेवा क्षेत्रामध्ये रोजगाराकरीता बहुजिनसत्व आहे. असंघटित क्षेत्र उत्पन्न निर्मितीचा घटक म्हणून सेवा क्षेत्रामध्ये समाविष्ट आहे. 2004-2005 ते 2008-2009 या कालावधीत सिमांतिक घसरण 52.3 प्रतिशत वरून 51.6 प्रतिशत पर्यंत घडून आली. विविध सेवा या असंघटित क्षेत्रामध्ये एकूण उत्पन्न निर्मितीच्या घटक आहेत. मिश्र उत्पन्नामध्ये त्याचा वाटा 80.3 प्रतिशत आहे. यामध्ये स्वयंरोजगार समाविष्ट आहे. येथे नमूद करण्यायोग्य बाब म्हणजे सर्वात जास्त स्वयंरोजगाराची निर्मिती व उपलब्धता झालेली आहे. विशेषतः यामध्ये स्थलांतरीत श्रमिक आहेत. स्थलांतरीत श्रमिक नागरी क्षेत्रांतर्गत येतात आणि कृतीशील असतात. नागरी क्षेत्रामध्ये चालणारा किरकोळ व्यापार हा कृषी क्षेत्राला पूरक आहे.

अत्यंत द्वयात्मक स्थिती सेवा क्षेत्रामध्ये नमूद केल्या गेली आहे. एका बाजूला एक भाग हा न्यून उत्पन्नाचा आहे. पण रोजगाराचे प्रमुख क्षेत्र आहे. उदा. किरकोळ व्यापार, तर दुसऱ्या बाजूला उच्च उत्पन्न आहे. पण न्यून रोजगार निर्मिती घडून आलेली आहे. यामध्ये व्यावसायिक सेवा, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, वित्तीय सेवा आणि वास्तव्य मालमत्ता सेवांचा समावेश होतो. उत्पन्न घडूण येण्यासाठी ही क्षेत्र महत्वाची आहे. श्रमिकांचा

परिणाम घडून या क्षेत्रामध्ये सापळा निर्माण झालेला आहे. हे तेजी घडून आणणारे व रोजगार निर्मिती करू शकणारे क्षेत्र आहे. पण यामध्ये कार्यकारी लोकसंख्येचे प्रमाण फार कमी आहे. या व्दैततवादामध्ये भारताची आर्थिक वृद्धी नमूद करणे योग्य आहे. सेवा क्षेत्र जलद गतीने वृद्धी पावणारे क्षेत्र आहे. पण श्रमिकांना रोजगार देण्यासाठी अक्षम आहे. उच्च-अंत-सेवा (High-end-service) यांनी संधी निर्माण केलेल्या आहे. पण शिक्षित, निम शहरी आणि मध्यम वर्गीय तरुण वर्गाला समूहाच्या पातळीवर रोजगार देण्यात अक्षम ठरला आहे.

**आर्थिक पुर्नसंरचना, बेरोजगारी आणि कौशल्य:-**

उदारीकरणानंतरच्या दशकामध्ये भारतात केवळ उच्च आर्थिक वृद्धीच दिसून आली नाही, तर औद्योगिक स्थिरावस्था आणि बेरोजगारीत वाढ दिसून आली. असे असताना कृषी क्षेत्राचा वाटा जी.डी.पी. मध्ये स्थिर दराने घटत गेला. अर्थव्यवस्थेमधील संरचनात्मक बदलाचा संबंध मंद गतीने होणाऱ्या बदलाशी आहे. जी.डी.पी. मध्ये निर्माणी क्षेत्राच्या वाट्यात घासरण घडून आली तर सेवा क्षेत्राचा वाटा वाढत गेला. 2013-2014 मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा 57 प्रतिशत तर रोजगारामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा 30.2 प्रतिशत होता. संघटित सेवांची स्थिती ही आधिक्याने धोक्याची घंटा ठरली. प्रामुख्याने जलद गतीने वाढ होणारे क्षेत्र म्हणजे वित्त, विमा, वास्तव संपत्ती, माहिती तंत्रज्ञान व संबंधित सेवा आणि दूरसंचार क्षेत्र आहे. या सेवाचा वाटा जी.टी.पी. मध्ये 20 प्रतिशत आहे. पण रोजगार केवळ 2 प्रतिशत आहे. अर्थशास्त्रज्ञ विचार करीत आहेत की, सेवा क्षेत्र आधारित प्रारूप आर्थिक वृद्धी निर्माण करून रोजगार निर्मिती करेल का? सध्याची आर्थिक वृद्धी ही रोजगारविहिन वृद्धी आणि औद्योगिकविहिन वृद्धी (Jobless growth and Industryless growth) आहे

सेवा क्षेत्रामध्ये बदल घडूण येत आहे. कृषी क्षेत्रामधील परताव्यामध्ये विरूपणे घडून आलेली आहे. याचा ध्वनीतार्थ असा की, स्थलांतरण, रोजगार आणि सामाजिक गतिशीलतेच्या कृतींची आकांक्षा आहे. आर्थिक सुधारणोत्तर कालखंडामध्ये मध्यमवर्गाचा विस्तार घडून आला. नवीन मध्यमवर्ग निर्माण झाला. हा नवीन मध्यमवर्ग खाजगी क्षेत्राच्या विस्तारातून निर्माण झाला आहे. शिक्षणाची पातळी वाढलेली आहे. यामधून आकांक्षा बंधन मुक्त झालेल्या आहे. तरुण वर्गाकरीता अरुंद छेदक विभाग (Cross-section) या दरम्यान आहे. यामध्ये ग्रामीण भागातील गरीब लोकांचा समावेष आहे. मानववंशशास्त्रानुसार मध्यमवर्गीय तरुणाची आकांक्षा लाहान शहरांमध्ये राहण्याची असते. पण स्वतःची स्वप्न पूर्ण करण्याकरीता त्याला महानगरामध्ये स्थलांतरण करावे लागते. या गतिशीलतेमधून नवीन सेवा अर्थव्यवस्था निर्माण होत आहे. जसे नागरी उपभोग अर्थव्यवस्था वातानुकूलित जागेमध्ये कार्य करणारी आहे. गणवेश चढविणारा, सौंदर्य अभिरुची असणारा श्रमिक वर्ग, स्वयमं पद्धतीचा, चमकणाऱ्या आकांक्षा असणारा, स्थलांतरणाची पार्श्वभूमी आणि चांगले भविष्य घडवू पाहणारा तरुण वर्ग आहे. पण वास्तविकता अशी आहे की, कमी वेतनदार, अनिश्चित कामाची; मोठे

किरकोळ विक्रीची दुकाने, ब्युटी पार्लर, डिलिव्हरी सेवाद्ध स्थिती सेवा क्षेत्रामध्ये आहे. कौर आणि सुंदर यांच्या अध्ययनानुसार सामाजिक गतिशीलतेच्या प्रश्नाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. याविरुद्ध भारतामध्ये उदारीकरणोत्तर काळात असमानतेचा विस्तार घडून आला. ही असमानता केवळ आर्थिक नसून ती लिंग, जात, धर्म, प्रदेश आणि सामाजिक वर्गाबाबत वाढत गेली आहे.

भारत सरकारचा बेरोजगारी अरिष्टाबाबत दृष्टिकोन असा राहिला आहे की, कौशल्य नसणे या समस्या सोडविण्याकरिता पुर्नचौकट निर्माण केल्या गेली पाहिजे. तरुण वर्गाला रोजगार प्राप्त करून देण्यासाठी दिशा बदलविण्याची आवश्यकता आहे. बेरोजगारी कमी करण्याकरिता कौशल्य विकासाची गरज महत्वाची आहे. स्किल इंडिया मिशन चे उद्दिष्ट कामाला लावणे हेच आहे. भारताची लोकसंख्या विभागणी, आकांक्षाची श्रंखला आणि तरुणांच्या ऊर्जेचा वापर कौशल्य विकासाकरिता करायचा आहे. नवीन बाजाराधिश्टीत दृष्टिकोनाचे प्रतिबिंब म्हणजे 2009 ची नॅशनल स्किल पॉलिसी आहे. आता तिची दिशा वळवून तिचा भर व्यावसायिक प्रशिक्षणावर आहे. शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मधून व्यावसायिक प्रशिक्षण दिल्या जाते. तर पॉलिटेक्निक महाविद्यालयांमध्ये बढती करून कौशल्य निर्मिती केल्या जाते. याचा मोठा लाभ खाजगी आणि सामाजिक क्षेत्र संघटनाला होत आहे. खाजगी क्षेत्राद्वारे अल्पकाळातील प्रशिक्षण वर्गाद्वारे कौशल्य प्रशिक्षण दिल्या जाते. या प्रकारच्या प्रशिक्षणाला निगम सामाजिक दायित्व (Corporate Social Responsibility – CSR) आणि शासनाच्या निधीमधून दिल्या जाते. कौशल्य प्रशिक्षण हा मोठा व्यवसाय झाला आहे. काही अध्ययनांमधून दिसून आले की, कौशल्य प्रशिक्षणाचा अवलंब उच्चतम खाजगीकरण, मागणीवाहक कौशल्य अर्थव्यवस्था म्हणून झालेला आहे. कौशल्य विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट न्यून-अंत-सेवा (low-end-service) वाढविण्याचे आहे. यामधून रोजगाराचा प्राथमिक स्त्रोत तरुण वर्गात निर्माण करायचा आहे.

भारतामधील शहरे नवीन सेवा अर्थव्यवस्थेची वृद्धी घडून येण्याचे पुरावे देणारे आहे. 1990 च्या दशकामध्ये उदारीकरण घडून आल्यानंतर उच्च कौशल्य असणारे सॉफ्टवेअर क्षेत्र, वित्तीय क्षेत्र याचा विस्तार घडून आला आहे. यासह उपभोग अभिमुख असणारे आतिथ्यसेवा (Hospitality), संघटित किरकोळ व्यापार, घर सांभाळणे (Housekeeping), सुरक्षा सेवा (Security Service) आणि वाहतूक सेवाचा देखील विस्तार घडून आला आहे. त्यामध्ये शिक्षित तरुणांकरिता नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहे. सेवा क्षेत्रांमध्ये अनौपचारीक, व्यावसायिक आणि निगम क्षेत्र समाविष्ट आहे. या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी आहे पण अस्थिरता आहे. उपभोग-अभिमुख अर्थव्यवस्थेचा विस्तार घडवून प्रचंड उत्पादन वाढले आहे. यामध्ये शॉपिंग मॉल, हॉटेल आणि रेस्टॉरंट, स्पॉ आणि ब्युटी पार्लर, आरामदायी मोटर गाड्या आणि टॅक्सी सेवा यांचा नागरी भागामध्ये मध्यम वर्गाकरिता विस्तार झालेला आहे. यामध्ये न्यून कौशल्य श्रमिकाची मागणी वाढलेली आहे. या विस्ताराचे प्रतिबिंब म्हणजे

सेवांचे व्यावसायिकरण आणि निगमांमध्ये परिवर्तन झालेले आहे. यामधून अनौपचारिक व्यवस्था निर्माण झालेली आहे. अनौपचारिक क्षेत्रांमध्ये 140-150 दशलक्ष (Million) श्रमिकांना रोजगार प्राप्त झाला आहे. यामुळे नागरी सेवा अर्थव्यवस्थेचा विस्तार घडून येत आहे.

**परीक्षण सेवा क्षेत्राचे:-**

नागरी सेवा अर्थव्यवस्थेचा विस्तार प्रशिक्षण संस्था करीत आहे. याचा संबंध भारतातील तरुणांना रोजगार देण्याच्या तरतुदीषी आहे. यामधून मोठ्या प्रमाणात न्यून-अंत सेवा कामगार ;स्वू मदक (Low end service worker) निर्माण झालेले आहे. प्रथम, असे दिसून येते की, सेवा क्षेत्रांमध्ये अस्थिरता आणि अनिश्चितता रोजगाराबाबत आहे. विशेषतः रोजगार काही आठवडे ते महिन्यांचा असतो. म्हणजे सेवा क्षेत्रांमध्ये रोजगार असुरक्षित आहे.

द्वितीय, ग्रामीण ते शहरी स्थलांतरण घडून आलेले आहे. याच्या केंद्रवर्ती सामाजिक स्थलांतरणाची दृष्टी आहे. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे येऊ शकत नाही. यामुळे कौशल्य प्रशिक्षण त्यांना प्राप्त होऊ शकत नाही. स्थलांतरणाची प्रक्रिया आधिक्याने गुंतागुंतीची आहे. यानुसार कौशल्य प्रशिक्षण धोरणाची कल्पना करावी लागते. स्थलांतरीत श्रमिकांना अनौपचारिक क्षेत्रात रोजगार प्राप्त करताना अनिश्चितता व कमकुवतपणा आहे. याचा परिणाम श्रमिकाची जीविका व जीवनावर होतो. प्रशिक्षण संस्था स्थलांतरीत युवकांना प्रशिक्षण देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. यामुळेच स्थलांतरित युवकांच्या आकांक्षाना आकार मिळत आहे. मात्र नागरी सेवा कामगारापर्यंत रोजगाराच्या रचना अनुपस्थितीत आणि आजारी आहेत.

तृतीय, रोजगार प्राप्त करण्याकरीता व प्रशिक्षण मिळविण्याकरता ग्रामीण भागातून शहरी भागाकडे तरुण वर्गाचे स्थलांतरण घडून येत आहे. त्यांना सेवा क्षेत्रांमध्ये मिळणारा रोजगार अनियमित, कमी वेतनदार व असुरक्षिततेचे अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. रुथबेन यांच्या अध्ययनानुसार कौशल्य विकासाचे कार्यक्रम हे कौशल्य विकास घडवून आणू शकत नाही. त्यांना रोजगार प्रासंगिक स्वरूपाचा अथवा मध्ये-मध्ये काम मिळवून देणारा असतो. यामुळे सुरक्षितता श्रमिकांना मिळणे आवश्यक आहे. श्रमिकांना सुरक्षितता तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा ते कायमस्वरूपी श्रमिक म्हणून रोजगार प्राप्त होतो. पण असे दिसून येत नाही. म्हणून त्यांना वर्गवारी म्हणू शकत नाही. कॅरोल उपाध्याय आणि सुप्रिया रॉय चौधरी यांनी बंगलोर शहराच्या अध्यायनावरून काही निष्कर्ष मांडले आहे. सेवा क्षेत्रामधील कंपन्यांमध्ये आजारी स्वरूपाचा रोजगार दिसून येतो. लहान शहरे, शहरे आणि खेड्यांमधून येणाऱ्या श्रमिकांच्या अपेक्षा कमी असतात. श्रमिक नम्र आणि निष्ठावान असतात. कौशल्य प्रशिक्षण संस्था श्रमिकांचा प्रवाह सातत्याने येत राहावा याची सुविधा निर्माण करतात. विशेषतः लहान शहरे व ग्रामीण भागातून आलेले युवा श्रमिकांचे शिक्षण 10 वी ते 12 वी पर्यंत झालेले असते. किरकोळ व्यापार, रसद पुरवठा करणाऱ्या क्षेत्रामध्ये व्यावसायिक किंवा पदवी शिक्षणाची आवश्यकता नसते. इंग्रजी

भाषेच्या कौशल्याची आवश्यकता नसते. ग्राहकांना सहाय्यक ठरणारी स्थानिक भाषा येणे आवश्यक असते. अशा स्थितीत कमी वेतनदरावर श्रमिकाच्या क्षमतेचा अमर्याद पुरवठा होतो.

नागरी सेवा रोजगार उपयुक्त क्षेत्र असून युवकाना रोजगार निर्माण करून देण्याची तरतूद करतात. श्रमिकांची गतिशीलता घडून येण्यासाठी व्युहरचनाचा पाठलाग कृतिशीलपणे केला जातो. श्रमिक जेव्हा बंगलोर मध्ये स्थलांतरित झाले तेव्हा निरसता आणि तणावपूर्ण रोजगार होता. बंगलोरमध्ये एका खोलीमध्ये 5 श्रमिक पैसे वाचविण्यासाठी एकत्रित राहतात. याउलट हेच श्रमिक ग्रामीण भागामध्ये त्याचा निर्वाह शेती व कौटुंबिक सहाय्यावर चालत होता. श्रमिक शेतीमध्ये मदत करीत होते. काही श्रमिक स्थलांतरीत होऊन त्यांना बांधकामांमध्ये रोजगार प्राप्त झाला. हा संबंध प्रवाह स्वयंम् उत्पादनासह जीविकेचा आहे. काही लोक विविध कोर्सला जातात. जसे संगणक, स्टेनोग्राफी, इंग्रजी बोलणे, पात्रता परीक्षा कोचिंग इत्यादी करतात. यामधून श्रमिक चांगले भविष्य घडवू पाहण्याचा प्रयत्न करतात. मात्र हे कोचिंग क्लासेस अपुरे आहेत. यामधून तुटपूंजा रोजगार प्राप्त होतो. याचा संबंध हा पूर्वीच्या संपन्न अशा मध्यमवर्गीय सांस्कृतिक भांडवलशाहीषी आहे.

यावरून कॅरोल उपाध्याय आणि सुप्रिया रॉय चौधरी यांनी निष्कर्ष काढले की, सध्याचे कौशल्य विकास धोरण आणि कार्यक्रम पुरेसे नाही. अग्रगण्य असणारे अनौपचारिक क्षेत्र तसेच संघटित क्षेत्र यांचे भविष्य कौशल्यावर आधारित आहे. कौशल्य निपूर्ण श्रमिकांची कमतरता असून अकुशल प्रासंगिक श्रमिक उपलब्ध आहे. त्यामुळे याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. नागरी भागामध्ये रोजगार निर्माण करताना संरक्षणात्मक चौकटीची आवश्यकता आहे. याकरिता कौशल्य विकास धोरणांची आवश्यकता आहे. कौशल्य प्रशिक्षण अशाच युवकांना द्यावे जे गरजू आहे. युवकांमध्ये काम मिळण्याबाबत अनिश्चितता आहे. रोजगार कमी वेतन देणारे आहे, यामुळे गतिषीलतेमध्ये पुढाकार घेतला जात नाही. प्रत्यक्ष साधनाच्याद्वारे आपली जीविका सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. याकरिता स्थिर आणि चांगला रोजगार प्राप्त होणे आवश्यक असते. वास्तवात नागरिक सेवा अर्थव्यवस्थेचा भर हा श्रम नियमावलीमधील अडथळे दूर करण्याचा असावा. नवीन धोरणानुसार श्रम नियमन तयार करावे. या श्रम नियमनानी सेवा क्षेत्रातील श्रमिकाच्या हिताचे संरक्षण करावे आणि शाश्वत रोजगार संधी निर्माण कराव्या.

**कोवीड 19 आणि सेवा क्षेत्र:-**

जागतिक पातळीवर कोविड 19 महामारीचे मापन करीत असताना एकूणच आर्थिक प्रभाव सर्व क्षेत्रावर पडल्याचे दिसून आले. हा प्रभाव प्रथम उद्योग क्षेत्रामध्ये दिसून आला. उद्योगांनी खर्च कपात करण्याकरिता श्रमिकांना कामावरून कमी केले. याचा विस्तार घडूण लॉकडाऊन मध्ये सेवा क्षेत्रातील रोजगार आणि उत्पन्नाची हानी घडून आली. कोविड 19 येण्यापूर्वी देशामध्ये रोजगार अरिष्ट अस्तित्वात होते. यामुळे महामारीचा काळ हा रोजगाराच्या दृष्टीने अधिक वाईट ठरला.

महामारीच्या काळात 30 दशलक्ष श्रमिक बेरोजगार झाल्याचे म्हटले गेले आहे.

लॉकडाऊन मध्ये सेवा क्षेत्र आकुंचन पावले. 144.4 दषलक्ष लोकांच्या वेतनामध्ये कपात झाली किंवा वेतन पुढे ढकलण्यात आले. अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली होती. कामावरून कमी करणे, करार रद्द करणे, खर्च कपात करणे, नवीन रोजगाराला गोठवून ठेवणे व जागा न भरणे इत्यादी परिस्थिती निर्माण झाली होती. The Nikki/HIS Markit Service Purchasing Index हा मार्च 2022 मध्ये 49.3 प्रतिशत होता. तो घसरून एप्रिल 2020 मध्ये 5.4 प्रतिशत झाला. तर मे 2020 मध्ये 12.6 प्रतिशत झाला. गेल्या 14 वर्षांमध्ये सर्वात प्रथम सेवा क्षेत्राचे आकुंचन कोविड 19 च्या काळामध्ये झाले. सेवा क्षेत्रातील वेतनधारक श्रमिक 2019-2020 मध्ये 86 दशलक्ष होते. यामध्ये कपात घडून 68 दशलक्ष वेतनधारक श्रमिक झाले. यावरून सिद्ध झाले की, केवळ अकुशल श्रमिकच नाही तर कुषल श्रमिक कोविड 19 च्या काळात बेरोजगार झाले. यामध्ये विमानसेवा, आतिथ्य सेवा, ई-वाणिज्य, दूरसंचार सेवा, किरकोळ व्यापार, कायदा, वास्तव संपदा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील श्रमिकांचा समावेश होता.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 190 अब्ज डॉलर मूल्याच्या सेवांसमोर बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थापित झालेले क्षेत्र आहे. यापासून विदेशी मूल्य मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. यावर इतर क्षेत्राचा विस्तार अवलंबून आहे. सर्व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये घसरण दिसून आली. श्रमिकांना कामावरून कमी केल्यामुळे त्यांचा प्रतिकूल परिणाम माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, त्याच्याशी संलग्नित सेवा आणि आऊटसोर्सिंगवर घडून आला आहे. यामुळे या क्षेत्रावर मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये घट झाली आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये नॅसकॉम (Nasscom) च्या नुसार 250 स्टार्टअप प्रकल्प सुरू झाले होते. यांच्याद्वारे मिळणाऱ्या महसुलामध्ये 62 प्रतिशत वरून 34 प्रतिशत पर्यंत कपात घडून आली आहे. या क्षेत्रामधील साहसी भांडवलाकरीता (Venture Capital) काहीच ग्राहक शिल्लक राहिले होते.

सेवा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये बेरोजगाराची अत्यंत वाईट स्थिती घडून आलेली असताना नॅसकॉमने चवथ्या श्रम सुधारणा घडवून आणण्याची शिफारस उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात सरकारला केली होती. रजेवर पाठविणे, श्रमिकांना कमी करणे, रोजचा व आठवड्याचा अवकाश कमी करणे याकरिता चवथ्या श्रमिक सुधारणाद्वारे परवानगी नॅसकॉमने मागितली होती. याविरूद्ध श्रम संघटनांनी अनेक तक्रारी राज्य सरकारकडे केल्या होत्या. या श्रमसुधारणा म्हणजे अन्यायपूर्ण श्रमकृती होत्या. नॅसकॉम ने माहिती तंत्रज्ञान क्षेत्राषी संबंधित श्रम कायद्यामध्ये बदल करण्यावर भर दिला आहे. काही राज्यांनी तसे बदल घडवून देखील आणले आहे. यामुळे श्रमिकांची सुरक्षितता कमकुवत झाली आहे. परिणामतः रोजगारामध्ये घसरण घडून सेवा क्षेत्रामध्ये श्रमिक असुरक्षितता निर्माण झाली आहे.

**समारोप:-**

भारताच्या आर्थिक वृद्धीचे यश कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन न करता स्वीकारले तर गंभीर प्रश्न निर्माण करणारे आहे. सध्याच्या आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेने दारिद्रय आणि अत्यंत वाईट मानल्या गेलेली असमानता निर्माण केली आहे का ? यामधून रोजगार निर्मिती होईल का ? रोजगार निर्माण होण्याऐवजी रोजगाराचा नाश घडून येईल का ? आवश्यक गरजांपासून संसाधने भिन्न दिशेला वळवली जाईल का? नैसर्गिक संसाधने पूर्णपणे खर्चून वृद्धी निर्माण केली जाईल का? यामधून पर्यावरणाचा नाश घडून येईल का? या प्रवृत्तीमधून सामूहिक उपभोग वाढला का? उच्चभ्रु वर्गाने आरामदायी जीवनामध्ये आधिक्य निर्माण केल्यामुळे हे सर्व घडून आले का ? मोठ्या समूहाचे वृद्धी प्रक्रियेमध्ये अपवर्जन घडून आले का ? जर या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असेल तर उच्च वृद्धीच्या संकल्पनेकडून मागे यावे लागेल. उच्च वृद्धीच्या संकल्पनेला रोखून धरावे लागेल. ही परिस्थिती स्वीकारावी लागेल. म्हणून भारताच्या आर्थिक वृद्धीचे नेतृत्व सेवा क्षेत्र करेल हे उत्तर असू शकणार नाही.

**संदर्भसूची:-**


- Economic Survey, (2022). Government of India, Oxford Univeristy press.
- Editarial, (2020). Employment Insecurities in the service sector, vol-LV No. 23 June-6, Economic and Political weekly.
- Mukhopadhyay Sukumar, (2002). Globlisation and Indian Service Sector, Oct 5, Economic and Political Weekly.
- Saluja M. R., Yadav Bhupesh (2007). Gross Domestic Product from service sector, setp-15 Economic and Political Weekly.
- Tendeulkar, Suresh (2007). India Growing service sector: Database Problem and Issues, Sept 15, Economic and Political Weekly
- Aggarwal, Archana (2012). India Service sector- Gateway to Development, June 30, Vol XLVII, No. 26 and 27, Economic and Political Weekly.
- Kite, Grace (2013). India software and IT service Sector, July 27, Vol-XLIII No-30, Economic and Political Weekly.
- Basu, Deepankar & Das Debarshi (2017). Service sector Growth in India from the perspeetive of Household expenditure, vol-LII, No-48, Economic and Political Weekly.
- Upadhaya Carol, Chowdhari Supriya Roy (2022). Migration, Skilling and Employment in Bengaluru’s New Service Economy, January 22, Vol-LVII No-4, Economic and Political Weekly.
- Kumar Vishnu, Karalok, Sanjay (2007). Service Producing manufacturing units and their impact on sectaral GDP, Sept-15 Economic and Political Weekly.

# जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप

**प्रा. राजश्री आनंद रायभोग**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
किरणनगर, अमरावती.

**प्रस्तावनाः-**

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासाचा अभ्यास करतांना तिचा प्रकार आणि व्यवसायनिहाय क्षेत्राचे स्वरुप लक्षात घेणे आवश्यक ठरते. अर्थव्यवस्थेच्या पद्धतीचा विचार करता तिचे तीन प्रकार प्रामुख्याने दिसून येतात. सर्वात प्रथम तिच्या भांडवलशाही स्वरुपाचे विश्लेषण अर्थतज्ञांनी केलेले आढळून येते. विकसित देशातील भांडवलशाही व्यवस्थेचे विविध रुपे व त्या अनुषंगाने होणाऱ्या फायद्या-तोटयांची चर्चा होत गेली व नंतर भांडवलशाही ऐवजी समाजवादी अर्थव्यवस्थेला महत्व देण्यात आले. परंतू अल्पावधीतच समाजवादी अर्थव्यवस्थेचे काही कमजोर दूवे लक्षात येऊ लागले, तेव्हा या दोन्ही व्यवस्थेतील अनुकूल मुद्दयांचे एकत्रीकरण करुन नवीन व्यवस्थेची निर्मिती झाली व ती म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय. भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करुन नियोजन मार्गाने अर्थव्यवस्थेचा विकास करण्याचे ध्येय निश्चित केले. ब्रिटीशांनी व्यापार करण्याच्या हेतुने भारतावर राज्य गाजविल्यामुळे ब्रिटीशकाळात भांडवलशाही व्यवस्थेचा स्वीकार होऊन त्यांच्या अनुकूलतेपेक्षा प्रतिकूल परिणामांना भारताला सामोरे जावे लागले आणि म्हणून 1947 साली स्वांतत्र्यप्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार होऊन नियोजन मार्गाचा अवलंब केला असला तरी अर्थव्यवस्था सार्वजनिक क्षेत्राकडे झुकलेली दिसून येते.

अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना अर्थव्यवस्थेचे व्यवसायनिहाय तीन क्षेत्रामध्ये विभाजन केले जाते. जसे, प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्र हे होय. प्राथमिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने शेती, मासेमारी व खाण व्यवसाचा समावेश होतो. द्वितीय क्षेत्रामध्ये उद्योग, बांधकाम, वीज निर्मिती व पाणीपुरवठा यांचा तर तृतीय क्षेत्रामध्ये बँक, आरोग्य, शिक्षण, वाहतूक दळणवळण, व्यापार इ. सर्व प्रकारच्या सेवांचा समावेश होतो. या तीन क्षेत्रांचा विकास हा देखील देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची बाब होय. या क्षेत्रनिहाय विकासावर देशाच्या विकासाचे स्वरुप व स्थिती अवलंबून असते म्हणून या बाबींचे अध्ययन होणे आवश्यक आहे. यादृष्टीने 1991 पूर्वी व नंतरची परिस्थिती थोडक्यात लक्षात घेऊ.

## 1991 पूर्वीची भारताची स्थितीः

ब्रिटीशांची राजवट निर्माण होण्यापूर्वी भारतात 'उत्तम शेती, मध्यम व्यापार' अशी स्थिती असल्याचे अनेक दाखले कागदोपत्री प्राप्त होतात. परंतू ब्रिटीशांचा अंमल सुरु झाल्यावर शेतीचे

व्यापारीकरण करण्यास सुरुवात झाली. तसेच युरोपातील औद्योगिक क्रांतीमुळे भारतातील व्यापार-उद्योग यावर प्रतिकूल परिणाम झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अन्नधान्याची समस्या निर्माण झाली. देशात जेवढे अन्नधान्य निर्माण होत होते त्यापेक्षा जास्त धान्याची आवश्यकता असल्यामुळे निर्यातीपेक्षा आयात व्यापारात जास्त वाढ झाली. शोधनशेष प्रतिकूल होत गेला. हळूहळू पंचवार्षिक योजनाद्वारे अन्नधान्याचे उत्पादनात वाढ करण्याचे प्रयत्न सुरु झाले. तद्वतच औद्योगिकीकरणाचा विकास करण्याचे उद्दिष्ट प्रयत्नरत झाले. तसेच सेवाक्षेत्राचा देखील विकास साधण्यात आला. सामाजिक संरचना व सोयीसवलती यांच्या निर्माणावर भर देण्यात आला. त्यामुळे शिक्षण आरोग्याच्या सोयीत वाढ होऊन त्यांचा लाभ समाजाला होऊ लागला आणि भारत विकासाच्या पहिल्या टप्प्याकडून दूसऱ्या टप्प्याकडे वाटचाल करु लागला. दूसऱ्या टप्प्यातील विविध समस्या जसे, दारिद्रय, विषमता, अति लोकसंख्या, बेरोजगारी अशा अनेक समस्यांची गुंतागुंत वाढत गेली. तशातच 1991 मध्ये भारताला उदारीकरणाचे धोरण स्विकारावे लागले. म्हणजेच 1991 पासून अर्थव्यवस्थेला एक नवीन वळण प्राप्त झाले. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप जे मिश्र अर्थव्यवस्था असे असून सार्वजनिक क्षेत्राकडे झुकले होते ते आता जागतिकीकरणाच्या धोरणामुळे भांडवलवादाकडे झूकणारे असे झाले. पर्यायाने सार्वजनिक क्षेत्राचे आकूंचन होऊन सरकारी खर्चात कपात, सार्वजनिक उद्योगातील निर्गूंतवणूकीकरण या धोरणाला चालना मिळाली. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग त्यांच्या किंमतीपेक्षा खुपच कमी किंमतीला खाजगी व्यक्तींना विकल्या गेले. तसेच शेतीच्या बाबतीत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये देखील कपात करण्यावर जागतिक बँकेने दबाबतंत्राचा वापर केला व अर्थव्यवस्थेचे स्वरुप भांडवलवादी होऊन जागतिकीकरणाने वेग धरला.

**1991 नंतरची भारताची स्थिती:**

1991 पासून धोरणात बदल करण्यात आले व जागतिकीकरणाचा स्विकार करण्यात आला त्याकरिता भारतात जे आर्थिक संकट निर्माण झाले त्यासाठी वाढते विदेशी कर्जाचे प्रमाण, वित्तीय तूट, शोधनशेषातील असंतूलन, गल्फचे यूद्ध, राजकीय अस्थैर्य, महागाई ही सर्व कारणे महत्वाची ठरतात. याकरिता वित्तीय समावेशन, शोधनशेषातील संतूलन याशिवाय विदेशी व्यापार, विदेशी भांडवल प्रवाह यांना प्राधान्य देणे अनिवार्य ठरले आणि म्हणून खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांचा स्विकार केला गेला. अर्थात यामध्ये जगातील अर्थव्यवस्थांचे आर्थिक परस्परालंबन, व्यापाराची मुक्तता व आर्थिक एकीकरण या बाबींचे अवलंबन सर्व देशांकडून होणे अपेक्षित असते. परंतू प्रत्यक्षात मात्र असे घडले नाही. जागतिक बँकेने पर्यायाने अमेरिकेने विदेशी विनिमय दराचे समायोजन, रुपयाची परिवर्तनीयता, विदेशी भांडवलाचे प्रमाणात वाढ, आयातीचे उदारीकरण या बाबींमध्ये वाढ केली परंतू निर्यातीचे उदारीकरण मात्र मान्य केले नाही म्हणजेच व्यापार मूक्त पण न्याय (विकसनशील देशांच्या बाबतीत) नाही अशी भूमिका स्विकारली. थोडक्यात विदेशी

गुंतवणूक व तंत्रज्ञानाला मूक्त आगमन व निर्गमनाचे स्वातंत्र्य, मक्तेदारी प्रतिबंधक कायद्यांचे उदारीकरण, परवाना पद्धतीचे उच्चाटन परंतू विकसनशील देशाच्या संरक्षण धोरणावर प्रतिबंध व स्वतःच्या देशात राखीव संरक्षण धोरण असे स्वहितवादी धोरण स्विकारले म्हणजे प्रत्यक्षात विकसनशील देशांचा विकासासाठी वापर करुन घेतल्याचे स्पष्ट होते. या धोरणाच्या निमित्याने शेती, उद्योगक्षेत्रावर झालेला प्रभाव लक्षात घेऊ.

शेती -

पंचवार्षिक योजनांद्वारे शेती उत्पादनाची उद्दिष्टये गाठण्याचा प्रयत्न केला गेला. परंतू तत्कालीन विविध राजकीय, नैसर्गिक, सामाजिक समस्यांद्वारे शेती उत्पादनाचे उद्दिष्ट कमी-जास्त प्रमाणात गाठल्या गेले. त्यामुळे विकास दर घटला म्हणजेच शेतीकडे पाहिजे तेवढ्याा प्रमाणात लक्ष दिल्या गेले नाही. अन्नधान्याचे उत्पादन प्रचंड प्रमाणावर वाढले तर त्याच्या साठवण्याचा प्रश्न निर्माण होतो, तर काही ठिकाणी कमी उत्पादकतेसाठी सिंचनसोयी, विजपुरवठा यांचा अभाव ही कारणे महत्वाची ठरतात. त्यामुळे कृषीक्षेत्राचा दर कमी राहतो. त्याकरिता सरकारला जागतिक बँक व प्डथ् ;आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीद्ध यांचेकडून कर्ज प्राप्त करण्यासाठी त्यांच्या कडक निर्बंधाचे पालन करावे लागले. जसे शासनाच्या गोदामातील अन्नधान्याची साठवणूक कमी करणे, अन्नमहामंडळाच्या भूमिकेचे महत्व कमी करणे. शासनाच्या किंमत-हमी धोरणात बदल करुन मूक्त बाजारयंत्रणेचा अवलंब करणे, भारतीय अन्नधान्याच्या किंमती आंतरराष्ट्रीय पातळीवर आणणे, शेतमालाबाबत परकीय धोरण उदार करणे आणि खत, सिंचन, विज यांच्या किंमतीत वाढ करणे (म्हणजेच अनुदान कमी करणे) इ. बाबी शेतीक्षेत्राबाबत स्विकाराव्या लागल्या. तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशनिंग) कमी करावी यावर भर दिला.

या सर्व बाबींचा परिणाम होऊन शेती उत्पादनातील असंतूलन अजुन वाढले असून शेतीच्या विकासावर काही प्रमाणात त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले. ग्रामीण भागात आज अनेक सोयी जसे वीज, रस्ते, पाणी, इंटरनेट (आंतरजाळे) जरी पोहोचले तरी त्यांची नियमित उपलब्धता नसल्यामुळे पूरेशा प्रमाणात त्या सोयींचे उपयोजन केल्या जाऊ शकत नाही. (तसेच अजुनही काही ग्रामीण भागात या बाबींचा विस्तार होणे राहिले आहे.) त्यामुळे शेती विकासाला अजुनही योग्य दिशा प्राप्त झाली नाही.

**उद्योगः-**

1950-1965 च्या काळात सार्वजनिक क्षेत्राला जास्त महत्व होते. लोखंड, पोलाद, रासायनिक खते, वीजनिर्मिती व वितरण तसेच अवजड यंत्रे असे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात होते. 1951 मध्ये सार्वजनिक प्रकल्पातील गुंतवणूक 29 कोटी रु. होती ती वाढून 1990 पर्यंत 99.33 हजार कोटी रु. इतकी झाली. पंचवार्षिक योजनांद्वारे नियोजन करुन औद्योगिक विकास करण्याचा प्रयत्न केला जात असतांना 1991 मध्ये उदारीकरणाचे धोरण स्विकारले गेले. उद्योगांच्या बाबतीत

संरक्षणाचे धोरण आतापर्यंत स्वीकारले होते. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमता, अतिरिक्त नोकरभरती, दफ्तरदिरंगाई, राजकीय दबाव, परताव्याचा कमी दर या सर्व कारणांमुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग खाजगी क्षेत्रात आणले गेले. स्पर्धेच्या तत्वावर भारतीय उद्योग विदेशी वस्तुंच्या तुलनेत मागे पडले व त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन भारतीय उद्योगातील उत्पादन वाढीचा दर काही प्रमाणात कमी झाला. औद्योगिक विकास दर कमी होण्यास विदेशी वस्तू राशीपतन द्वारे विकल्या जाणे तसेच वाहतूक, दळणवळणाच्या अडचणी, अपूरा वीजपुरवठा हेही घटक कारणीभूत ठरले.

उद्योगक्षेत्रातील परवानापद्धती रद्द झाल्यामुळे काही गुंतागुंत कमी झाली. त्यामुळे नवउद्योजकांना संधी प्राप्त होण्यास वाव मिळत असला तरी श्रीमंत औद्योगिक घराण्यांचा विस्तार जास्त होऊन त्यांचे केंद्रीकरण वाढले. लघ् व कुटीर उद्योगांच्या विकासावर देखील परिणाम होतो. अर्थात सध्या स्टार्ट-अप, मेक-इन-इंडिया अशा नवोपक्रमाद्वारे उद्योगशिलतेला वाव देण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच मोठ्या घराण्याद्वारे देशाला मोठ्या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवण्याची गरज पूर्ण करता येते. असे असले तरी मुक्त विदेशी भांडवल प्रवाहांद्वारे देशातील महत्वाच्या उद्योगावर विदेशी वर्चस्व निर्माण झालेले दिसून येते. तसेच भांडवलाचे निशेषीकरण केले जाते. त्यामुळे औद्योगिक विकासात संतुलन साधले जाईल असे औद्योगिक धोरण स्विकारणे व राबवणे हे एक मोठे आव्हान आहे. कारण जागतिकीकरणातील औद्योगिक नितीमुळे औद्योगिक विकासात उच्चावचने निर्माण होऊन उत्पादन पद्धतीत असमतोल निर्माण झाला आहे. तसेच विदेशी स्पर्धेची भिती व व्यापाराचे केंद्रीकरण घडून आले आहे.

शेती व उद्योगाशिवाय सेवाक्षेत्रातही अनेक बदल घडून आले. संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत क्षेत्रातील तसेच अनियमित रोजगारात वाढ घडून येत आहे. त्यामुळे असुरक्षित रोजगाराचे क्षेत्र विस्तारत आहे. तसेच वित्तीय क्षेत्रातही बदल घडवून आणल्या गेले. खाजगी क्षेत्रातील बँकांना या नवीन नितीमुळे प्रोत्साहन मिळत आहे, तसेच बँकांचे वैधानिक रोखता प्रमाण व राखीव निधी प्रमाण यातही बदल घडवून आणले जात आहे. अनेक बँकांचे सामायिकीकरण होत आहे. विविध प्रकारच्या सेवांचे कंत्राटीकरण करण्यात येत आहे. कार्यक्षमता, स्पर्धा व नफा या तीन भांडवलवादी तत्वांवर विविध क्षेत्रांचा विकास अवलंबून आहे. त्यामुळे सुरक्षितता, नियमितता व स्थैर्यता ह्या सामाजिक व मुलभूत तत्वांना छेद दिला जात आहे.

**समारोप -**

जागतिकीकरणाच्या धोरणाचा स्विकार करुन आर्थिक विकासदरात वाढ घडवून आणल्या गेल्याचे चित्र जरी स्पष्ट होत असले तरी प्रत्यक्षात खरोखर विकास साधला गेला किंवा नाही याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. अर्थतज्ञ जार्ज ड्रेज व अमर्त्य सेन यांच्या मते आर्थिक विकासात देशातील सर्व समाज, व्यक्ती यांच्या विकासाचा सहसंबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण आर्थिक विकासाचा संबंध हा अल्पसंख्य नाही तर

बहूसंख्य लोकांच्या आर्थिक स्थितीच्या विस्ताराशी संबंधीत आहे. त्यासाठी सार्वजनिक उत्पन्नात वाढ होऊन सामाजिक प्रगती साधणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाद्वारे समाजासमोरच्या समस्या सोडवणे शक्य झाले किंवा नाही याचा विचार होणे महत्वाचे आहे.

प्रत्यक्षात आर्थिक विकास दरात जरी वाढ होत गेली जसे 1980 मध्ये 5.9 टक्के, 1990 मध्ये 7.6 टक्के तर 2015-16 मध्ये 7.9 टक्के असा असला तरी प्रत्यक्षात प्रति व्यक्ती खर्चात घट झाली. जो विकास झाला त्यामुळे आर्थिक विषमतेत व दारिद्रय, प्रादेशिक विषमतेत वाढ झालेली आढळून येते. तसेच रोजगारविहीन विकासाचे प्रारुप असलेले दिसून येते. कूपोषणाच्या समस्येत वाढ होऊन आरोग्य, शिक्षण या मुलभूत बाबींकडे पूरेसे लक्ष दिले गेले नाही. म्हणजे सद्यस्थितीत प्राप्त झालेला विकास हा सामाजिकदृष्ट्याा न्यायपूर्ण नसून अन्यायपूर्वक आहे. कारण समाजातील प्रत्येक घटकाचा विचार होणे हे सर्वंकष व संतुलीत विकासाचे उद्दिष्ट आहे. संतुलीत व सर्वंकष विकास साधण्यासाठी प्रत्येक देशाने जागतिकीकरणातील धोके ओळखून, विकासाच्या पाझर प्रभावाची अपर्याप्तता लक्षात घेऊन स्वतःच्या देशाच्या भौगोलिक, सामाजिक व एकूण आर्थिक परिस्थितीच्या आधारे स्वावलंबी व स्वदेशी विकासाचे प्रारुप निर्माण करणे आवश्यक आहे. याकरिता तज्ञ समितीने तशाप्रकारची रचना आराखडा तयार करणे गरजेचे आहे. तशा प्रकारची तयारी व वातावरण निर्माण करण्याची जनतेची अभिलाषा महत्वाची ठरते. त्यादिशेने वाटचाल करणे व विकासाची कामे करणे याकरिता सरकार व समाज यांची परस्पर सहकार्यता ही स्थैर्यासह स्थायी विकासाचे उद्दिष्ट गाठण्यास पूरक ठरते.

**संदर्भसूचिः**


- Puri & Mishra, (2020). Indian Economy Himalaya publishing House, Mumbai
- देसाई व भालेराव (२०१६). भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
- जहागिरदार, दि. व्यं. (२०११). आर्थिक जगत खंड-३, सेंटर फोर एकोनोमिक अंड सोशल स्टडीज अमरावती प्रकाशन.
- जहागिरदार, दि. व्यं. (२०११). आर्थिक जगत खंड-४, सेंटर फोर एकोनोमिक अंड सोशल स्टडीज अमरावती प्रकाशन.
- जहागिरदार, मुक्ता (२००९). आर्थिक चिकित्सा सेंटर फोर एकोनोमिक अंड सोशल स्टडीज अमरावती प्रकाशन.
- जहागिरदार, मुक्ता (२००९).परामर्ष विकासाचा, सेंटर फोर एकोनोमिक अंड सोशल स्टडीज अमरावती प्रकाशन.

# भारतीय अर्थव्यवस्था: स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील नवी आव्हाने आणि नव्या संधी

**डॉ. राजू घनश्याम श्रीरामे**
उपप्राचार्य तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम
भ्रमणध्वनि :९०४९९४०२२१
smitarajan76@gmail.com

**बिजशब्द :** आर्थिक क्षेत्रातील बदल, पंचाहत्तर वर्षातील उपलब्धी, औद्योगिक बदल, आर्थिक विकासाच्या सामाजिक दिशा

**प्रस्तावना:**

सन २०२१ हे वर्ष म्हणजे भारताचे अमृत महोत्सवी वर्ष असून या ७५ वर्षात भारताने कोणकोणत्या क्षेत्रात प्रगती केलेली आहे त्याचा हा लेखा जोखा असून या ७५ वर्षात भारताने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केलेली दिसून येत आहेत. भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले परंतु तत्पुर्वी आपली देशाची गणना मागास राष्ट्रांमध्ये केल्या जात होती. इतरांच्या दृष्टीने मागास देश म्हणून गणल्या जाणाऱ्या भारताने त्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षात विविध क्षेत्रात नेत्रदीपक म्हणावी अशीच प्रगती केलेली आहे. यात आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक व अवकाश तंत्रज्ञान व नवनवीन आविष्कारात्मक प्रगतीचा आणि त्यासमोरील आव्हानांचा हा घेतलेला आढावा असून यात सर्वच बाबींचा विचार करण्यात आलेला आहे. आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्याकडे देशवासीयांना पुरवता येईल एवढे सुद्धा अन्न नव्हते. देशात अन्न धान्याची प्रचंड तुट जाणवत होती. सन १९६४ साली डॉ. नार्मन बोरलॉग यांच्या नेतृत्वात जागतीक हरितक्रांती घडून आली त्यावेळपासूनच भारताने सुद्धा प्रेरणा घेवून १९६५ मध्ये डॉ. एस. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली भारतीय हरितक्रांती घडवून आणली गेली.त्यामुळे एकूणच तेलबिया, तांदूळ, डाळ, ज्वारी, गळीत पिके, गहु या कृषी उत्पादनाचे उत्पादन वाढले आणि भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. अन्नधान्याच्या बाबतीत देश केवळ स्वयंपूर्णच नव्हे तर आत्मनिर्भर झालेला आहे. ही मागील ७५ वर्षातील सर्वात मोठी उपलब्धी मानवी लागेल. आज देशात दुष्काळ पडला तरी उपासमारीने गरीब जनता मरतील अशी स्थिती राहिलेली नाही. हेच या भारतीय हरीतक्रांतीचे सुयश आहे

**भारताने मागील पंच्याहत्तर वर्षांत काय कमावले?**

या एकूणच पंच्याहत्तर वर्षांच्या संपूर्ण काळात जगभरात मोठ्या प्रमाणात उलथापालथ झालेली दिसून येत आहे. . जगातील अनेक साम्यवादी हुकुमशाही राजवटी कोसळून पडल्या. शेजारच्या पाकिस्तानात लष्करी हुकुमशाही राजवट आली. अनेक देशात अनेक ठिकाणी बंड, उठाव झालेत. अनेक देशात लष्करी क्रांती घडून आल्यात. एकच दिवसाच्या फरकानी भारत व पाकीस्थान हे दोन देश स्वतंत्र झालेत. परंतु भारतात शांतीपूर्ण लोकशाही मार्गाने सत्तेचे सत्तांतरण होतांना दिसून येते तर पाकिस्स्थानात मात्र रक्तरंजित सत्तांतरण होताना दिसते. यावरून भारतात किती लोकशाही व्यवस्था व तिची मुल्ये रुजलेली आहेत व ती रुळलेलीआहे हे स्पष्ट होते. या देशात वेगवेगळ्या बोली भाषा, रूढी, परंपरा, वेगवेगळ्या समस्या, वेगवगळे भौगोलिक वातावरण असूनही भारतात मात्र लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास अधिक अभंग राहिलेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, पांथिक, भाषिक अशी सर्वच प्रकारची विविधता असणा-या या देशात सर्वच बाबींवर या देशातील जनतेने आपला विजय मिळवत राष्ट्रीय एकता व एकात्मता जोपासत प्रगती साधलेली आहे. अन्नधान्याच्याच बाबतीत नव्हे तर देशात वेळोवेळी पडलेल्या दुष्काळावर मात करण्यात आपल्याला गेल्या काही वर्षात बरेच यश मिळालेले आहे. देशात वाढत्या औद्योगिकरणामुळे रोजगारात वाढ होऊन जनतेच्या उत्पन्नात वाढ होऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झालेल्या आहेत. देशातील निम्मापेक्षा गरीबी कमी झालेली आहे. त्याचवेळी देशातील विविध प्रदेशातील साक्षरताही मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येत आहे. देशातील आजघडीला आरोग्य व्यवस्थाही आज कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुधारावी लागत आहे. नव्हे ती तर काळाची गरज झालेली आहे. देशात आलेल्या कोरोनाच्या दुस-या लाटेत आरोग्य व्यवस्थेच्या मर्यादा उघड झाल्यात. मागील ७० वर्षात देशाच्या केंद्र सरकारने व राज्य सरकारांनी आरोग्य व्यवस्थेकडे पूर्ण दुर्लक्ष केल्यामुळेच लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागलेले होते. देशाच्या आरोग्य व्यवस्थेत कराव्या लागणा-या सुधारणा ह्या काही एका रात्रीत होणारी बाब नाही. त्याच्या मुलभूत बदलासाठी काही काळ जावा लागणार आहे. देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर कमीत कमी १०% एवढा खर्च सलग १० वर्ष केला जाणार असेल तरच त्यात बदल होणे अपेक्षित आहे. आज तो केवळ १.५% ऐवढा खर्च केला जातो. शहरे व गाव खेडी आरोग्य सेवेच्या बाबतीत सुधारणे आवश्यक आहे. काही किमान उपचारांचा विचार करता आयुष्यमान योजना हे सर्वात मोठे सरकारची या ७५ वर्षातील उपलब्धी मानावी लागेल. आता दुरवर्ती गाव खेडयातील जवळच्या खेड्या गावातही आज किमान प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे आरोग्यविषयक उपचार मिळू शकतात. इतकेच काय आता परदेशातील अनेक लोक कठीण परंतु स्वस्त उपचारासाठी भारतात येऊ लागलेले आहेत. गेल्या मागील काही वर्षांपासून देशाच्या आर्थिक विकासाचा दर आठ टक्क्यांहून जास्त राहिलेला आहे. कोरोनाच्या या दोन वर्षात घसरलेला आर्थिक

विकास दर सोडला तर आज जगात सर्वांत वेगाने विकसित होणारी ही भारताची अर्थव्यवस्था आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जगात भारताचे नाव आज घेतले जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत एक जागतिक महाशक्ती म्हणून पुढे आलेला आहे. भारतीय बुद्धिला मिळालेली ही जगन्मान्यता आहे. त्यामुळेच बीपीओ, टेलिकम्युनिकेशन्स, आणि फार्मास्युटीकल्स, अवकाश तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये भारताचा दबदबा आहे. जगात सध्या भारतीय अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. हे चित्र अगदी कालपरवा पर्यंत होते. परंतु मागील काही काळात कोरोना या चीनी ड्रॅगनच्या राक्षसाने जगातील संपूर्ण विकसित देशांच्या अर्थव्यवस्था गिळंकृत केल्यात. यात भारत सुद्धा वेगळा राहिलेला नाही. यामुळेच किमान आज तरी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या ५ ट्रीलीयनच्या स्वप्नावर पाणी फेरले गेले आहे हे सत्य दिसून येत आहे.

**भविष्यातील भारतासमोरील आव्हाने**

मागील काही वर्षात श्रीमंत तसेच मध्यमवर्गीय घटकांचे उत्पन्न वाढल्यामुळे आता नागरिक सुद्धा मुख्य साधन सुविधांचा दर्जा वाढविण्याची मागणी करत आहेत. भारत सरकारनी सुद्धा पाणीपुरवठा, पर्यावरण, शिक्षण, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रांकडे लक्ष देण्याची गरज आहे. प्राथमिक ते सामान्य शालेय शिक्षण आता जवळच्या गावा लगत मिळू लागले आहे. मात्र त्यातून अपेक्षित ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. भारताच्या जन्मदरात दोन टक्के घट झाली असली तरी लग्नानंतर मुलींच्या मृत्यूच्या दरात मात्र थोडी वाढ झाली आहे. बालमृत्यूचे प्रमाण घटले असले तरी कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबले नाहीत. दिवसें दिवस मातामृत्युचे प्रमाण वाढत आहे याकडे नव्या भारतानी लक्ष देणे आवश्यक आहे. देशाला न्या भारताची नव्याने निर्मिती करण्याकरिता देशात पायाभूत सुविधांमध्ये वीज, रस्ते, वाहतूक, विमान उद्यान, रेल्वे आणि बंदरे यांची मोठी गरज आहे. यातूनच उद्याचा सशक्त भारत निर्माण होवू शकेल हेच खरे वास्तव आहे.

**देशातील वाढती सामाजिक - आर्थिक विषमता**

देशाने आर्थिक विकासाच्या वाटेवर चालताना देशातल्या देशात अनेक सामाजिक-आर्थिक विषमता निर्माण होत आहेत. सन १९९० नंतर देश वेगाने विकास करत असताना मध्यमवर्गीय लोकांच्या उत्पन्नात मोठी वाढ झालेली आहे. मात्र श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण भाग, विकसित आणि अविकसित भाग, कुशल कामगार आणि अकुशल कामगार, प्रादेशिक विकासाचा असमतोल, खाजगी व सार्वजनिक क्षेत्र यातील दरी मात्र दिवसेंदिवस वाढलेली आहे. यातून देशात नवी सामाजिक-आर्थिक विषमता जन्माला आलेली आहे. त्यामुळे यातून अनेक सामाजिक-आर्थिक प्रश्नही निर्माण झालेले आहेत. इतक्या वर्षानंतरही देशातील कृषीक्षेत्राकडे सरकारकडून जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले नाही याचे खरोखरच वाईट वाटते. आज विकसित देश जे कृषिप्रधान देश नाहीत परंतु त्या देशातील कृषी पिकांच्या दर हेक्टरी

उत्पादनाच्या बाबतीत त्यांचे उत्पादन जास्त आहे. पण भारतासारख्या कृषिप्रधान देशातील कृषी उत्पादन तुलनात्मक दृष्ट्या अत्यंत कमी आहे. याचाच अर्थ असा आहे कि, भारतातील शेतीतील उत्पादन व विकासाचा दर अत्यंत कमी आहे. अद्यापही दोन तृतीयांश भारतीय जनता ही शेतीवर अवलंबून आहे. पण शेतीतून मिळणारे उत्पादन आणि उत्पन्न अत्यंत कमी आहे. आर्थिकदृष्ट्या शेती न परवडणारी आहे. अनेक ठिकाणी ती पारंपरिक पद्धतीने केली जाते. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या सिंचन योजनाही जुन्याच भारतीय शेती हि मान्सूनचा जुगार असल्यामुळे भारतीय शेतीही एक जुगार बनलेली असून यातूनच शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या हे एक कृषिप्रधान देशात लांछन आहे. कृषी विपणन व्यवस्थेचा विचार करता शेतमाल बाजारपेठेत नेण्याची योग्य वाहतूक व्यवस्था नाही. जेथे कृषी माल पिकतो तिथे विकला जात नाही. ग्रामीण भागातील कृषी माल शहरी भागातील मार्केटपर्यंत न्यायला रस्ते नाहीत किंवा वाहतुकीची साधने गाव खेड्यापर्यंत उपलब्ध नाहीत हि एवढ्या वर्षातील शोकांतिका आहे. शेतकरी बाजारही  कृषी उत्पन्न बाजारातील नियमांच्या कचाट्यात आणि मक्तेदारीच्या जाळ्यात अडकले आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही तर मध्यस्त दलाल फायदा घेवून शेतक-यांच्या टाळूवरचे लोणी खात आहेत. यासारख्या अनेक कारणामुळेच शेतीत काम करणारा शेतकरी वर्ग आज शहरी भागात स्थानांतरीत होत आहे. भारतीय शेतीत मोठ्या प्रमाणात छूपी बेकारी अस्तित्वात असून त्या शेतक-यांची सीमांत उत्पादकता शून्य आहे. प्राथमिक क्षेत्रातील शेतीचा हिस्सा दिवसेंदिवस घटत चाललेला आहे. पण याचबरोबर एक चांगली महत्वाची गोष्ट म्हणजे सेवा क्षेत्रात नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. या संधी उपलब्ध होत असताना दुसरीकडे इतर क्षेत्रातील बेरोजगारांचा आकडाही वाढत आहे. त्यातही अकुशल कामगारांना हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे.  आजचे तर वास्तव याहीपेक्षा घातक असून बेरोजगारीचा आकडा हा १३ कोटीच्या वरती गेलेला आहे.

## आर्थिक विकासातील प्रादेशिक व सामाजिक विषमता

देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासातील विषमता हि राज्या राज्यांमध्ये सुद्धा आहे. उच्च उत्पन्न असलेल्या अनेक विकसित राज्यांनी आपल्याकडील गरीबी कमी करण्यात यश मिळवले आहे. पण आसाम, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्यप्रदेश, ओरीसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही राज्ये विकासात मागे पडली आहेत. एवढी वर्षं देशाचे केंद्रीय नेतृत्व ज्या हिंदी भाषीक राज्यातून आलीत ती राज्ये एवढ्या वर्षानंतरही विकासाच्या स्पर्धेत मागे पडलेली आहेत. याचाच अर्थ असा कि या केंद्रीय नेतृत्वानी तसेच त्यांच्या प्रतिनिधिनी हेतुपुरस्पर स्वतःच्या गृह राज्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केलेले आहे. देशातील अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण असलेला आधार म्हणजे मध्यमवर्ग होय. या मध्यमवर्गाकडे असलेल्या खरेदीक्षमतेमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक उलाढाल होण्यास

मदत मिळते हे यापूर्वीही समोर आलेले आहे. आता सध्याच्या कोरोना काळात हे तर अधिकच अधोरेखित झालेले आहे. काही आर्थिक विश्लेषकांच्या मते, कोरोनामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील निर्यात, खासगी गुंतवणूक व सरकारी खर्च यांच्यावर विपरित परिणाम झाला आहे. यातून आताची एप्रिल ते जुन या पहिल्या त्रिमासिक कामगिरीत २३.९% टक्क्यांनी जीडीपीमध्ये घट झालेली आहे. हि एक तात्कालिक घटना असून पुढील काळात मध्यम वर्गीय जनतेनी आपली क्रयशक्ती अधिक खर्च केली तर हे चित्र बदलू शकेल. भविष्यात भारतीय अर्थव्यवस्थेचा जीडीपी सावरायचा असेल तर वस्तूंचा उपभोग व खरेदी वाढवणे याखेरीज दुसरा प्रभावी उपाय सध्यातरी दिसत नाही. सरकारनी देशाच्या अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी मध्यमवर्गाला डावलून चालणार नसल्याने या वर्गासाठी नवनवीन सरकारी योजना राबवून सरकारला अर्थव्यवस्था संकटातून बाहेर काढता येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या संकटकाळात देशातील मध्यमवर्ग हा अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण केंद्रबिंदू होणार आहे. देशाचा एकूण कल पाहण्यासाठी ईकानामिक्स टाईम्स या समूहांनी ऑनलाइन केलेल्या सर्वेक्षणात सुमारे ५०% टक्के प्रतिसादकर्त्यांनी कोरोनाचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव कमी करण्यासाठी भारतीय मध्यमवर्गाचे मनोबल उंचावणे गरजेचे आहे ही बाब समोर आली आहे.

**भारतीय समाज व्यवस्थेतील मध्यमवर्गाची दखल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळोवेळी देशातील मध्यमवर्गीय जनतेची दखल घेतलेली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यामध्ये या मध्यमवर्गाचे योगदान मोठे असल्याचे पंतप्रधानांनीही मान्य केले आहे. समाजातील हा वर्ग कोणाच्याही दयेवर, आर्थिक साह्यावर जगत नाही या शब्दांत त्यांनी मध्यमवर्गाची स्तुती केलेली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही प्रामाणिकपणे वेळेवर कर भरणाऱ्या मध्यमवर्गाची दखल घेतली आहे. सन १९९१ पासून भारताने अर्थव्यवस्था खुली केल्यापासून सातत्याने प्रत्येक सरकारने विदेशी गुंतवणूकदारांसमोर देशातील मध्यमवर्गाचे गोडले गायले आहेत. परंतु विविध योजना आखताना मध्यमवर्गासाठी सरकारी योजना आखल्याचे अभावानेच दिसून आलेले आहे. सीमांत त्यागाच्या तुलनेत या वर्गाला आयकरात सुद्धा कोणतेही लाभ मिळत नाहीत. भविष्यात सरकारला या ४ कोटी मध्यमवर्गीय जनतेला सरकारनी प्रत्यक्षात दिलासा देणे आवश्यक आहे.

**आजच्या स्थितीत देशातील मध्यमवर्ग संकटात**

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत मध्यमवर्ग चांगलाच भरडला जात आहे. या वर्गाने वर्तमानात जगण्यासाठी पूर्वी केलेली बचत बाहेर काढलेली आहे. या बचतीच्या जोरावर अनेक कुटुंबांनी स्वतःचा आर्थिक स्तर उंचावून मध्यमवर्गातील आपले जीवन सन्मानाने जगण्याचा मार्ग सुकर करून दाखविला. आता याच कुटुंबांवर मध्यमवर्गातून बाहेर पडण्याची वेळ आलेली आहे.

आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या एका अहवालानुसार कोरोनामुळे देशात ४० लाख लोकांचे रोजगार गेले आहेत. सीएमआयईच्या अहवालानुसार जवळपास दोन कोटी वेतनधारकांचे व १३ कोटी असंघटीत क्षेत्रातील लोकांचे रोजगार गेले आहेत. याचा अर्थ असा आहे कि अनेक आपल्या नोकर्या गमावल्यामुळे अनेक कुटुंबे मध्यमवर्ग या दर्जापासून खाली फेकली गेलेली आहेत. या वर्गाच्या समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**मध्यमवर्गाची कैफीयत**

गेल्या अनेक वर्षांत समाजातील दुर्बल घटकांसाठी, गरीबांसाठी तसेच श्रीमंत उद्योगपती या वर्गासाठी अनेक शासकीय योजना राबविण्यात आलेल्या आहेत. मात्र या ४ कोटी मध्यमवर्गीयांकडे कायमच दुर्लक्ष्य केल्या गेलेले आहे. कोणत्याही सरकारला ठाऊक आहे की, हा ४ कोटी मध्यम वर्ग आपले काहीच वाकडे करू शकत नाही. कारण त्याच्या मताचे मुल्य राजकीय नेतृत्वाच्या द्रुष्टीने नाममात्र आहे. या सगळ्या काळात मध्यमवर्गाच्या हाती मात्र धुपाटनेच आलेले आहे. देशातील मध्यम मध्यमवर्गावर केवळ करांचा बोजा टाकला गेला आहे. कोणतीही शासकीय योजना ठरवताना सरकारकडून मध्यमवर्गाचा विचार केलाच जात नाही किंवा त्याचा विचार शेवटी येत असल्याबद्दल आनलाइन प्रतिसादकर्त्यांनी ईकानामिक्स टाईम्सच्या सर्वेक्षणात नाराजी व्यक्त केलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता भारतीय मध्यम वर्गीय घटकाला डावलून पुढे जाणे अशक्य आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाचा एक प्रशस्त मार्ग म्हणजे वस्तूंचा अधिकाधिक उपभोग घेवून वापर वाढविणे व क्रयशक्ती वाढविणे हा आहे. भारतीय मध्यम वर्ग हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ग्रामीण व शहरी भागात सुद्धा वस्तूंचा वापर किंवा उपभोग यांचे जीडीपीमधील योगदान ६० टक्क्यांहून अधिक आहे. आज तरी वस्तूंच्या वापराच्या बाबतीत मध्यमवर्ग हा आघाडीवर आहे. आज या मध्यम वर्गाला सरकारनी मदतीचा हात दिल्यास मध्यमवर्गीय सुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेवर आलेले संकट आपली उपभोग व क्रयशक्तीने या संकटाचे संधीत रूपांतरण करू शकतात. यासाठी त्यांना दिलासा देणे आवश्यक आहे.

**नव्या संधी:**

जागतिक अर्थकारणाचा विचार करता सद्यस्थितीत भारत जगातील सर्वात वेगवान विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलेली एक अर्थव्यवस्था आहे. या पंच्याहत्तर वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेने अनेक क्षेत्रात उपलब्धी धारण केलेल्या आहेत. यातच एक महत्वाचे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था ही येत्या १० -१५ वर्षांत जगातील पहिल्या तीन आर्थिक महाशक्तींपैकी एक असेल अशी सर्वसाधारण चर्चा जागतिक व्यासपीठावरून होतांना दिसून येत आहे. जागतिक अर्थकारणाचा विचार करता सद्यस्थितीत भारत जगातील सर्वात वेगवान विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलेली एक अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही येत्या १० -१५ वर्षांत जगातील पहिल्या तीन आर्थिक महाशक्तींपैकी एक

असेल अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे. हे या देशातील मजबूत लोकशाही आणि मजबूत भागीदारीने शक्य झालेले दिसून येत आहे. एकंदरीतच भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक संकटाच्याही काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची होत असलेली आर्थिक प्रगती ही निश्चितच वाखाणण्याजोगी आहे, यात कुठलीही शंका नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिका व चीन या दोन महाकाय अर्थव्यवस्था मधील व्यवसायिक दृष्टीने सुरु असलेले व्यापार युद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर आपआपले स्थान टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. या दोन मोठ्या अर्थव्यवस्थेतील चढाओढ एका नव्या आर्थिक संघर्षाकडे घेवून जात असून चीनने आपली आर्थिक हत्यारे पुन्हा बाहेर काढण्याची कुरघोडी सुरु केलेली दिसून येत आहे. या कोरोनाच्या आर्थिक संकटात केवळ वित्तीय हानीच झाली असे नाही तर एखाद्या युद्धात मृत्युमुखी पडणार नाही ऐवढ्या मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झालेली दिसून येत आहे. यातून आर्थिक संकट व त्यातून अर्थव्यवस्थेला बाहेर पडण्यासाठी करावा लागलेला संघर्ष आणि आर्थिक आघाडीवरील अनेक आव्हाने आज देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर उभी आहेत. यात भविष्यातील सांचीच्या धूसर वाटा शोधून पुढे जाण्याचे आव्हान सुध्दा आज उभे असलेले दिसून येत आहे. आर्थिक दृष्टीनेच नव्हे तर मानवी आरोग्याच्या दृष्टीने भयावह अशा कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर सुध्दा भारत आपली प्रगती साधत आहे. यामागचे महत्वाचे कारण म्हणजे भारताची ग्राहकांवर आधारित असलेली अर्थव्यवस्था होय. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्राहक वर्गाच्या मागणीत आलेली घट हे भारताच्या जीडीपीमधील घट हेच यामागचे मुख्य कारण आहे. आजघडीला अशाही स्थितीत भारतातील ग्राहक क्रयशक्तीच्या दृष्टीने तिस-या क्रमांकावर आहे. सन २०१८ पासूनच हळूहळू भारतीय अर्थव्यवस्था अगदी संथ गतीने वाटचाल करीत असल्याचे दिसून आलेले होते. यात कोरोनाच्या आगमनाची पुन्हा भर पडल्याने जगात सर्वाधिक आर्थिक नुकसान झालेल्या दुस-या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून त्याकडे पाहीले जात आहे. जागतिक संकटाच्या अशाही पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था आपला प्रवास पूर्वपदावर येण्यासाठी करून राहिलेली दिसून येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता देशाच्या असंघटीत वर्गाची मागणी ही सर्वाधिक राहत असून आज रोजगाराचे स्त्रोतच सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याने यात ही घट आलेली दिसून येत आहे. शहरी क्षेत्राच्या उत्पादनात सध्या वाढ होण्याचे कोणतेही चित्र दिसून येत नसल्यामुळे या वर्गातील जनतेनी खर्च कमी केलेला आहे. ग्रामीण क्षेत्राचा विचार करता सध्या हे क्षेत्र सुध्दा दबलेलेच असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला कृषी सहाय्यता निधी मुळे काहीसा आधार मिळालेला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवरती आलेले हे आर्थिक व महामारीचे संकट भविष्यात कायमच राहील असे नाही. ते तात्पुरत्या स्वरूपाचे आर्थिक संकट आहे.

सन २०१९ मध्ये, मालवाहतूक आणि महत्वपूर्ण सेवांमध्ये एकूणच यू.एस.-भारत द्विपक्षीय

व्यापार १४९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचलेला आहे. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकन ऊर्जा निर्यात व्यापार संबंधातील वाढीचे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. सन २०१८ मध्ये भारताने यू.एस. क्रूड तेलाची ४८.२ दशलक्ष बॅरेल खरेदी केलेली होती, ती २०१७ हीच खरेदी मधील ९.६ दशलक्ष ऐवढी होती. गेल्या वर्षी अमेरिकन महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेमध्ये ८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त योगदान दिलेले आहे. गेल्या दशकात अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या दुपटीपेक्षा अधिक पटीने वाढलेली आहे. ही संख्या ती २००८ मध्ये ८१,००० ऐवढी होती आणि २०१९ मध्ये २०२,००० इतकी विक्रमी वाढीची नोंद झालेली आहे. भारत आणि अमेरिका- संयुक्त राष्ट्रसंघ , जी - २०, असोसिएशन ऑफ आग्नेय एशियाई नेशन्स (आसियान) प्रादेशिक मंच, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटनेसह बहुपक्षीय संघटनांमध्ये अगदी जवळून सहकार्य करीत असतात. सन २०२१ मध्ये दोन वर्षांच्या मुदतीच्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सामील झालेल्या भारताचे अमेरिकेने मनपूर्वक स्वागत केलेले आहे सुरक्षा परिषदेचा कायमस्वरूपी सदस्य म्हणून भारताचा समावेश असलेल्या सुधारित संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे समर्थन केले आहे. भारत अमेरिकेचा एक मित्र देशचं नव्हे तर आशियाई संवाद भागीदार, आर्थिक सहकार आणि विकास भागीदार आणि भारत- अमेरिकन आंतरराष्ट्रीय व्यापार,अमेरिकन स्टेट्स ऑफ ऑर्गनायझेशनचा निरीक्षक आहे. भारत हिंदी महासागर रिम असोसिएशन (आयओआरए) चा देखील एक सदस्य आहे, ज्यावर अमेरिका एक संवाद भागीदार आहे. सन २०१९ मध्ये इंडो-पॅसिफिक प्रदेशातील टिकाऊ पायाभूत सुविधांवर सहकार्य वाढविण्यासाठी अमेरिकेने आपत्ती निवारण इन्फ्रास्ट्रक्चर फॉर आपत्ती निवारणासाठी भारत सामील झालेला आहे. हे सर्वच एकंदरीत परस्पर सहकार्य व मैत्रीचे धोरण तसेच आर्थी पातळीवरील आंतरराष्ट्रीय सहकार्य एक मैत्रीचे नवे दालन उभे करीत आहे. अमेरिका व भारत या दोन देशांच्या परस्पर संबंधांच्या दृष्टीने भूतकाळात डोकावून पहिले तर असे दिसून येईल की आज हे संबंध जेवढे चांगल्या पातळीवरती आहेत, तेव्हा असे मधुर संबंध या दोन देशात नव्हते. सद्यस्थितीत भारत अमेरिकेच्या द्विपक्षीय संबंधांचा विचार करता या दोन देशातील आंतरराष्ट्रीय परस्पर आर्थिक संबंध एक नवा अध्याय जोडतील यात कुठेही शंका नाही. या परस्पर दोन देशातील अपारंपरिक घटनांच्या अनुक्रमे ब्रिटीश साम्राज्यापासून भारताच्या औपचारिक स्वातंत्र्यापूर्वी अमेरिका आणि भारत यां दोन्ही देशांनी राजनयीक - आर्थिक व मुत्सद्दी संबंध प्रस्थापित केलेले आहेत. मल्टिस्टेज स्वातंत्र्य प्रक्रियेने भारतीयांनी सहमती दर्शविली आणि ब्रिटिशांनी पूर्ण सार्वभौम स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी इतर राज्यांशी संबंध ठेवण्याचे अधिकार असलेल्या अंतरिम सरकारच्या स्थापनेस परवानगी दिलेली होती. १५ आगस्ट १९४७ रोजी अमेरिकेने भारतीय संघटनेला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिलेली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रुमन यांनी भारताचे डोमिनियन गव्हर्नर जनरल लॉर्ड लुई माउंटबॅटन यांना

अभिनंदन संदेश पाठविलेला होता. यात १ जुलै, १९४७ च्या ब्रिटीश संसदेच्या भारत स्वातंत्र्य कायद्याच्या अनुषंगाने, ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग असलेल्या पूर्वीच्या "ब्रिटीश इंडिया" मधून भारत आणि पाकिस्तान या दोन नवीन संघटना तयार केल्या गेल्यात. भारतीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या औपचारिक प्रक्रियेची सुरुवात ब्रिटिश सरकारने १६ मे, १९४६ रोजी जारी केलेल्या अहवालासह झालेली होती, ज्यामध्ये भारत ब्रिटीशांच्या गुलामगिरीपासून स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून राज्यघटनेची आखणी करण्यासाठी अंतरिम सरकार स्थापन करण्याची शिफारस केलेली होती. ब्रिटन. २ सप्टेंबर, १९४६ रोजी एक अंतरिम सरकार स्थापन केले गेले आणि हेच सरकार आहे ज्यात औपचारिक भारतीय स्वातंत्र्यापूर्वी अमेरिकेने राजनैतिक संबंध प्रस्थापित केले गेले होते. १ नोव्हेंबर १९४६ रोजी अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने नवी दिल्ली येथील अमेरिकन मिशनची उभारणी एका दूतावासात केली तेव्हा दोन देशातील राजनयिक संबंध आणि नवी दिल्ली येथील अमेरिकन दूतावासाची स्थापना करण्यात आली. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने २२ ऑक्टोबर १९६६ रोजी जाहीर केले की भारत आणि अमेरिकेच्या सरकारांनी "राजदूतांची देवाणघेवाण करण्यास आणि आपापल्या मिशन्समध्ये दूतावासांच्या पदासाठी परस्परांना सहकार्य करतील असे निश्चित केले गेली होते. या काळापासूनच दोन देशातील आर्थिक व सामरिक तसेच राजनयिक संबंध जपले जात आहेत. परंतु हे दोन देशातील संबंध आज एका नव्या उंचीवर पोहचलेले आहेत. सद्यस्थितील अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी आपल्या राजनयिक व प्रशासनिक पातळीवर भारतीयांची गुणवत्ता हेरून ज्या पद्धतीनी त्यांनी भारतीयांना व्हाईट हाउस मध्ये स्थान देणे सुरु केलेले आहे त्यावरून असे वाटते की, येणा-या काळात अमेरिका व भारत यांच्यातील केवळ परराष्ट्रीय संबंधाच नव्हे तर आर्थिक- व्यापारिक परस्पर सह्संबंध अधिक नव्या उंचीवर जाऊन पोहचतील यात शंका नाही . भारताने अमेरिकेला कोरोना काळातील केलेली औषधीय व वैद्यकीय मदत असो किंवा आताच २१६ अरब डॉलर्स म्हणजेच १५ लाख करोड रुपयांचे अमेरिकेला दिलेले आर्थिक मदतीपोटी कर्ज असो ही दोन देशातील नव्या आर्थिक हितसंबंधाची नवी कहाणीच नव्हे तर भारताच्याही आर्थिक महाशक्ती बनण्याच्या प्रक्रियेला अमेरिकेने दिलेली अप्रत्यक्ष मान्यताच आहे असे समजायला हरकत नाही.

**समारोप:**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ पर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने नेण्यासाठी नवी दिशा दाखवलेली आहे. त्या दृष्टीने अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरु झालेली असतानाच कोविडचे जागतिक पातळीवर आगमन झाले. यात देशाच्या अर्थव्यवस्थेला सर्वात मोठा तडाखा बसलेला दिसला. आता मात्र पुढील ३ वर्षात भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी पहिल्यापेक्षा अधिक ऊर्जेने काम करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. भारत

आधीपासूनच जगातील सर्वात मोठा तिसरा तेल आयात करणारा देश आहे. येणाऱ्या काळात भारताच्या ऊर्जाविषयक गरजा वाढतील यात शंकाच नाही. भौगोलिकदृष्ट्या आपण जवळ असल्या कारणाने आपल्या ऊर्जाविषयक गरजा भागवण्यासाठी पश्चिम आशियाई तेल निर्यातक देशांवर अधिक अवलंबून आहोत. दुसरीकडे पश्चिम आशियाई देशांमध्ये भारतातील लोक मोठ्या संख्येनं काम करत आहेत. त्यामुळे आखाती देशांसोबतचे आपले संबंध अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. आपल्या ऊर्जाविषयक गरजा पूर्ण व्हाव्यात हे देखील त्यामागचे कारण आहे आणि तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय कामगारांनी आपली कमाई भारतात पाठवत राहावी. यालाच दैवदत्त सिद्धांत असे म्हणतात. याचे मोठ्याप्रमाणात लाभ देशाला मिळत आहेत. हे संपूर्ण हीत लक्षात घेऊन आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी भारत आणि आखाती देशांमध्ये सामरिक संबंध अधिक दृढ करण्याची आवश्यकता आहे. ज्या प्रमाणे भारत-पॅसिफिक क्षेत्रात आपण जपान, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेसोबत काम करत आहोत, त्याप्रमाणे पुढील एका दशकात भारताला या देशांसोबतचे मजबूत असलेले सुरक्षाविषयक संबंध, तसेच आर्थिक संबंध अधिक विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करावे लागेल. भविष्यात भारतानं असे धोरण अवलंबले तर भारताच्या ऊर्जाविषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या आखाती देशांतील सुरक्षाविषयक समीकरणांमध्ये भारताचे महत्व अधिक वाढेल आणि आपण यामध्ये सक्रिय स्वरूपात भागीदार होऊ शकतो. भारताने मागील ७५ वर्षात बरेच काही कमावले असुन अनेक आव्हाने आजही देशासमोर आहेत. यात दारिद्र्य, बेरोजगारी, वाढती लीक्संख्या, देशाच्या सीमांचे प्रश्न, शेजारी देशांच्या कुरघोडी, आर्थिक विकासाचे प्रश्न, ग्रामीण विकास, बुनियादी विकास, उच्च शिक्षण व संशोधन, आरोग्य शिक्षण, पर्यावरणीय तत्वांचा विकास, आंतरराष्ट्रीय व्यापार असंतुलन, अंतर्गत सुरक्षा, तंत्रज्ञान विकास अवरोध, दूरत्व क्षेत्राचा विकास, सर्व स्पर्शी सर्व समावेशी विकास अशी देशासमोर अनेक आव्हाने असतानाच धार्मिक उन्माद, अंतर्गत शत्रूंचा सुळसुळाट अशा अनेक आव्हानांचा डोंगर देशासमोर उभा आहे. सन २०४७ मध्ये भारत देश जेव्हा भारतिय स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव साजरा करेल तेव्हा भारत पहिल्या ३ आर्थिक महाशक्ती पैकी एक महाशक्ती म्हणून नव्याने उदय होईल. याबरोबरच भारताला भविष्यासाठी सर्वसमावेशी चिरंतन विकासाचे प्रारूप तयार करून आपली पुढील वाटचाल करावी लागेल.

**संदर्भ** :


- श्रीरामे राजू, भारतीय अर्थव्यवस्था नवी : आव्हाने नव्या संधी, संपादक, दिलीप ऐडतकर, विदर्भ मतदार, रविवारीय पुरवणी, दिनांक,२१ / २०२१ / ११, आवृत्ती बडनेरा अमरावती .
- Car baugh, Robert J. International Economics. 14th ed. Mason, OH: South-Western, 2012.

- Durlauf, Steven N., and Lawrence E. Blume, eds. The New Palgrave Dictionary of Economics Online. Basingstoke, UK: Palgrave Macmillan, 2012–.
- Feenstra, Robert C., and Alan M. Taylor. International Economics. 2d ed. New York: Worth, 2012.
- Grossman, Gene M., and Kenneth S. Rogoff, eds. Handbook of International Economics. Vol. 3. Amsterdam: North-Holland, 1995.
- Jones, Ronald W., and Peter B. Kenen, eds. Handbook of International Economics. 2 vols. Amsterdam: North-Holland, 1984–1985.
- These volumes of the Handbook collect surveys of all major topics in international trade and macroeconomics. They represent an essential reference of the state-of-the-art literature in the mid-1980s. Volume 1 and Volume 2 are available online for purchase or by subscription, by chapter. Also see International Macroeconomics (Volume 2).
- Krugman, Paul R., Maurice Obstfeld, and Marc Melitz. International Economics: Theory and Policy. 9th ed. Boston: Pearson Addison Wesley, 2012.

# ग्रंथ परिचय - अर्थशास्त्राचे नोबेल विजेते (२०११ते २०२१)

## लेखक- प्रशांत हरमकर

### प्रकाशक –कॉम्प्यूटर नेटवर्क ३३, आय.टी. आय. कॉलनी, अमरावती

**डॉ. कुमुदिनी जोगी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जगदंब महाविद्यालय, अचलपूर

'अर्थशास्त्राचे नोबेल विजेते (२०११ ते २०२१)' हा डॉ. प्रशांत हरमकर यांचा ग्रंथ कॉम्प्यूटर नेटवर्क ३३, आय.टी. आय. कॉलनी, अमरावतीने प्रकाशित केला आहे. विशेष म्हणजे डॉ. प्रशांत हरमकर हे कौटील्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावतीचे आजीव सदस्य असून विदर्भातील ख्यातनाम महाविद्यालय शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावतीचे ते माजी विद्यार्थी आहेत. २०२१ - २०२२ हे या संस्थेचे शतक महोत्सवी वर्ष असल्याच्या निमित्ताने ज्या ठीकाणी आपल्या शैक्षणिक प्रगतीची पायाभरणी झाली त्या संस्थेच्या प्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने सदर पुस्तक शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरातीला त्यांनी समर्पित केले आहे. सर्वप्रथम मी लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन करते. या पुस्तकाची पृष्ठसंख्या २४४ ऐवढी असून एकूण ११ प्रकरणांमधे विषयाची माडंणी केलेली आहे. तसेच प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भसूची दिलेली आहे. शेवटी अर्थशास्त्राचे नोबेल विजेत्याचे वर्ष, अर्थशास्त्रज्ञाचे नाव व त्यांचे अर्थशास्त्रातील योगदान या संबंधी परिशिष्ठ जोडले आहे. पुस्तकाची मुखपृष्ठ रचना ही पुस्तकाचे शीर्षक व आशयाची कल्पना स्पष्ट करणारी आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर प्रास्ताविकेतील पुस्तका संदर्भातील महत्वपुर्ण माहीती छापलेली आहे. पुस्तकाला गुरूवर्य डॉ. मुक्ता जहागिरदार यांची प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकाच्या रूपाने नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञांचे विचार प्रथमत:च मराठी भाषेतून व्यक्त केले आहे. अर्थशास्त्राचे अभ्यासक तसेच अशा प्रकारच्या तांत्रिक विषयावर मराठीतील लिखानाचे अध्ययन करणा-या अभ्यासकांनी या लिखानाची दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करीत लेखकांनी मराठी भाषेच्या अभिवृद्धचा प्रयत्न केल्या बद्दल त्याची प्रशंसा प्रास्ताविकेतून डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी केली आहे.

सदर पुस्तकात २०११ते २०२१ या काळात नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञांच्या कामगीरीचे विवेचन केलेले आहे. नोबेल पारितोषिक देणारी

समिती संबंधीत अर्थशास्त्रज्ञ किंवा तज्ञांना त्यांच्या कोणत्या संशोधना बद्दल पारितोषिक प्रदान केले हे थोडक्यात स्पष्ट करीत असते. वरील ११ वर्षात तीन अर्थशास्त्रज्ञांना स्वतंत्रपणे हे पारितोषिक दिल्या गेले आहे तर सहा वर्षामधे दोन अर्थशास्त्रज्ञांना संयुक्तपणे पारितोषिक दिले आहे आणि दोन वर्ष तिन अर्थशास्त्रज्ञांना संयुक्तपणे हे पारितोषिक दिले आहे. न्यूयार्क विद्यापीठातील थॉमस जे. सार्जट आणि प्रिन्सटन विद्यापीठातील ख्रिस्तोफर ए. सिम्स यांना २०११ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक समष्टी अर्थशास्त्रातील अनुभवनिष्ठ संशोधनाच्या कारके आणि निष्पती याकरीता देण्यात आले होते. २०१२ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक एलव्हिन रोथ आणि लियार्ड शेफली यांना आवंटनाचे सिध्दात आणि बाजार रचनेची कार्यपध्दती याकरीता संयुक्तपणे देण्यात आले होते. तर २०१३चे नोबेल पारितोषिक युजीन फामा,लार्स पिटर हॅन्सन आणि रॉबर्ट शिलार या तिघांना संयुक्तपणे देण्यात आले होते. वित्तीय बाजारातील कल अथवा प्रवृत्ती हुडकून काढून त्याचे विश्लेषण करण्याच्या कामगीरीसाठी त्यांना हे पारितोषिक देण्यात आले. २०१४ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक जीन टिरोल यांना त्यांच्या बाजारशक्ती आणि नियंत्रणे यांच्या विश्लेषणातील कामगीरी बद्दल देण्यात आले. २०१५ चे नोबेल पारितोषिक उपभोग, दारिद्र्य आणि कल्याण यांच्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक विश्लेषणाकरीता प्रा. अंगस डेटॉन यांना देण्यात आले होते. २०१६ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक हार्ट आणि होल्मस्ट्रोम यांना संयुक्तपणे नविन सैद्धांतिक साधने निर्माण करण्या करीता देण्यात आला आहे. वास्तव जीवनातील करार व संस्था समजून घेण्याकरीता त्यांचे मोलाचे योगदान आहे.

२०१७ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक वर्तणूक अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल रिचर्ड एच. थॅलर यांना देण्यात आले होते. २०१८ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विल्यम डी. नार्थस आणि पॉल एम. रोमर यांना संयुक्तपणे आर्थिक वृद्धीसह पर्यावरण आणि नवप्रवर्तनाच्या एकीकरणासाठी देण्यात आले होते.तर २०१९ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक अभिजीत बॅनर्जी, इस्थर डूफ्लो आणि मायकेल क्रेमेर यांना संयुक्तपणे देण्यात आले होते. या पारितोषिक विजेत्यांपैकी अभिजीत बॅनर्जी व इस्थर डूफ्लो हे पती –पत्नी असून अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्राप्त करणारे ते पहिले जोडपे आहे. अभिजीत बॅनर्जी हे भारतीय वंशाचे आहेत हे विशेष. जागतीक पातळीवरील दारिद्र्य कमी करण्याचा अनुभवनिष्ठ दृष्टीकोन आणि दारिद्र्याशी लढा देणा-या संशोधनाकरीता हे पारितोषिक त्यांना बहाल करण्यात आले होते. २०२० चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक लिलाव वनव्याने विकसित केलेल्या प्रारूपांकरीता पॉल आर. मिलग्रोम आणि रॉबर्ट बी. विल्सन यांना संयुक्तपणे बहाल करण्यात आले होते. २०२१ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक डेव्हिड कार्ड ,जोशुआ एग्रिस्ट आणि गाईडो इम्बेन्स या

तिघांना संयुक्तपणे श्रम बाजारातील अनुभवनिष्ठ योगदान व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणामधे विकसित केलेल्या कार्यपध्दतीच्या योगदाना करीता देम्यात आले होते .

सदर पुस्तकात लेखकांनी केवळ अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञाच्या संदर्भात माहीतीच दिली नाही तर त्यांना अर्थशास्त्रातील ज्या भरीव कामगीरी बद्दल नोबेल पारितोषिक प्राप्त झाले त्यावरही भाष्य केले आहे. विशेष म्हणजे पारितोषिक विजेत्यांचे मुळ लेखन इंग्रजी मधून असतांना लेखन विषयाच्या गाभ्याला धक्का न लावता मराठी मधे पर्यायी शब्द प्रयोग करून उत्तम लेखन केले आहे. हे पुस्तक म्हणजे अर्थशास्त्राचे अभ्यासक तथा सामान्य वाचन प्रेमींकरीताही एक बौद्धक मेजवाणीच आहे. अशाच प्रकारचे लेखन पुढेही त्यांच्या कडून व्हावे याकरीता शुभेच्छा देते.

# श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृतांत (२०२१-२२)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक अधिवेशन दिनांक २५ व २६ मार्च २०२२ रोजी श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर येथे संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान मा. श्री सदानंद बोरकर यांनी भूषविले, ४५ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष मा. डॉ. विनोद गावंडे, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती हे होते. या सोहळ्याचे उद्घाटन मा. डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, पुण्यलोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ह्या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. श्रीराम कावळे, प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मा. डॉ. विनायक देशपांडे, कुलगुरू जी. एच. रायसोनी अभिमत विद्यापीठ, अमरावती हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे यांनी केले. परिषदेचे प्रास्ताविक परिषदेचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले. तर कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी परिषदेच्या वाटचालीचा आढावा सदर केला.अधिवेशनाचे रीतसर उद्घाटन मा.कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले. या कार्यक्रमात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका "अर्थमीमांसा" तसेच "अर्थनाद" या ४५ व्या वार्षिक अधिवेशन विशेषांकाचे प्रकाशन विमोचन करण्यात आले. तद्वतच, डॉ. विठ्ठल घीनमिने लिखित 'भारतीय मानव विकासाचे अर्थशास्त्र', डॉ. आस्तिक मुंगमोडे लिखित 'अर्थबिंब', डॉ. करमसिंग राजपूत लिखित 'कापसाची कुळकथा आणि कापूस उत्पादकाच्या व्यथा', डॉ. राजू श्रीरामे लिखित 'आर्थिक विचारांचा इतिहास', डॉ. रवी सोरते लिखित 'लोकसंख्या शास्त्र' लेखक या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. ४५ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे यांनी 'कोरोना महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर अभ्यास पूर्ण अध्यक्षीय भाषण दिले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. सदानंद बोरकर यांनी मार्गदर्शन पर भाषण दिले. या कार्यक्रमाला परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ.निवृत्ती पिस्तुलकर, उपाध्यक्ष डॉ. प्राची देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे, अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेचे संपादक डॉ.दि.व्य.जहागीरदार परिषदेचे दोन्ही सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने व डॉ.राजेश चव्हाण स्थानिक कार्यवाह डॉ. आस्तिक मुंगमोडे तसेच परिषदेचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. या उद्घाटन कार्यक्रमाचे आभार डॉ. आस्तिक मुंगमोडे यांनी मानले. यानंतर उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

भोजन अवकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या चर्चासत्रात 'आंतराष्ट्रीय व्यापार व प्रादेशिक गटाचा उदय' या विषयावरील संशोधन निबंधाचे वाचन करण्यात आले ओ त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे हे होते. तर सत्राध्यक्ष डॉ. संजय कुटे, सूत्रसंचालक डॉ. रवी. सोरते, वृत्तसंकलन डॉ. विठ्ठल ठावरी यांनी केले. या विषयावर एकूण पाच शोधनिबंध वाचण्यात आले या सत्राचे आभार डॉ. राजेश चव्हान यांनी मानले.

चहापानानंतर दुसऱ्या सत्रात 'भारतातील हवामान बदल: परिणाम व उपाय' या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. या सत्राचे सत्राध्यक्ष डॉ. सुनील शिंदे होते; सूत्रसंचालन डॉ. विशाल मालेकर तर वृत्तलेखन डॉ. संतोष धामणे यांनी केले. या सत्रात एकूण सात संशोधन पेपरचे वाचन करण्यात आले. या सत्राचे आभार डॉ. पंकज तायडे यांनी मानले.

अधिवेशनाच्या निमित्ताने घेण्यात येणारे 'प्रा.नाणेकर-पिंपरकर स्मृती व्याखानाच्या' प्रमुख वक्त्या डॉ. शुभदा देशमुख यांनी 'महिला सक्षमीकरण' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. राजेश चव्हाण यांनी केले.

पहिल्या दिवशी संध्याकाळी ७.०० वाजता विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची ४५ वि वार्षिक सर्व साधारण सभा मा.डॉ. विनोद गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली आमसभेच्या सुरुवातीला दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षाच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरु झाले. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले. मागील आर्थिक वर्षाचा परिषदेच्या व अर्थमीमांसाचा हिशोब सादर करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली.

**पुढील ४६ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता –**

१) अलीकडच्या काळातील आर्थिक प्रणालीचे बदलते स्वरूप

२) कोविड – १९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

३) विदर्भातील शेती (जिल्हा निहाय)

हे तीन विषय निश्चित करण्यात आले.

४६ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता अध्यक्ष म्हणून डॉ. श्रीरामे कावळे यांची निवड करण्यात आली. नागपूर विभागाचे सचिव म्हणून डॉ. विठ्ठल घिनमिने यांची तर अमरावती विभागाचे सचिव म्हणून डॉ. संजय कोठारी यांची निवड करण्यात आली. तसेच परिषदेच्या जिल्हा निहाय प्रतिनिधीची निवड करण्यात आली. यामध्ये डॉ. माधुरी लेणे (नागपूर), डॉ. सुनील शिंदे (नागपूर ग्रामीण), डॉ. विठ्ठल ठावरी(चंद्रपूर), डॉ. श्रीकृष्ण भुरे (भंडारा), डॉ. श्रीकृष्ण बोढे (वर्धा), डॉ. मंगला धोरण (अमरावती), डॉ. पंकज तायडे (अकोला), डॉ. हनुमंत भोसले (बुलठाणा), डॉ. संजय राचलवार (यवतमाळ), डॉ. गजानन कुबडे (वाशीम) इत्यादींचा समावेश आहे.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रामध्ये 'आर्थिक ग्रंथातील विचारविश्व'

ह्या उपक्रमाचे नववे पुष्प डॉ. उषा पाटील यांनी प्राध्यापक धनंजय गाडगीळ लिखित ‘हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास’ या ग्रंथावर अभ्यासपूर्ण भाषण देत गुंफले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे हे होते. कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन डॉ. राजेश चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. विठ्ठल घीनमिने यांनी मानले.

दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात ‘विदर्भातील राष्ट्रीय पेयजल योजना (जिल्हा निहाय) या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे हे होते. तर सत्राध्यक्ष डॉ. आशिष महातळे, सूत्रसंचालक डॉ. किशोर साबळे व वृत्त संकलन डॉ. गजानन सोमकुवर यांनी केले. या विषयावर एकूण पाच संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या सत्राचे आभार डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी मानले.

अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.मा.श्री.जयंत बोरकर हे होते तर परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रशांत बोकारे कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, डॉ. प्रकाश तीतरे, कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, उपाध्यक्ष डॉ. प्राची देशपांडे, परिषदेचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने, डॉ. राजेश चव्हाण, स्थानिक कार्यवाहक डॉ. आस्तिक मुंगमोडे व परिषदेचे बहुसंख्य सन्मानीय सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात पी.एच.डी. प्राप्त सदस्याचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळे या वर्षानिमित्य ज्या महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या महाविद्यालयातील प्राचार्याचा व विभाग प्रमुखाचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्य परिषदेचे माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष, माजी कार्याध्यक्ष, माजी सचिव यांचा यथोचीत्य सत्कार करण्यात आला. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे यथोचीत्य सत्कार करण्यात आला. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. राजेंद्र भांडवलकर यांची मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल परिषदेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच परिषदेची वेबसाईट निर्माण करण्यात योगदान दिल्याबद्दल डॉ. धीरज कदम यांचा सत्कार करण्यात आला.

अधिवेशनात सादर झालेल्या उत्कृष्ठ शोधनिबंधास परिषदे वतीने डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ. दि. व्य. जहागीरदार प्रोत्साहन पर रोख पारितोषिक डॉ. सिद्धार्थ मेश्राम व डॉ. संतोष धामणे यांना विभागून देण्यात आले तर स्व. देविदासजी हनुमंते स्मृती पारितोषिक डॉ. विठ्ठल घिनमिने व डॉ. समित माहोरे यांना विभागून देण्यात आले. अर्थमीमांसा, जानेवारी–जून २०२२ च्या अंकातील कै.श्री आ. देशपांडे उत्कृष्ट लेख पुरस्कार डॉ. प्रशांत हरमकर व डॉ. धीरज कदम यांना विभागून देण्यात आला.

परिषदेच्या वतीने श्री. ज्ञानेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे व स्थानिक कार्यवाहक डॉ. आस्तिक मुंगमोडे यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नवनियुक्त अध्यक्ष डॉ. श्रीराम

कावळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच  यावेळी परिषदेच्या सदस्यांनी दोन दिवशीय अधिवेशनाचे उत्तम आयोजन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. परिषदेचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पत्रकार व संचालक मंडळ तसेच ज्यांचे सहकार्य अधिवेशनासाठी लाभले; अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**डॉ .विठ्ठल घिनमिने**
**डॉ .राजेश चव्हान**
**सचिव**
**विदर्भ अर्थशास्त्र परिषद**